# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०७/२००९** **दिनांक १९.०७.२००९**

**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ-सकाळी ९.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे रविवार दिनांक १९ जूलै,२००९ रोजी सकाळी ९.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-८६७८-२००९, दि. १३.०७.२००९ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा रविवार दिनांक १९.०७.२००९ रोजी सकाळी ९.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२. | मा.श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे,उपाध्यक्ष, |
| ०३. | मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग | ०४. | मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे |
| ०५. | मा.श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव | ०६. | मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे |
| ०७. | मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर | ०८. | मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा |
| ०९. | मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर | १०. | मा.श्री.कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डेय |
| ११. | मा.डॉ.पी.एल.तिवारी | १२. | मा.सौ.जयश्री विष्णू थोरात |

मा.श्री.किशोर रा. मोरे, कार्यकारी अधिकारी

मा.डॉ.यशवंतराव व. माने, उप-कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११(२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष, श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्री राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील, मा.श्री.समि खतिब, मा.श्रीमती रिम्पल लोहिया व मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक यांनी दूरध्वनीवरुन कळविले आहे. त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.

**विषय नं.०१** **सिक्युरिटी साहित्य खरेदीकामीचे दर (कमर्शियल) निविदा उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.२२.०९.२०७ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील विषय नं.२७व निर्णय क्रं.७७२ अन्वये समाधी मंदिर व परिसराचे सुरक्षा व्यवस्थेकरीता सुरक्षा कन्सल्टंट म्हणून मे. ट्रायकलर कन्सल्टंट प्रा. लि., मुंबई यांची नेमणूक करण्यत आलेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१८.१०.२००८ विषय नं.३६ व निर्णय नं.७९३ नुसार समाधी मंदिर व परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीने करावयाच्या विविध उपाय योजना व अत्याधुनिक सुरक्षा साहित्य खरेदीस व त्या कामी येणारे अंदाजे रक्कम रु.४.५ कोटीचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्या अनुषंगाने दि.२१.०६.२००९ रोजी मा.व्य.मंडळाचे सभेसमोर खालील प्रमाणे ०७ निविदाधारकांना सिक्युरिटी सिस्टीमचे प्रात्यक्षिक दाखविणेकामी बोलविण्यात आलेले होते.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव |
|---|---|
| ०१ | मे. गोदरेज, बोटॅक मॅन्युफॅक्चर कं. लि. पुणे. |
| ०२ | मे. एच. सी. एल. इन्फोसिस्टीम लि., मुंबई . |
| ०३ | मे. क्रॉम्प्टन ग्रीव्हज्,मुंबई. |
| ०४ | मे. झायकॉम इलेक्ट्रानिक, सिक्युरिटी सिस्टीम, मुंबई. |
| ०५ | मे. व्हेक्ट्रा प्रा.लि, मुंबई. |
| ०६ | मे. व्हेन्टेजइंटिग्रेटेड, सिक्युरिटी सोल्युशन प्रा.लि.नोईडा. |
| ०७ | मे. चेकपॉईंट सिस्टीम प्रा.लि.मुंबई. |

त्यानुसार सदरील दिवशी त्यांनी सुरक्षा साहित्याचे प्रात्यक्षिक सभेसमोर दाखविले होते. सदरील सभेस मा.अध्यक्ष सो, मा.उपाध्यक्ष सो व व्यवस्थापन मंडळाचे सभासद तसेच मा.कार्यकारी अधिकारी सो, उप-कार्यकारी अधिकारी सो, पोलिस खात्यातील तज्ञ व ट्रायकलर कन्सल्टंटचे प्रतिनिधी कर्नल श्री.गोसाई,कर्नल श्री.दिपानकर,श्री.सुब्रमन्यम, श्री.राजेश इ.उपस्थित होत.

दि.२५.०६.२००९ रोजी मुंबई येथे मा.अध्यक्ष सो व ज. तेज कौल (एम.डी.ट्रायकलर) यांचे मिटींगमध्ये उपरोक्त पैकी १)मे.व्हेन्टेज इंन्टग्रेटेड,सिक्युरिटी सोल्युशन प्रा.लि.नोईडा.२) मे. चेकपॉईटसिस्टीम प्रा.लि.मुंबई. ३) मे.एच. सी. एल. इन्फोसिस्टीम लि., मुंबई हे निविदाधारक सोडून बाकी उर्वरित रिजेक्ट निविदाधारकांचे डि.डी.त्यांना परत पाठविण्यास मे.ट्रायकलर कन्सल्टंस, मुंबई यांनी फॅक्सद्वारे इकडील कार्यालयास कळविलेले आहे.

करिता खालील प्रमाणे अनुक्रमे...

१) एच.सी.एल.एन्फो सिस्टिम लि.मुंबई.
२) मे.व्हेन्टेज इंन्टीग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन प्रा.लि.नोईडा.
३) मे.चेक पॉईंट सिस्टीम (इंडीया) प्रा.लि.मुंबई.

यांची निवड झालेली असुन त्यांचे दर निविदा (कमर्शिअल बिड) उघडणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.५९० **प्रस्तावानुसार उपरोक्त ०३ कंपन्यांना डेमोस्ट्रेशन व त्यांचे कमर्शिअल बिड उघडणेकामी बोलविण्यात आले होते. पैकी (१) मे.व्हेन्टेज इंन्टीग्रेटेड सिक्युरिटी सोल्युशन प्रा.लि.नोईडा यांनी बर्नाला येथे त्यांचेमार्फत बसविलेले सुरक्षा साहित्य प्रत्यक्ष जाऊन पहाणेकामी सदरच्या सभेत ठरले. (२) मे.चेक पॉईंट सिस्टीम (इंडीया) प्रा.लि.मुंबई यांना तिन दिवस डेमोस्ट्रेशन दाखविणेबाबत ठरले. त्यात त्यांचे सर्व सुरक्षा साहित्य मंदिर परिसरात लावणेबाबत सांगण्यात आले.**

**वरील निर्णयानुसार सर्वश्री मा.विश्वस्त के.सी.पाण्डेय, कॅप्टन सुरेश वासुदेवा व रिम्पल लोहीया यांनी प्रत्यक्ष पाहणी केलेनंतरच कमर्शिअल बिड उघडणेबाबत निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- संरक्षण विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०२ साईटेक प्रकल्पासाठी प्राप्त झालेल्या कमर्शियल निविदा उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा. व्यवस्थापन समितीचे दि.१६.०३.२००८ व दि.०८.०३.२००९ चे सभेतील निर्णयांनुसार माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत श्री के. व्ही. रमणी यांचे मार्गदर्शनाखाली साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पासाठी नवीन प्रस्ताव तयार करुन ते दिनांक ०४/०३/२००९ अखेर विविध कंपन्यांना विक्री करण्यात आले होते. सदर विक्री करण्यात आलेले प्रस्ताव संस्थानला सादर करण्याची अंतीम मुदत दिनांक १०/०३/२००९ अखेर ठेवण्यात आलेली होती. त्यानुसार १२ कंपन्यांनी सिलबंद प्रस्ताव मुदतीत संस्थानला सादर केलेले आहेत. सदर प्रस्तावांचा अभ्यास करुन त्यापैकी खालील सहा कंपन्याना पात्र ठरवून त्यांना दिनांक १४/०५/२००९ अखेर तांत्रिक निविदा सादर करणेस सांगण्यात आले होते. त्यानुसार खालील सहा कंपन्यांनी आपले तांत्रिक निविदा सादर केल्या आहे.

01. RELIANCE COMMUNICATIONS LTD, PUNE
02. TATA CONSULTANCY SERVICES LTD. MUMBAI
03. CMC LTD., PUNE
04. PERSISTENT SYSTEM LTD., PUNE
05. UNITED TELECOMS LTD., BANGALORE
06. COGNIZANT TECHNOLOGY SOLUTIONS, PUNE

उपरोक्त निविदाधारकांच्या तांत्रिक निविदा माहिती तंत्रज्ञान विभागाचे दिनांक २३/०५/२००९ रोजीचे टिपणीनुसार मा. कार्यकारी अधिकारी साो. यांचे समक्ष उघडून त्यानंतर त्यांना Commercial निविदा भरणेस सांगण्यात आले होते. पैकी पाच निविदाधारकांचे Commercial निविदा इकडील कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या आहेत.

**(ब)** साईटेक प्रकल्पावर तांत्रिक निविदाधारकांशी चर्चा करुन निर्णय घेणेसाठी दिनांक २४/०६/२००९ व दिनांक २५/०६/२००९ असे दोन दिवस श्री. के.व्ही. रमणी, अध्यक्ष तांत्रिक सल्लागार समिती यांचे मार्गदर्शनाखाली बैठक आयोजीत करण्यात आली होती. दिनांक २४/०६/२००९ रोजीचे बैठकीत उपस्थित निविदाधारकांकडून प्रकल्पाचे घेण्यात आले. तांत्रिक समितीस त्यात असणाऱ्या अडचणी व शंकांचे निरसन करण्यात आले. सायंकाळी ४.३० चे दरम्यान सर्व प्रात्यक्षिक संपवून सदर निविदाधारकांना देण्यात आलेल्या गुणांच्या आधारे खालील चार पात्र निविदाधारक निवडण्यात आले आहे.

01. COGNIZANT TECHNOLOGY SOLUTIONS, PUNE
02. PERSISTENT SYSTEM LTD., PUNE
03. UNITED TELECOMS LTD., BANGALORE
04. RELIANCE COMMUNICATIONS LTD, PUNE

दिनांक २५/०६/२००९ रोजीचे बैठकीमध्ये उपरोक्त चार पात्र निविदाधारकांच्या Commercial निविदा उघडण्यात आल्या. सदर निविदा उघडलेनंतर त्यात बरेचशे बारकावे असल्याने, त्यांचे अध्ययन करुन निर्णय घेणे योग्य ठरेल असे मा. श्री . के.व्ही. रमणी यांनी सांगितले. शिवाय साईटेक प्रकल्पात नमुद केलेप्रमाणे Live Darshan व IP Phone सुविधा माहिती केंद्रांवर साईभक्तांसाठी उपलब्ध करुन द्यावयाची होती. परंतु, चर्चेअंती असे लक्षात आले की, सद्यःस्थितीत सदरील सुविधा उपलब्ध करुन दिल्यास ही बाब खर्चीक होईल. शिवाय साईभक्त या सुविधेचा कितपत लाभ घेतील याबाबत साशंकता होती. त्यामुळे साईटेक प्रकल्पात नमुद केलेल्या Live Darshan व IP Phone या सुविधा वगळण्यात यावे, असे ठरले. त्याचप्रमाणे SAN (System Area Network) या अद्ययावत प्रणालींची प्रथम टप्प्यात आवश्यकता नसल्याने, याबाबत अंतीम चार निविदाधारकांशी प्रत्येकी ५ ते १० मिनिटे चर्चा करुन SAN (System Area Network) प्रणालीचा समावेश दुसऱ्या टप्प्यात करणेबाबत श्री के.व्ही. रमणी यांनी सदर निविदाधारकांना सुचना दिल्या. Commercial निविदेत होणारा बदल लक्षात घेता, सदर निविदाधारकांकडून फेर

Commercial निविदा दिनांक ०६/०७/२००९ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत संस्थानचे शिर्डी कार्यालयाकडे सादर करणेस पात्र चार निविदाधारकांना सांगण्यात आले आहे.

त्यानुसार खालील निविदाधारकांच्या सिलबंद निविदा इकडील कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या आहेत.

| Sr. no. | PARTY NAME |
|---|---|
| 1 | United Telecoms Ltd. Bangalore |
| 2 | Reliance Communications Ltd, Pune |
| 3 | Cognizant Technology Solutions, Pune |
| 4 | Persistent System Ltd. Pune |

उपरोक्त प्राप्त झालेल्या निविदा मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९/०७/२००९ रोजीचे सभेत उघडून मा. श्री. के.व्ही. रमणी यांचेकडे सदर निविदा अभ्यास करणेसाठी देण्यात याव्यात. त्यानंतर श्री के.व्ही. रमणी यांनी सदर निविदांचा अभ्यास केलेनंतर दिनांक २०/०७/२००९ रोजीचे सभेमध्ये चर्चा-तथा-वाटाघाटीअंती निर्णय घेणेसाठी सदर निविदाधारकांना बोलावून त्यांचेशी चर्चा-तथा-वाटाघाटी करुन निर्णय घेण्यात यावा, असे नम्र मत आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे, प्राप्त झालेल्या सिलबंद Commercial निविदा दिनांक १९/०७/२००९ रोजी उघडून सदर निविदा मा.श्री. के.व्ही. रमणी यांचेकडे अभ्यासासाठी देणेस व त्यानंतर दिनांक २०/०७/२००९ रोजी बोलाविण्यात आलेल्या निविदाधारकांशी चर्चा-तथा-वाटाघाटी-अंती निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.५९१** **उपरोक्त निविदा आजचे सभेत समक्ष उघडलेनंतर मा.के.व्ही. रमणी यांनी अध्ययन करुन प्रत्येक निविदाधारकांशी चर्चा केली. त्यानंतर दि.२०.०७.२००९ रोजी पुन्हा फेरनिविदा तांत्रिक बाबी व घटकांसह सादर करणेस सांगण्यात आले. त्यांची मुदत दि.२९.०७.२००९ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आली.** (कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०३** **दिनांक २१.०६.२००९ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.५९२** दिनांक २१.०६.२००९ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

---

**<u>दिनांक १९.०७.२००९ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयाची कामापूरती नक्कल-</u>**

**विषय नं.०४. दिनांक २८.०६.२००९ रोजी शिर्डी येथे झालेल्या छाननी समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.५९३** व्यवस्थापन समितीचे दि.२८.०६.२००९ रोजी शिर्डी येथे झालेल्या छाननी समिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तीतील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**०१. छाननी समितीचे नियमावलीवर चर्चा करुन निर्णय घेणे.**

मा.श्री.सुधाकर जोशी (सेवानिवृत्त आय.ए.एस.) यांनी खालीलप्रमाणे तयार केलेले छाननी समितीचे सुधारित विनियम मान्य करण्यात यावे अशी समितीची शिफारस मान्य करण्यात आली.

REGULATIONS FOR SCRUTINY COMMITTEE

(Vide Section 21 of the Act.)

In exercise of the powers conferred by sub-section (2) of section 21 of the Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004, the Scrutiny Committee do hereby make the following regulations to govern the Conduct of Business of the meetings of the Scrutiny Committee and Guidelines for grant of Financial assistance to Registered Public Trusts or Registered Societies, namely:-

1. These regulations may be called the “Shree Sai Baba Sansthan Trust, Shirdi [Conduct of Business of the meetings of the Scrutiny Committee ad Guidelines for grant of Financial assistance as above] Regulations, 2009.

2. <u>DEFINITIONS</u> :- In these regulations unless there is anything repugnant in the subject or context-

(i) Act means the “The Shri Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004”.

(ii) Scrutiny Committee means the Scrutiny Committee constituted under Section 21(2) of the Act.

(iii) "Chairman" means the Chairman of the Scrutiny Committee appointed under clause (ii) of sub-section (2) of Section 21 of the Act.

(iv) "Executive Officer" means the Executive Officer of the Management Committee appointed under Section 13 of the Act.

3. SECRETARY :- The Executive Officer shall be the Secretary of the Scrutiny Committee

4. MEETING :- The meeting of the Scrutiny Committee shall be held at least once in year on the day, at the time and place as may be fixed by the Executive Officer in consultation with the Chairman of the Scrutiny Committee.

5. NOTICE OF MEETING :-

(a) At least seven clear days' (excluding the date of service and the date of meeting) notice shall ordinarily be given for every meeting.

Provided that the Chairman, having regard to the urgency of the business to be transacted, may in his discretion convene the meeting with three clear days' notice.

(b) The Agenda prepared by the Executive Officer under his hand shall accompany necessary information with every notice issued under clause (a).

6. CONTENTS OF NOTICE AND MODE OF SERRVICE :- Notice of the meeting specifying the day, time and place alongwith Agenda shall be delivered to the member, in person or sent by post under the signature of the Executive Officer at the registered address of the member.

Provided that in any emergency, if the Chairman so chooses, an urgent matter may be decided by circulating proceedings in lieu of holding meeting of the Scrutiny Committee. In case there is no agreement to the proposal over which a decision is solicited by all members, it shall be dealt with at the next meeting of the Scrutiny Committee.

7. PRESIDING AUTHORITY :- Every meeting shall be presided over by the Chairman of Scrutiny Committee.

8. QUORUM :- The quorum for the meeting shall be the Chairman and one of the members of the Scrutiny Committee.

9. DECISIONS :- Every question before a meeting shall be decided by a majority of votes of the members present, the Chairman having a second or, casting vote when there is equality of votes.

10. ADJOURNMENT OF MEETING :- If majority of the members present so decide the meeting may be adjourned to a subsequent date and time when only the unfinished business of the meeting shall be transacted.

11 MINUTES OF THE MEETING :- A minute, recorded in Marathi, shall be kept by the Secretary of the Scrutiny Committee of the names of the members present and of the proceedings of each meeting in a book to be kept for this purpose which shall be signed at, and by the Presiding Authority of the meeting.

12 ALLOWANCES :- Members of the Scrutiny Committee shall be entitled to traveling and daily allowance at the rate prescribed by the State Government from time to time and shall be charged to the Trust Fund.

13. CHARTERED ACCOUNTANT AND CHARTERED ENGINEER :- The Committee may, for the purpose of scrutiny of applications for financial aid and for monitoring utilization of the grant, take assistance of a chartered accountant and a chartered engineer to be appointed by the Trust in consultation with the Scrutiny Committee.

14. GUIDELINES FOR DONEE INSTITUTIONS :-

1. The institution applying for Financial assistance from the Trust has to be registered under the Societies Registration Act, 1860 and the Bombay Public Trust Act, 1950 as charitable trust as Educational institution, Sports Academy or Institute, Public Library, Hospital, Dispensary, Home for Destitutes or Physically Disable Persons or other Charitable or Religious Institution or any other Non-Commercial Cultural Organisation.

2. The institution applying for financial assistance from the Trust shall be in operation in the field of its activity at least for a period of Ten Years at the time of application to the Trust.
3. Applications received by the Trust within the period from 1st May to 31st December of the year shall alone be considered by the Scrutiny Committee for assistance during that financial year.
4. The institution applying for financial assistance from the Trust shall furnish Audited State of Accounts and Annual Administrative Report for three years preceding the year in which it applies to the Trust for financial assistance.
5. The institution applying for financial assistance from the Trust shall furnish a detailed Project Report prepared by a professional consultant.
6. Financial assistance to any Institution from the Trust shall be not exceeding 30% of the total estimated cost of the Project or Rs. Fifty Lakh whichever is less. The institution applying for financial assistance from the Trust shall furnish how the remaining amount is to be raised by the institution applying for financial assistance from the Trust.

   Provided that the Scrutiny Committee may, in exceptional case by unanimous resolution, relax this condition for the reasons to be recorded in writing.
7. Financial assistance from the Trust shall be released/ disbursed by the Trust in installments, phase-wise, as determined by the Trust after verification of utilization of the earlier installment.
8. A board mentioning, "A Project assisted by Shree Sai Baba Sansthan Trust [Shirdi]" shall prominently and permanently be displayed at the site of the Project.

**०२. मा.व्यवस्थापन समितीने मंजूर करुन शासनाकडे पाठविलेले प्रस्ताव, शासनाने मा.छाननी समितीचे मान्यतेसाठी परत पाठविलेले प्रस्तावावर चर्चा करुन निर्णय घेणे.**

व्यवस्थापन समितीने वेळोवेळी मंजूर करुन शासनाकडे पाठविलेले प्रस्ताव, शासनाने मा.छाननी समितीचे मान्यतेसाठी परत पाठविलेले प्रस्ताव खालीलप्रमाणे

| अ.नं. | विषय |
|---|---|
| ०१. | श्री साईनाथ माध्यामिक विद्यालय शिर्डी यांना २५ संगणक संच देणेबाबत. |
| ०२. | अहमदनगर जिल्हयातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बेंचेस देणेबाबत. |
| ०३. | शासन निर्देशानुसार ग्रामपंचायतींना सौर पथदिवे बसविणेसाठी आर्थिक मदत देणेबाबत. |
| ०४. | जिल्हा परिषद अहमदनगर यांना जि.प.प्राथमिक शाळा मॉडेलस्कुलचे बांधकामासाठी आर्थिक मदत देणेबाबत. |
| ०५. | वादळाने नुकसान झालेल्या जिल्हा परिषदेच्या नेवासा व नगर तालुक्यातील शाळांना आर्थिक मदत देणेबाबत. |
| ०६. | शासन निर्देशानुसार तालुकास्तरीय लघुपशुवैद्यकिय सर्व चिकीत्सालये व पशुवैद्यकिय दवाखाने यांना आर्थिक मदत देणेबाबत. |
| ०७. | श्री क्षेत्र जेजुरी येथे श्री खंडोबा भक्तांसाठी भक्त निवासाचे बांधकामासाठी निधी देणेबाबत. |
| ०८. | मौजे गोरठा, ता.उमरी, जि.नांदेड येथे श्री.दासगणु महाराजांचे समाधीचे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी धर्मशाळा, वाचनालय व व्यायामशाळेच्या बांधकामासाठी आर्थिक मदत देणेबाबत. |
| ०९. | श्रीकृष्ण ज्ञानपीठ प्रतिष्ठान कोपरगांव यांना आश्रमाचे कामासाठी आर्थिक मदत देणेबाबत. |
| १०. | श्री संत तुकाराम महाराज संस्थान, श्री क्षेत्र देहू, जिल्हा-पुणे यांना मंदिराचे बांधकामासाठी आर्थिक मदत देणेबाबत. |
| ११. | राजश्री कदम प्रतिष्ठान, देवळाली प्रवरा, ता- राहुरी यांना जाणता राजा या नाटयप्रयोगासाठी आर्थिक मदत देणेबाबत. |
| १२. | शरीर सौष्ठव स्पर्धेसाठी छत्रपती मित्र मंडळ शिर्डी यांना आर्थिक मदत देणेबाबत. |
| १३. | आखिल भारतीय नाटय परिषद, अ.नगर शाखेच्या वतीने आयोजित करण्यात येत असलेल्या स्वागताध्यक्ष करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेस आर्थिक मदत देणेबाबत. |
| १४. | अहमदनगर जिल्हा मराठी पत्रकार संघाला साई सांस्कृतीक हॉल तसेच साई लायब्ररीचे बांधकामास आर्थिक मदत देणेबाबत. |
| १५. | बीड येथे दि.१४.०२.२००९ ते दि.१५.०२.२००९ अखेर होणाऱ्या ८९ वे अखिल भारतीय मराठी नाटय संमेलनास आर्थिक मदत देणेबाबत. |
| १६. | तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रमा अंतर्गत शिर्डी नगरपंचायत हद्दीतील विकास कामासाठी लोकवर्गणीच्या हिस्स्याची रक्कम देणेबाबत. |
| १७. | कोपरगाव, पुणतांबा, राहाता, पाणीपुरवठा योजनेस व राहाता शहर मिरवणुक रस्त्याचे कॉंक्रीटीकरणास आर्थिक मदत देणेबाबत. |
| १८. | शिर्डी पोलीस स्टेशनला टाईपरायटर, कॉम्प्युटर व झेरॉक्स मशीन देणेबाबत. |
| १९. | श्री आप्पासाहेब भिमराज ढुस, देवळाली, राहुरी यांना स्काय डायव्हिंग या खेळातील प्राविण्यासाठी |

| | |
|---|---|
| | आर्थिक मदत देणेबाबत. |
| २०. | कु.श्रिया नितीन विद्वांस,मुंबई यांची दि.११ जुलै ते १५ जुलै २००७ दरम्यान आयोजीत केलेल्या जागतीक युवा मैदानी स्पर्धेसाठी निवड झाल्याने येणाऱ्या खर्चासाठी आर्थिक मदत देणेबाबत. |
| २१. | चि.पृथ्वीराज औताडे पुणे यास जलतरण मोहिमेसाठी येणाऱ्या खर्चास आर्थिक मदत देणेबाबत. |
| २२. | श्री.आण्णासो.गो. गागरे, राहुरी यांचे पाल्यांना बुध्दीबळ खेळासाठी आर्थिक मदत देणेबाबत. |

**अ)** यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तपैकी खालील प्रस्ताव जे छाननी समितीच्या अधिकार कक्षेत येत असल्याने मान्य करण्यात आले.

| अ.नं. | विषय |
|---|---|
| ०१. | श्री साईनाथ माध्यामिक विद्यालय शिर्डी यांना २५ संगणक संच देणेबाबत. |
| ०२. | श्री क्षेत्र जेजुरी येथे श्री खंडोबा भक्तांसाठी भक्त निवासाचे बांधकामासाठी निधी देणेबाबत. |
| ०३. | मौजे गोरठा, ता.उमरी, जि.नांदेड येथे श्री.दासगणु महाराजांचे समाधीचे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी धर्मशाळा, वाचनालय व व्यायामशाळेच्या बांधकामासाठी आर्थिक मदत देणेबाबत. |
| ०४. | श्री संत तुकाराम महाराज संस्थान, श्री क्षेत्र देहू, जिल्हा-पुणे यांना मंदिराचे बांधकामासाठी आर्थिक मदत देणेबाबत. |
| ०५. | राजश्री कदम प्रतिष्ठान, देवळाली प्रवरा, ता- राहुरी यांना जाणता राजा या नाटयप्रयोगासाठी आर्थिक मदत देणेबाबत. |
| ०६. | अहमदनगर जिल्हा मराठी पत्रकार संघाला साई सांस्कृतीक हॉल तसेच साई लायब्ररीचे बांधकामास आर्थिक मदत देणेबाबत. |
| ०७. | तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रमाअंतर्गत शिर्डी नगरपंचायत हद्दीतील विकास कामासाठी लोकवर्गणीच्या हिस्स्याची रक्कम देणेबाबत |

वरील प्रकरणांबाबत श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) तर्फे अर्थ सहाय्य मिळविण्यासाठी तयार करण्यात आलेल्या पात्रतेच्या निकषानुसार आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता १५ दिवसात करणेबाबत संबंधित संस्थांना कळविण्यात यावे व त्यानुसार आलेल्या कागदपत्रांची छाननी समितीच्या सभेत पडताळणी करुन पात्र प्रस्ताव शासनाकडे निर्णयासाठी पाठविणेत येतील.

**ब) तसेच खालीलप्रमाणे प्रस्ताव अमान्य करण्यात आले.**

| अ.नं. | विषय |
|---|---|
| **१.** | शरीर सौष्ठव स्पर्धेसाठी छत्रपती मित्र मंडळ शिर्डी यांना आर्थिक मदत देणेबाबत. |
| **२.** | आखिल भारतीय नाट्य परिषद, अ.नगर शाखेच्या वतीने आयोजित करण्यात येत असलेल्या स्वागताध्यक्ष करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेस आर्थिक मदत देणेबाबत. |
| **३.** | बीड येथे दि.१४.०२.२००९ ते दि.१५.०२.२००९ अखेर होणाऱ्या ८९ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनास आर्थिक मदत देणेबाबत. |

**क)** तसेच खालील प्रस्ताव अधिनियम- २००४ कलम २१(२) नुसार छाननी समितीच्या अखत्यारित येत नसल्याने सदरचे प्रस्ताव परस्पर राज्य शासनाकडे पुढील निर्णयासाठी पाठविणेत यावेत, असे ठरविण्यात आले.

| अ.नं. | विषय |
|---|---|
| ०१. | अहमदनगर जिल्हयातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बेंचेस देणेबाबत. |
| ०२. | शासन निर्देशानुसार ग्रामपंचायतींना सौर पथदिवे बसविणेसाठी आर्थिक मदत देणेबाबत. |
| ०३. | जिल्हा परिषद अहमदनगर यांना जि.प.प्राथमिक शाळा मॉडेलस्कुलचे बांधकामासाठी आर्थिक मदत देणेबाबत. |
| ०४. | वादळाने नुकसान झालेल्या जिल्हा परिषदेच्या नेवासा व नगर तालुक्यातील शाळांना आर्थिक मदत देणेबाबत. |
| ०५. | शासन निर्देशानुसार तालुकास्तरीय लघुपशुवैद्यकिय सर्व चिकीत्सालये व पशुवैद्यकिय दवाखाने यांना आर्थिक मदत देणेबाबत. |
| ०६. | कोपरगाव, पुणतांबा, राहाता, पाणीपुरवठा योजनेस व राहाता शहर मिरवणुक रस्त्याचे कॉंक्रीटीकरणास आर्थिक मदत देणेबाबत. |
| ०७. | शिर्डी पोलीस स्टेशनला टाईपरायटर, कॉम्प्युटर व झेरॉक्स मशीन देणेबाबत. |
| ०८. | श्री साईनाथ माध्यामिक विद्यालय शिर्डी यांना २५ संगणक संच देणेबाबत. |
| ०९. | श्री आप्पासाहेब भिमराज ढुस, देवळाली, राहुरी यांना स्काय डायव्हिंग या खेळातील प्राविण्यासाठी आर्थिक मदत देणेबाबत. |
| १०. | कु.श्रिया नितीन विद्वांस,मुंबई यांची दि.११ जुलै ते १५ जुलै २००७ दरम्यान आयोजीत केलेल्या जागतीक युवा मैदानी स्पर्धेसाठी निवड झाल्याने येणाऱ्या खर्चासाठी आर्थिक मदत देणेबाबत. |
| ११. | चि.पृथ्वीराज औताडे पुणे यास जलतरण मोहिमेसाठी येणाऱ्या खर्चास आर्थिक मदत देणेबाबत. |
| १२. | श्री.आण्णासो.गो. गागरे, राहुरी यांचे पाल्यांना बुध्दीबळ खेळासाठी आर्थिक मदत देणेबाबत. |

**०३. मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर केलेले व व्यवस्थापन समितीने मा.छाननी समितीचे मान्यतेसाठी ठेवणेबाबत निर्देश दिलेल्या प्रस्तावावर चर्चा करुन निर्णय घेणे.**

मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर केलेले व व्यवस्थापन समितीने मा.छाननी समितीचे मान्यतेसाठी ठेवणेबाबत निर्देश दिलेले प्रस्ताव खालीलप्रमाणे-

| अ.नं. | विषय |
|---|---|

| | |
|---|---|
| ०१. | सात्रळ, ता.राहुरी येथील मुलींच्या वस्तीगृहाचे इमारत बांधकामासाठी आर्थिक मदत देणेबाबत. |
| ०२. | १) अमेय पालक संघटणा, ठाणे यांना आर्थिक मदत देणेबाबत.<br>२) क्षितीज मतीमंद मुलांची शाळा, डोंबीवली यांना आर्थिक मदत देणेबाबत. |
| ०३. | इच्छामणी विद्यामंदिर एज्युकेशन सोसायटी, नाशिक यांना शाळेचे बांधकामास आर्थिक मदत देणेबाबत. |
| ०४. | लायन्स मुक -बधिर व अपंग विद्यालय, कोपरगांव यांना संगणक देणेबाबत. |
| ०५. | अहमदनगर जिल्हयात कुपोषन निर्मुलन अभियानाकरीता बाल विकास केंद्रांना सहकार्य करणेबाबत. |
| ०६. | श्री विठ्ठलदेव सखाहरी महाराज ट्रस्ट यांना मंदिर बांधकामास आर्थिक मदत देणेबाबत. |
| ०७. | पुणतांबा तिर्थक्षेत्राचे विकास कामे करणेस आर्थिक मदत देणेबाबत. |
| ०८. | प्रभु श्रीरामचंद्र सार्वजनिक मंडळ, अकलूज, जिल्हा सोलापुर यांना भक्तनिवास बांधकामास आर्थिक मदत देणेबाबत. |
| ०९. | चैतन्य सेवा मंडळ, तासगांव, सांगली यांना मंदिर बांधकामास आर्थिक मदत देणेबाबत. |
| १०. | श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर ट्रस्ट, शिर्डी यांना मंदिराचे अपूर्ण बांधकाम व इतर कामास आर्थिक मदत देणेबाबत. |
| ११. | मारुती मंदिर, कोकमठाण, ता.कोपरगांव या मंदिर बांधकामास आर्थिक मदत देणेबाबत. |
| १२. | श्री संत तुकाराम महाराज संस्थान नेवासा यांना निवासी खोल्यांचे बांधकामास आर्थिक मदत देणेबाबत. |
| १३. | श्री कान्होबा ऊर्फ कानिफनाथ देव ट्रस्ट मढी, ता.पाथर्डी, जि. अ.नगर यांचे आर्थिक मदतीबाबत. |
| १४. | विश्वशांती गुरुकूल आश्रम, केरळी, ता.किनवट, नांदेड यांना बांधकामासाठी आर्थिक मदत देणेबाबत. |
| १५. | श्री ज्ञानेश्वर महाराज जन्मस्थान आपेगांव येथे मंदिर बांधकामास आर्थिक मदत देणेबाबत. |
| १६. | निमगांव कोऱ्हाळे, ता.राहाता येथील श्री खंडोबा मंदिराचे जिर्णोध्दारास आर्थिक मदत देणेबाबत. |
| १७. | श्री.साईबाबा मंदिर फलटण परिसरातील सांस्कृतिक भवनाचे बांधकामास आर्थिक मदत देणेबाबत. |
| १८. | श्री विठ्ठल मंदिर संस्थान येवला या मंदिराचे बांधकामास आर्थिक मदत देणेबाबत. |
| १९. | बन बिरोबा मंदिर, राहाता या मंदिर बांधकामास आर्थिक मदत देणेबाबत. |
| २०. | डी.एल.बी. बहूउद्देशिय विकास प्रतिष्ठान अहमदनगर यांना राज्यस्तरीय बुध्दीबळ स्पर्धेस आर्थिक मदत देणेबाबत. |
| २१. | कविराज फिल्म्स् कराड यांना "बळीराजाचं राज्य येऊ दे" या मराठी चित्रपटास आर्थिक मदत देणेबाबत. |
| २२. | महाराष्ट्र राज्य परिवीक्षा आणि अनुरक्षण संघटना पुणे व मुंबई यांचे मुलींचे झाबवाला आफ्टर केअर होम बोरीवली या अनाथ निराधार मुलींच्या वसतिगृहास देणगी देणेबाबत. |
| २३. | शिर्डी साई संस्थान, मेलबोर्न व्हिक्टोरिया, ऑस्ट्रेलिया या संस्थेस भारतीय विकास कामास आर्थिक मदत देणेबाबत. |
| २४. | श्रीहरी सेवा व अनुसंधान केंद्र अमरावती यांना रक्तपेढीच्या स्थापनेस व उपकरणे खरेदीस आर्थिक मदत देणेबाबत. |
| २५. | स्व.आत्माराम डोंगरचंद शहा सेवा संस्था कोल्हापुर, यांना रुग्णालयाचे उभारणीसाठी आर्थिक मदत देणेबाबत. |
| २६. | जगदाळे मामा हॉस्पिटल, बार्शी, ट्रामा युनिटच्या विकासार्थ आर्थिक मदत देणेबाबत. |
| २७. | सत्यसाईबाबा हॉस्पिटल, पंढरपूर, जि.सोलापूर या संस्थेस बांधकामासाठी आर्थिक मदत देणेबाबत. |
| २८. | रोटरी सेवा ट्रस्ट, उस्मानाबाद यांना नेत्र रुग्णालयासाठी आर्थिक मदत देणेबाबत. |
| २९. | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ग्रामिण रुग्णालय, शिखर शिंगणापुर यांना रुग्णालयाचे बांधकाम व वैद्यकिय उपकरणे खरेदीस आर्थिक मदत देणेबाबत. |
| ३०. | अपंगांचे सेवेसाठी व्हीलचेअर ॲम्ब्युलन्स खरेदीसाठी स्फुर्ती वेलफेअर ट्रस्ट, मुंबई यांना आर्थिक मदत देणेबाबत. |
| ३१. | प्रविण ताराचंद मेहरखांब, रा.सुरेगांव, ता.कोपरगांव यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत देणेबाबत. |
| ३२. | जरलरतणपटू कु.वैशाली भास्कर रिठे, अमरावती हिला प्रशिक्षणासाठी आर्थिक मदत देणेबाबत. |
| ३३. | श्री. विकास विलास नागवडे, रा.बाभुळसर, शिरुर, पुणे यांना उच्च शिक्षणासाठी इंग्लंड येथे जाणेबाबत. |
| ३४. | न.पा.वाडी., ता.राहाता यांना पिण्याचे पाण्याची पाईपलाईन व पाण्याची टाकीचे बांधकामासाठी आर्थिक मदत देणेबाबत. |
| ३५. | नांदुर्खी बु.ता.राहाता या गांवचे विकास कामे करणेबाबत. |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तपैकी खालील अ प्रमाणे प्रस्ताव तत्वतः विचारार्थ मान्य करण्यात आले. तसेच ब प्रमाणे प्रस्ताव छाननी समितीच्या अखत्यारित नसल्याने शासनाचे मान्यतेसाठी पाठविण्यात यावेत व उर्वरित प्रस्ताव अमान्य करण्यात आले.

**(अ)**

| **अ.नं.** | **विषय** |
|---|---|
| ०१. | लायन्स मुक -बधिर व अपंग विद्यालय, कोपरगांव यांना संगणक देणेबाबत. |
| **०२.** | श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर ट्रस्ट, शिर्डी यांना मंदिराचे अपूर्ण बांधकाम व इतर कामास आर्थिक मदत देणेबाबत. |
| **०३.** | श्री कान्होबा ऊर्फ कानिफनाथ देव ट्रस्ट मढी, ता.पाथर्डी, जि. अ.नगर यांचे आर्थिक मदतीबाबत. |
| **०४.** | श्री ज्ञानेश्वर महाराज जन्मस्थान आपेगांव येथे मंदिर बांधकामास आर्थिक मदत देणेबाबत. |
| ०५. | बन बिरोबा मंदिर, राहाता या मंदिर बांधकामास आर्थिक मदत देणेबाबत. |
| ०६. | श्रीहरी सेवा व अनुसंधान केंद्र अमरावती यांना रक्तपेढीच्या स्थापनेस व उपकरणे खरेदीस आर्थिक मदत देणेबाबत. |
| ०७. | अपंगांचे सेवेसाठी व्हीलचेअर ॲम्ब्युलन्स खरेदीसाठी स्फूर्ती वेलफेअर ट्रस्ट, मुंबई यांना आर्थिक मदत |

| | |
|---|---|
| | देणेबाबत. |
| ०८. | पुणतांबा तिर्थक्षेत्राचे विकास कामे करणेस आर्थिक मदत देणेबाबत. |

वरील प्रकरणांबाबत श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) तर्फे अर्थ सहाय्य मिळविण्यासाठी तयार करण्यात आलेल्या पात्रतेच्या निकषानुसार आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता १५ दिवसात करणेबाबत संबंधित संस्थांना कळविण्यात यावे व त्यानुसार आलेल्या कागदपत्रांची पडताळणी छाननी समितीचे सभेमध्ये करुन पात्र प्रस्ताव शासनाकडे निर्णयासाठी पाठविणेत येतील.

**(ब)**

| अ.नं. | विषय |
|---|---|
| ०१ | अहमदनगर जिल्हयात कुपोषन निर्मुलन अभियानाकरीता बाल विकास केंद्रांना सहकार्य करणेबाबत. |
| ०२. | न.पा.वाडी., ता.राहाता यांना पिण्याचे पाण्याची पाईपलाईन व पाण्याची टाकीचे बांधकामासाठी आर्थिक मदत देणेबाबत. |
| ०३. | नांदुर्खी बु.ता.राहाता या गांवचे विकास कामे करणेबाबत. |

**०४. <u>शिर्डी शहरातून नगर-मनमाड या राजमार्गावर ठिकठिकाणी ट्रॅफिक सिग्नल बसविणे बाबत.</u>**
अधिनियम २१(०२) अन्वये साईभक्तांच्या सोयीसाठी शिर्डी शहरातील वाहतूकीची कोंडी दूर करण्यासाठी नगर मनमाड रस्त्यावर संस्थानमार्फत ट्रॅफिक सिग्नल बसविणे आवश्यक असल्याने त्यास मान्यता देण्यात यावी अशी या समितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**०५. राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र स्थापित भगीरथ प्रकल्पास मारुती ॲम्ब्यूलन्स एम.एच.१७/के-६६५१ वाहन देणगी देणे बाबत.**

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र स्थापित भगीरथ प्रकल्पास मारुती ॲम्ब्यूलन्स देणेस छाननी समितीची कोणतीही हरकत नाही. याकामी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र स्थापित भगीरथ प्रकल्पाकडून संस्थेची नोंदणीप्रत, प्रकल्प अहवाल इ.माहिती मागवून त्याची पडताळणी करुन ॲम्ब्युलन्स देण्यात यावी, असे ठरले. मात्र हे वाहन राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, विकणार नाही अगर सुटे भाग विकणांर नाही यांची हमी देईल.

**०६.** संस्थानकडे आर्थिक अनुदान मागणी कामी पुष्कळ अर्ज आलेले आहेत/ येत असतात. असे येणारे अर्ज संस्थानकडे दाखल झालेल्या तारखेपासून फक्त एक वर्ष कालावधीपर्यंत ग्राह्य धरण्यात यावेत. सदर कालावधीत अनुदान न मिळाल्यास एक वर्षाचा कालावधी संपलेनंतर सदरहू अर्ज निकाली काढण्यात यावेत, अशी शिफारस मान्य करण्यात आली.

**०७. <u>श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी तर्फे अर्थ सहाय्य मिळण्यासाठी पात्रतेचे निकष ठरविण्यात आले. ते खालीलप्रमाणे-</u>**

१) संस्थेच्या उद्देशामध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी च्या सन २००४ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम २१ (२) पोट कलम (१) मधील प्रयोजनापैकी एका तरी प्रयोजनाचा समावेश असावा.

२) सहाय्य मागणारी संस्था ही मुंबई सार्वजनिक संस्था १९५० (बॉम्बे पब्लिक ट्रस्ट १९५०) खाली नोंदणीकृत होऊन कमीतकमी दहा वर्षे कार्यरत असावी.

३) संस्थेच्या कार्यकारणीची निवड ही लोकशाही पध्दतीने व कायद्याप्रमाणे झालेली असावी व तशी स्पष्ट तरतूद संस्थेच्या घटनेत व उपविधीमध्ये असावी.

४) संस्थेचा कारभाराबाबत संबंधित धर्मादाय आयुक्तांचे शिफारस पत्र.

५) लेखापरिक्षीत ताळेबंदाच्या गेल्या पाच वर्षाच्या प्रती.

६) धर्मादाय आयुक्तांनी साक्षांकित केलेली घटनेची प्रत.

७) सदस्य व पदाधिकाऱ्यांच्या नावे व दुरध्वनी क्रमांकांची धर्मादाय आयुक्तांनी साक्षांकित केलेली यादी.

८) संस्थेच्या नियोजित कामाबद्दल (ज्या कारणास्तव अर्थ सहाय्य हवे आहे त्या कामाबद्दल) श्री साईबाबा संस्थानने ठरविलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

अ) इमारत ज्या जागेवर उभारावयाची आहे. त्या जागेचा ७/१२ उतारा व इमारतीचा वास्तुशास्त्रज्ञांनी प्रमाणीत केलेला नकाशा.

ब) संस्थेने (शाळेला/विद्यालयाला)नविन इमारत किंवा असलेल्या इमारतीत सुधारणा आवश्यक असल्याबाबत शिक्षणाधिकारी /उपसंचालक /उच्च शिक्षण उपसंचालक यांचे प्रमाणपत्र.

क) उपसंचालक, शिक्षण विभाग यांना अगोदर सादर केलेल्या जमा-खर्चाच्या तपशीलाची प्रत.

ड) प्रस्ताव रुग्णालय किंवा अनाथ आश्रम/ वृध्दाश्रमाचा असल्यास उपलब्ध सोयीसुविधाबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी / उपसंचालक (समाज कल्याण) यांचा निरिक्षण अहवाल सोबत जोडावा.

इ) संस्थेचे (शाळा / महाविद्यालय) आस्तित्वात असलेल्या इमारतीची व खोल्यांची संख्या.

फ) शिक्षण उपसंचालक/उच्चशिक्षण उपसंचालक यांनी केलेल्या अद्ययावत निरीक्षण अहवालाची सत्यप्रत.

ज) आयकर खात्याचे आयकर अधिनियम कलम ८० (जी) खाली आयकरातून सूट मिळाल्याचे प्रमाणपत्र.

च) शासनाकडून अनुदान मिळते किंवा नाही याबाबतचे प्रमाणपत्र.

ल) संस्थेच्या मालमत्तेविषयी किमतीसह यादी. याबाबत धर्मादाय आयुक्त यांचेकडील नोंदवहीचा साक्षांकित उतारा.

म) संस्थेचे बॅकेत नांव,पत्ता व खाते नंबर.

न) बांधकाम करण्यासाठीचे परवानगी पत्र. तसेच आराखडयाला दिलेले मंजूरीचे पत्र.

९) प्रस्तावित प्रकल्पात अर्जदार संस्थेचा आर्थिक सहभागाचा तपशील सादर करणे आवश्यक आहे. (अंशतः मदत श्री साईबाबा संस्थानने केल्यास शिल्लक निधी कशाप्रकारे उभारण्यात येणार आहे. याबाबतचे नियोजन व त्याला लागणारा कालावधीचा तपशील)

१०) प्रकल्प खर्चाच्या एकूण रकमेपैकी किमान १५ टक्के रक्कम या उद्देशासाठी संस्थेने जमा केली असल्याचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

११) बांधकामासाठी मंजूर करण्यात आलेले अर्थ सहाय्य हे बांधकामाच्या प्रगतीनुसार व टप्प्यानुसार हप्त्याहप्त्याने देण्यात येईल. म्हणजे ज्या प्रमाणांत बांधकाम प्रकल्प पूर्ण होईल त्याप्रमाणात मंजूर अर्थसहाय्यापैकी मंजूर रक्कमेचा हप्ता देण्यात येईल.

१२) न्यासाने ठरवून दिलेला नमूना व न्यासाने निश्चित केलेले सदस्य किंवा अधिकारी यांनी प्रस्तावीत प्रकल्पाला प्रत्यक्ष भेट देऊन अर्थसहाय्याच्या गरजेविषयी व प्रकल्पाच्या यशस्वितेविषयी प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

अर्थसहाय्य मंजूर झाल्यानंतर न्यासाचे विश्वस्त किंवा अधिकारी वेळोवेळी अर्जदार संस्थेला भेट देतील व त्यावेळी अर्जदार संस्थेने अशा विश्वस्तांना / अधिकाऱ्यांना प्रकल्पासंबंधी माहिती देण्याबाबत सहकार्य करण्याचे लेखी आश्वासन देणे आवश्यक राहील. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

---

**विषय नं.०५ ०१. (अ) जमा खर्च तक्ता मे-जून, २००९**

**(ब) माहे मे-जुन,२००९ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे जून २००९ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे जून, २००९ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(A) माहे मे-जुन,२००९ मधील जमा अनुक्रमे रु २०,४१,८१,६२८/- व रु. २१,९४,६३,९०२/- आणि खर्च रुपये ६,९३,८९,३११ /- व रुपये ८,६५,४८,२६३/- चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील मे-जुन,२००९ अनुक्रमे रुपये २,४१,५६३/- व रुपये २,६१,७०६/- चा तक्ता, दिनांक ४.०७.२००९ अखेर संस्थानची गुंतवणूक रुपये ३५३,५५,३७,०२१/- चा तक्ता, माहे जुन,२००९ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या एकूण रुपये ९,१७,२८,२५०/- देणगीचा तक्ता, माहे जुन,२००९ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा विक्रीचा रुपये १,४१,५२२/-चा अहवाल,ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ५९४ नोंद घेण्यात आली.**

---

**०२. श्रीसाईबाबा रुग्णालयात माहे मे-जुन, २००९ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.**

B) श्री साईबाबा रुग्णालयात माहे मे-जुन,२००९ मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये अनुक्रमे रुपये १९,८६,७४५/- व रुपये १५,५७,०१४/- देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ५९४ नोंद घेण्यात आली.**

---

**०३. साईनाथ रुग्णालयात माहे जून २००९ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाची नोंद घेणे.**

(C) श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये माहे जुन,२००९ मध्ये रुपये ७१,७२,२५०/- देण्यात आलेल्या अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ५९४ नोंद घेण्यात आली.**

---

**०४. श्रीसाईनाथ रुग्णालय माहे मे-जुन, २००९ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(D) साईनाथ रुग्णालयात माहे मे-जुन,२००९ मध्ये साईनाथ रुग्णालयातील रुग्णांना अंतररुग्ण अनुक्रमे रुपये ८३,३६८/- व रुपये ५,६३,६०७/- बाह्य रुग्ण रुपये ५२,५२१/- व रुपये ५९,२७९/- थॅलसेमिया व हिमोफेलिया

रुपये ५५,९००/- व रुपये ५३,१५०/- वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ५९४ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.**

---

**०५. माहे जून, २००९ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(E) जुन,२००९ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ४०,५७७ कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ५९४ नोंद घेण्यात आली.**

---

**०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(F) बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता "अ" व "ब" यांच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ५९४ नोंद घेण्यात येऊन,तक्ता ब मधिल खालीलप्रमाणे अंतिम बिले आदा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(अ) श्रीसाईनाथ रुग्णालयासाठी फर्निचर बनविणेकामी मे.मगर जायभावे असोसिएटस्,नाशिक यांचे रुपये ३,३८,२३५/-मात्रचे अंतिम बिल आदा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(ब) नविन प्रसादालय येथील अंतर्गत सजावट आणि फर्निचर कामाचे ठेकेदार मे.सुदर्शन फ्लेक्जीबल पॅकेजिंग प्रा.लि., नाशिक यांचे रुपये ४६,९६,०५०/-मात्रचे अंतिम बिल आदा करण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**०७ पाणी तपासणी अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(G) माहे जु,२००९ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ५९४ नोंद घेण्यात आली.**

---

**विषय नं.०६ श्रीसाईनाथ रुग्णालयातील इ.एन.टी.विभागासाठी इंडोस्कोप व कॅमेरा खरेदीकामी प्राप्त झालेल्या कमर्शिअल सिलबंद निविदा उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीसाईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटरमध्ये दि.०६.१२.२००८ व दि.१२.१२.२००८ अन्वये ई.एन.टी. व जनरल सर्जरीच्या शस्त्रक्रियासाठी विविध प्रकारचे एन्डोस्कोप तसेच एक टेलेकॉम कॅमेऱ्याची मागणी केलेली आहे.

| Sr.No. | Description | Make | Qty. |
|---|---|---|---|
| 1 | Nasal Endoscope $0^0$ | Karl Storz | 01 |
| 2 | Nasal Endoscope $30^0$ | Karl Storz | 01 |
| 3 | Nasal Endoscope $120^0$ | Karl Storz | 01 |
| 4 | Telecam 20212030PAL | Karl Storz | 01 |

उपरोक्त मागणी मधील अ.नं.१ कामी मे.चिमको बायोमेडीकल,मुंबई यांना इकडील पत्र क्र.१०२३ दि.२२.०१.२००९ अन्वये १ नगांचा रु.२,३२,८१६.३५ चा पुरवठा आदेश देण्यात आला असल्यामुळे सदरची मागणी रद्द करुन उर्वरित इन्डोस्कोप व कॅमेऱ्यासाठी कार्ल स्टोअर्सचे अधिकृत विक्रेते मे.चिमको बायोमेडीकल,मुंबई यांना फॅक्स करुन त्यांचे अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन त्यांनी दि.३०.०१.२००९ चे पत्रान्वये उर्वरित इन्डोस्कोप व कॅमेरासाठी रु.७,११,७९५/- इतका खर्च कळविला होता.

सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०८/०३/२००९ निर्णय क्र.२७९ अन्वये अंदाजे रु.७,११,७९५/- चे खर्चास व सदरची खरेदी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवण्यास मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी दि. ०८/०३/२००९ चे मा. व्यवस्थापन समिती सभेतील मंजुरीन्वये जनसंपर्क कार्यालयामार्फत विहीत पध्दतीने टाईम्स ऑफ इंडिया, मुंबई व पुणे आवृत्ती या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.०६/०४/२००९ ते २५/०४/२००९ अखेर शिर्डी कार्यालयात ३ तर मुंबई कार्यालयात निविदा ७ निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या व दि. २७/०४/२००९ अखेर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत होती. तसेच सदरचे जाहिरातीबाबत १० पुरवठा धारक / अधिकृत विक्रेत्यांना इकडील पत्र क्र.३८९८ दि. ०४/०४/२००९ अन्वये अवगत करण्यात आले होते.

त्यास अनुसरुन तीन निविदा प्राप्त झालेल्या होत्या. ते खालीलप्रमाणे -

1. M/s.Chimco Bio-Medical Engi.Co.,Mumbai
2. M/s.Endosys International , Mumbai

3. M/s.Eagle Medical System Pvt. Ltd., New Delhi

वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या सिलबंद तांत्रिक निविदा दि.१७.०५.२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला आहे. तुलनात्मक तक्त्यातील अ.नं.१ व २ हे ई.एन.टी. विभागाची मागणी असल्याने त्यावर डॉ.कुलकर्णी यांचा अभिप्राय तर अ.नं.३ हा जनरल सर्जरीसाठी लागणार असल्याने डॉ.राम नाईक यांचा अभिप्राय घेण्यात आला आहे. दोन्ही डॉक्टरांनी Karl Storz कंपनीचे इन्डोस्कोपीक इन्स्ट्रुमेंट व कॅमेरा घेण्याची शिफारस केलेली आहे. कारण आपणाकडे पुर्वीचे इन्स्ट्रुमेंट ही देखील Karl Storz कंपनीचे आहे.

तरी उपरोक्त खरेदीकामी प्राप्त ३ सिलबंद Commercial Bid आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५९५** **उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद Commercial Bid आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा, असें ठरलें.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.०७** **श्री साईबाबा रुग्णालयातील C.V.T.S विभागासाठी कार्डीयाक आऊटपूट मॉनीटर खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात कार्डीअॅक ऑपरेशन थिएटर विभागास एक कार्डीअॅक आऊटपुट मॉनीटरची आवश्यकता असले बाबत सदर विभागाने त्यांचे दि.२०/०३/२००७ चे पत्रान्वये कळविले होते.

सध्या आपणाकडे अशा प्रकारचा मॉनीटर नाही. त्यामुळे १ नग मॉनीटर खरेदी करावा असे मत आहे. त्यासाठी अंदाजे रु.७,२५,०००/- चे खर्चाचा प्रस्ताव दि.२२/०९/२००७ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. सदरचे खरेदीकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहीरात देऊन निविदा मागविणे बाबत निर्णय झालेला होता.

त्यास अनुसरुन उपरोक्त कार्डीयाक आऊटपुट मॉनीटर खरेदीकामी सकाळ- पुणे (टुडे), महाराष्ट्र टाईम्स- मुंबई, दैनिक गावकरी-नाशिक या वतर्मान पत्रात जाहिरात देण्यात येऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतू याकामी एकच सिलबंद निविदा प्राप्त झालेली होती. जास्तीत जास्त निविदा मिळणेकामी दि.२०.०३.२००८ चे मंजूर टिपणीन्वये पुन्हा वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती परंतु दुसऱ्या जाहिरातीस अनुसरुन एकही निविदा प्राप्त झाली नव्हती . कार्डीयाक विभागातून डॉ. विद्युत कुमार सिन्हा यांनी दि.०५/०९/२००८ रोजीचे पत्रान्वये सदर मॉनिटरची मागणी पुन्हा केलेली होती.

त्यानुसार सदरचे कार्डीयाक आऊटपुट मॉनीटर खरेदीकामी विविध कंपन्या / अधिकृत विक्रेते यांचेकडून थेट कोटेशन मागविणेकामी दि.१७/०५/२००९ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. सदरचे खरेदीकामी उत्पादक कंपन्या / अधिकृत विक्रेतेकडून त्यांचे सिलबंद दरपत्रक मागविणेस मान्यता मिळालेली आहे .

त्यानुसार इकडील पत्र क्र. ६५८५ दि. ०१/०६/२००९ अन्वये एकुण ०६ उत्पादक कंपन्या/ अधिकृत विक्रेते कडून दि.१५.०६.२००९ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन ५ कोटेशन प्राप्त झालेले आहेत, ते खालीलप्रमाणे -

01. M/s.Hi Tech Surgical System, Mumbai
02. M/s. Kanchan Drugs Pvt.Ltd., Pune
03. M/s. Lab Medica, Mumbai
04. M/s.Samarth Surgical & Healthcare Company, Kolhapur
05. M/s.Zenith Surgical Company, Mumbai

तरी वरीलप्रमाणे प्राप्त ५ बंद कोटेशन समक्ष उघडून मिळणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.५९६** **उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०५ कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले या कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा, असें ठरलें.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.०८** **पाणीपुरवठा विभाग-सेंटेड फिनेल व लिक्वीड सोप तयार करणेकामी आवश्यक असणारे केमिकल्स खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०५.०४.२००९ मधील निर्णय क्र.३४७ नुसार पाणीपुरवठा विभागासाठी सेंटेड फिनेल व लिक्वीड सोप तयार करणेकामी आवश्यक असणारे केमिकल्स खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.४,४६,२८७/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशिल | मागणी |
|---|---|---|
| ०१ | TRO OIL (७५%) | १४०० लिटर्स |
| ०२. | ACID SLURRY (७५%) | १००० किलो |
| ०३. | COSTIC SODA | ४७५ किलो |

| | | |
|---|---|---|
| ०४. | PINE OIL ( A Grade) | २२७५ लिटर्स |

त्यानुसार संस्थान जा.क्र.एसएसएस/खरेदी-पा.पु./७२४२/२००९ दि.१२.०६.२००९ अन्वये दरपत्रकांची मागणी करणेत आलेली होती. प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव व गांव | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| ०१. | विजय एन्टरप्राईजेस, औरंगाबाद | १९००४/१८.०६.२००९ |
| ०२. | विजयलक्ष्मी ट्रेडर्स, नाशिक | १९१४७/१९.०६.२००९ |
| ०३. | मेसॉन ट्रेडर्स, नाशिक | १९१८४/२०.०६.२००९ |
| ०४. | साई प्रॉडक्टस, कोपरगांव | १९२१४/२०.०६.२००९ |

तसेच खालील दरपत्रकांचे पाकिटावर साहित्याचा उल्लेख नसल्याने उघडणेत आलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव व गांव | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| ०१. | सौरभ एंटरप्राईजेस, औरंगाबाद | १९५९०/२३.०६.२००९ |
| ०२. | मिनीटेक, मुंबई | १९६३१/२३.०६.२००९ |
| ०३. | निर्मल केमिकल्स, कोपरगांव | १९७५७/२४.०६.२००९ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले दरपत्रके आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता दरपत्रकधारकांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| | तपशील | TRO OIL (७५%) | ACID SLURRY (७५%) | COSTIC SODA | PINE OIL (A Grade) |
|---|---|---|---|---|---|
| कंपनीचे नाव | मागणी | १४०० लिटर्स | १००० लिटर्स | ४७५ लिटर्स | २२७५ लिटर्स |
| विजयलक्ष्मी ट्रेडर्स, नाशिक | मुळ दर | ६०.०० | ७५.०० | ३५.०० | ११०.०० |
| | व्हॅटसह दर | **६२.४०** | **७८.००** | ३६.४० | १२३.७५ |
| साई प्रॉडक्टस, कोपरगांव | मुळ दर | ७४.५० | १०८.५० | ३४.०० | १२८.०० |
| | व्हॅटसह दर | ७४.५० | १०८.५० | ३४.०० | १२८.०० |
| सौरभ एंटरप्राईजेस, औरंगाबाद | मुळ दर | ६१.०० | ९५.०० | २३.०० | ११०.०० |
| | व्हॅटसह दर | ६३.४४ | ९८.८० | **२३.९२** | १२३.७५ |
| मिनीटेक, मुंबई | मुळ दर | ६८.०० | ७६.०० | ३९.०० | १०५.०० |
| | व्हॅटसह दर | ७०.७२ | ७९.०४ | ४०.५६ | **११८.१३** |
| निर्मल केमिकल्स, कोपरगांव | मुळ दर | --- | १००.०० | ३६.०० | ११०.०० |
| | व्हॅटसह दर | --- | १०४.०० | ३७.४४ | १२३.७५ |
| विजय एन्टरप्राईजेस, औरंगाबाद | मुळ दर | मागणीप्रमाणे नाही. | | | |
| | व्हॅटसह दर | | | | |
| मेसॉन ट्रेडर्स, नाशिक | मुळ दर | मागणीप्रमाणे नाही. | | | |
| | व्हॅटसह दर | | | | |

**निर्णय क्र.५९७ उपरोक्त तुलनात्मक तक्ता पहाता अ.नं. १ व २ साठी विजयलक्ष्मी ट्रेडर्स, नाशिक, अ.नं. ३ साठी सौरभ एंटरप्राईजेस, औरंगाबाद व अ.नं. ४ साठी मिनीटेक, मुंबई यांचे दर न्युनतम असल्याने त्यांना पुरवठा आदेश देणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.०९ द्वारावती इमारतीतील रुमसाठी फर्निचर खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०३.०१.२००९ मधील निर्णय क्र.६९ नुसार द्वारावती इमारतीतील रुमसाठी आवश्यक असणारे फर्निचर खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.२१,५२,५००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार काही साहित्याची खरेदी ही मा.विश्वस्तांचे मान्यतेने द्वारावतीचे प्रशासकीय अधिकारी यांनी केलेली असून उर्वरीत साहित्यासाठी जा.क्र. ४०३५ दि.०९.०४.२००९ अन्वये दरपत्रकांची मागणी करणेत आलेली होती. मात्र साहित्याचे वर्णन अपुर्ण असल्याने एकही दरपत्रक प्राप्त झालेले नव्हते, त्यामुळे द्वारावती विभागास पत्र देऊन साहित्याचे सविस्तर वर्णन मागविणेत आलेले असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशिल | वर्णन | मागणी |
|---|---|---|---|
| ०१ | प्लॅस्टीक खुर्च्या | हाताच्या, निलकमल कंपनी | ७००नग |
| ०२. | पाण्याचे जग | क्षमता ५ लिटर, फायबरचे | ९० नग |
| | | क्षमता ५ लिटर, स्टीलचे, झाकणासह | २५० नग |
| ०३. | स्टीलचे ग्लास | १८ गेजचे, ६ इंच उंची, गोलसाईज | ४०० नग |
| ०४. | स्टील रॅक | ६ कप्पे असलेली, एमएस शेल्फ, कॉर्नर प्लेटसह, साईज ३६ इंच x १८ इंच<br>अँगल साईज ४०x४०x२mm, २.५ मीटर | १०० नग |

| | | | |
|---|---|---|---|
| ०५. | वेटींग खुर्च्या | ३ सीटर, गोदरेज कंपनी | २० नग |
| | | २ सीटर, गोदरेज कंपनी | २० नग |

त्यानुसार संस्थान जा.क्र.एसएसएस/खरेदी-बांधकाम/७८३२/२००९ दि.२४.०६.२००९ अन्वये फेरदरपत्रकांची मागणी करणेत आलेली होती. प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा तपशील खालीलप्रमाणे-

| **अ.नं.** | **कोटेशनधारकाचे नाव व गांव** | **आवक नंबर व दिनांक** |
|---|---|---|
| ०१. | रोहन एन्टरप्राईजेस, अहमदनगर | २०६४५/०१.०७.२००९ |
| ०२. | अभय ट्रेडर्स, औरंगाबाद | २०६४६/०१.०७.२००९ |
| ०३. | अमोल फर्निचर ॲण्ड किचन वेअर, सिन्नर | २०७७४/०२.०७.२००९ |
| ०४. | श्रद्धा ट्रेडर्स, अहमदनगर | २०७७६/०२.०७.२००९ |
| ०५. | उषा ट्रेडींग कंपनी, नाशिक | २१०८७/०४.०७.२००९ |
| ०६. | साई एन्टरप्राईजेस, श्रीरामपूर | २१०८८/०४.०७.२००९ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले दरपत्रके आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता दरपत्रकधारकांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | तपशील | मागणी | रोहन एन्टरप्राईजेस, अ.नगर | अभय ट्रेडर्स, औरंगाबाद | श्रद्धा ट्रेडर्स, अ.नगर | उषा ट्रेडींग कंपनी, नाशिक | साई एन्टरप्राईजेस, श्रीरामपूर | सोमनाथ गंगाधर रासणे, अ.नगर | अमोल फर्निचर ॲण्ड किचन वेअर, सिन्नर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | व्हॅटसह मुळ दर रु. | व्हॅटसह मुळ दर रु. | व्हॅटसह मुळ दर रु. | व्हॅटसह मुळ दर रु. | व्हॅटसह मुळ दर रु. | व्हॅटसह मुळ दर रु. | मुळ दर रु. |
| १ | प्लॅस्टीक खुर्च्या हाताच्या, निलकमल कंपनी | ७०० नग | (मॉ.न. २००५) ३५९/- | (मॉ.न. २०६०) ४९०/- | (मॉ.न. २०३४) ३१९/- | (मॉ.न. ७००१) ३४६/- | (मॉ.न. २०४१) २६०/- | (मॉ.न. २०५१) ३९६/- | Not Appl. |
| | | | (मॉ.न. २०५१) ३१२/- | | (मॉ.न. २०६१) २८०/- | (मॉ.न. २००५) ४२९/- | (मॉ.न. २०९७) २८६/- | | |
| | | | (मॉ.न. २०६१) २७२/- | | (मॉ.न. २०६०) २७७/- | (मॉ.न. २०४०) २५५/- | (मॉ.न. २०७१) २९९/- | | |
| | | | (मॉ.न. २०६०) २७०/- | | (मॉ.न. २०५१) ३२०/- | | | | |
| | | | (मॉ.न. २०४१) २३३/- | | (मॉ.न. २०४५) ३२९/- | | | | |
| | | | (मॉ.न. २०३४) ३१४/- | | (मॉ.न. २०४१) २४०/- | | | | |
| | | | (मॉ.न. २०४५) ३२५/- | | (मॉ.न. २०६०) ३६६/- | | | | |
| २ | पाण्याचे जग क्षमता ५ लिटर, फायबरचे | ९० नग | --- | --- | --- | --- | (३ लि.क्षमता) ६९/- | २१६/- | |
| | पाण्याचे जग क्षमता ५ लिटर, स्टीलचे, झाकणा सह | २५० नग | --- | --- | --- | --- | (३ लि.क्षमता) २४९/-<br>(२ लि.क्षमता) १९९/- | (२ लि.क्षमता) २४३/- | |
| ३ | स्टीलचे ग्लास १८ गेजचे, ६ इंच उंची, गोलसाईज | ४०० नग | --- | --- | --- | --- | (प्रती नग) २९/- | (१०० ग्रॅ. प्रती नग ) १५.३० | |
| ४ | स्टील रॅक ६ कप्पे असलेली, एमएस शेल्फ, कॉर्नर प्लेटसह, साईज ४० x ४० x २ mm, २.५ मीटर | १०० नग | २,२२५/- | ३,१५०/- | २,५७५/- | २,७५५/- | ३,४९९/- | | |
| ५. | वेटींग खुर्च्या ३ सीटर, गोदरज कंपनी | २० नग | ५,४४२/- (हाताच्या) ६,५९६/- | ७,४००/- | --- | ५,५५०/- (हाताच्या) ६,७२५/- | ६,०४२/- (हाताच्या) ७,३२९/- (Trip Model) ४,९९९/- | ५,४९०/- | |
| | वेटींग खुर्च्या २ सीटर, गोदरज कंपनी | २० नग | ४,२१७/- (हाताच्या) ५,०११/- | ६,९००/- | --- | ४,६९०/- (हाताच्या) ५,९२५/- | ४,६८६/- (हाताच्या) ५,५६९/- (Trip Model) ३,७५९/- | ४,१८५/- | |

**निर्णय क्र.५९८ उपरोक्तप्रमाणे उघडण्यात आलेल्या दरपत्रकधारकांकडून नमुने बोलावून पुढील निर्णय घेणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं. १० संस्थानच्या कनिष्ठ महाविद्यालयाकरीता साऊंडप्रुफ जनसेट खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून निविदाधारकांशी चर्चा /वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** संस्थानच्या कनिष्ठ महाविद्यालयाकरीता साऊंडप्रुफ जनसेट खरेदी करणेकामी व येणा-या रक्कम रु.६,८८,१५७/- इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८-०३-२००९ चे सभेतील आयत्या वेळचा विषय क्र.२१ निर्णय क्र.२८९ अन्वये मान्य करण्यात आला आहे. याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. दिनांक १५-०६-२००९ ते दिनांक ३०-०६-२००९ असा टेंडर विक्री कालावधी ठेवण्यात आला होता. टेंडर सादर करण्याची मुदत दिनांक ०१-०७-२००९ अखेर अशी ठेवण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या टेंडरसचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.पॉवरीका लिमिटेड, नाशिक |
| ०२ | मे.शिवम इलेक्ट्रीकल्स, पुणे. |
| ०३ | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक |
| ०४ | मे. व्दारकाधिश इलेक्ट्रीकल्स्, नाशिक |

उपरोक्तप्रमाणे संस्थानच्या कनिष्ठ महाविद्यालयाकरीता साऊंडप्रुफ जनसेट खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

उपस्थित सर्व निविदासादरकर्त्यांना एकत्रित सभागृहात बोलावून त्यांनी देऊ केलेल्या दरात आणखी सुट देणार किंवा कसे हे बंद पाकीटात देण्याबाबत सांगण्यात आले.

निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेले सुधारित दराचे बंद पाकीटे उघडण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे सुधारित दर देऊ केले.

| अ.नं | निविदासादरकर्त्यांचे नांव | निविदेतील दर रुपये | देऊ केलेले सुधारित दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे. व्दारकाधिश इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ७,००,९३१.०० | ६,७६,३९८.०० |
| ०२ | मे.शिवम इलेक्ट्रीकल्स, पुणे. | ७,००,००७.०० | ५,६०,००६.०० |
| ०३ | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ६,३२,९२४.०० | ५,८५,४५५.०० |
| ०४ | मे.पॉवरीका लिमिटेड, नाशिक | ६,६९,०९४.०० | ६,३५,६३९.०० |

**निर्णय क्र.५९९ यावर सविस्तर चर्चा होऊन,सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.११ श्री साई मंदिरात श्रींच्या मुर्तीच्या मागील एक्झिट दरवाजांमध्ये जाळीचे शटर बसविणेबाबत प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून कोटेशन्सधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**प्रस्ताव-** श्री साई मंदिरात श्रीं च्या मूर्तीच्या मागील एक्झिट दरवाजांमध्ये जाळीचे शटर बसविणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ४,९८,०००.०० इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८-०३-२००९ चे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आयत्या वेळचा विषय क्र.१९ निर्णय क्र. २८७ अन्वये मान्य करण्यात आला असून या कामासाठी कोटेशन मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार पत्र पाठवून कोटेशन मागविण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ०३ कोटेशन प्राप्त झाले आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.एव्हीएन्स इनोव्हेशन्स टेक्नॉलॉजी, प्रा.लि., पुणे. |
| ०२ | मे. अनी स्टील ट्रेडर्स, पुणे. |
| ०३ | मे. ए.मथुराभाई ॲण्ड को., पुणे. |

उपरोक्तप्रमाणे श्री साई मंदिरात श्रीं च्या मूर्तीच्या मागील एक्झिट दरवाजांमध्ये जाळीचे शटर बसविणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून कोटेशनधारकांशी वाटाघाटी/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

उपस्थित सर्व कोटेशन्ससादरकर्त्यांना एकत्रित सभागृहात बोलावून त्यांनी देऊ केलेल्या दरात आणखी सुट देणार किंवा कसे हे बंद पाकीटात देण्याबाबत सांगण्यात आले.

कोटेशन्ससादरकर्त्यांनी देऊ केलेले सुधारित दराचे बंद पाकीटे उघडण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे सुधारित दर देऊ केले.

| अ.नं | कोटेशन्ससादरकर्त्यांचे नांव | कोटेशन्समधील दर रुपये | देऊ केलेले सुधारित दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे.एव्हीएन्स इनोव्हेशन्स टेक्नॉलॉजी, प्रा.लि., पुणे. | ४,९८,२२६.०० | ४,९३,२४४.०० |
| ०२ | मे. अनी स्टील ट्रेडर्स, पुणे. | ५,३८,२६२.५० | अनुपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | मे. ए.मथुराभाई ॲण्ड को., पुणे. | ५,१३,५५०.५० | ५,१२,२६७.०० |

**निर्णय क्र.६०० यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.एव्हीएन्स इनोव्हेशन्स टेक्नॉलॉजी, प्रा.लि.,पुणे यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा तसेच श्री साई मंदिरात आवश्यक असणाऱ्या इतर दरवाजांमधून अशा प्रकारचे जाळीचे शटर दरवाजा बसविणेसाठी व याच दरात जर एव्हीएन्स इनोव्हेशन्स टेक्नॉलॉजी, प्रा.लि.,पुणे हे जाळीचे शटर दरवाजा पुरविण्यास तयार असतील तर श्री साई मंदिरात व इतर ठिकाणी संबंधित पार्टीकडून जाळीचे शटर दरवाजे बसवून घेण्याचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले, याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.१२ श्रीसाईबाबा द्वै-मासिक मराठी ,हिंदी व इंग्रजी अंक छपाई कामाचे दरपत्रके उघडून निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** दि.१८.१०.२००८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.८१२ नुसार संस्थान प्रकाशित पुस्तके छपाई करणे, विक्री किंमती ठरविणे वगैरे रुटीनच्या कामाची कार्यालयीन पद्धती निश्चित करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन संस्थान प्रकाशित श्री साईलीला अंक मराठी व हिंदी-इंग्रजी छपाईकामी मुंबई येथील ९ निवडक प्रेसधारकांना जा.नं.एसएसएस/वशी/६७२८/दि.०३.०६.२००९ अन्वये दरपत्रकाचे विहीत फार्म पाठविण्यात येऊन ती दि.२५.०६.२००९ अखेर जमा करणेबाबत कळविण्यात आले होते.

श्री साईलीला द्वैमासिक गुजराथी अंक छपाई कामाचे दरपत्रक ९ निवडक प्रेसधारकांपैकी ०५ मुदतीत प्रेसधारकांची सीलबंद दरपत्रके प्राप्त झाली आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | मे.सेफ ऑफसेट प्रा.लि.,मुंबई |
| ०२ | मे.न्यु राधारमण प्रिंटींग प्रेस, मुंबई |
| ०३ | मे.मॅग्ना ग्राफिक्स (इंडिया) लि.,मुंबई |
| ०४ | मे.ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई |
| ०५ | मे.मदर्स् ग्राफिक्स (इंडिया) प्रा.लि., मुंबई |

वरील ५ निवडक प्रेसधारकांचे सिलबंद दरपत्रके आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता निविदासादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नांव | श्री साईलिला द्वैमासिक अंक मराठी (१०,००० x ५ अंक) | श्री साईलिला द्वैमासिक अंक हिंदी/ इंग्रजी (१६,००० x ५ अंक) | श्री साईलिला दसरा विशेषांक मराठी | श्री साईलिला दसरा विशेषांक हिंदी/ इंग्रजी |
|---|---|---|---|---|---|
| | छपाई संख्या | ५०,००० | ८०,००० | १०,००० | १६,००० |
| ०१ | मे.सेफ ऑफसेट प्रा.लि.,मुंबई | ११.४० | १०.३० | १९.४५ | १७.२५ |
| ०२ | मे.न्यु राधारमण प्रिंटींग प्रेस, मुंबई | १३.८० | १२.६५ | २३.९५ | २१.५५ |
| ०३ | मे.मॅग्ना ग्राफिक्स (इंडिया) लि.,मुंबई | १२.५६ | ११.२४ | २१.५३ | १९.१५ |
| ०४ | मे.ऑस्कर ऑफसेट प्रा.लि., मुंबई | ११.४० | १०.३० | १९.४३ | १७.३० |
| ०५ | मे.मदर्स् ग्राफिक्स (इंडिया) प्रा.लि., मुं | **१०.४०** | **०९.२७** | **१७.९३** | **१५.७२** |

**निर्णय क्र.६०१ यावर सविस्तर चर्चा होऊन मे.मदर्स् ग्राफिक्स (इंडिया) प्रा.लि., मुंबई यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा. याकामी येणारे रुपये १६,९२,४२०/-चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्रकाशने विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१३ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना गणवेष खरेदीकामी प्राप्त झालेल्या कोटेशन्सवर चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालय व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचा-यांना गणवेष खरेदी करणेकामी मा.व्यवस्थापन सभा दिनांक ०८/०२/२००९ विषय क्र.३३ निर्णय क्र.१०५ अन्वये एकुण रु.३,७२,०००/- चे खर्चास व विहीत पध्दतीने कोटेशन मागवण्यास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार इकडील पत्र क्र.२३१३ दिनांक २५/०२/२००९ अन्वये एकुण ०७ पुरवठा धारकांकडून दिनांक १४/०३/२००९ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यापैकी तीन पुरवठाधारकांकडुन कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

१- मे. मोटा गारमेंट, बारामती

२- मे.सारडा इंटेरिअर, अहमदनगर

३- मे. बांठीया एन्टरप्रायजेस, पुणे

उपरोक्तप्रमाणे तीन पुरवठा धारकांचे कोटेशन दिनांक ०५/०४/२००९ मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आले असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | तपशील | आवश्यक संख्या | निवडलेला रंग | कापडाचा प्रकार | मुळ दर रुपये | वाटाघाटी नंतरचे दर रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| | **फुल ॲप्रन** | **२५२** | **सफेद** | | | |
| | मे. मोटा गारमेंट,बारामती | | | **१**-बेलमोंट शुटींग | १९८.०० | |
| | मे.सारडा इंटेरिअर, अहमदनगर | | | **१**-एस कुमार-गोल्ड माइन पॉलिस्टर स्पन (शर्टींग) रु.४५/-प्र.मी. (अंदाजे २.५मी x४५रु.मी=११२.५०+शिलाई रु.७५/=१८७.५०)<br>**२**-एस कुमार-सी किंग पॉलिस्टर कॉटन (शर्टींग) रु.५३/-प्र.मी.(अंदाजे २.५मी x५३ रु.मी= १३२.५०+ शिलाई रु.७५/= २०७.५०) | १८७.५०<br>२०७.५० | |
| | मे. बांठीया एन्टरप्रायजेस पुणे | | सफेद | **१**-एसकुमार मील-बेलमोंट<br>**२**-सुझुकी मील प्लेन ट्रोव्हेन<br>**३**-सुझूकी मील गाबर्डइन हेवी | २२३.६०<br>१७१.६०<br>१८७.२० | २००.००<br>१६०.००<br>१८५.०० |
| २ | **हाफ ॲप्रन** | **५०६** | **सफेद** | | | |
| | मे. मोटा गारमेंट,बारामती | | सफेद | बेलमोंट शुटींग | १८५.०० | |
| | मे.सारडा इंटेरिअर, अहमदनगर | | | **१**-एस कुमार-गोल्ड माइन पॉलिस्टर स्पन (शर्टींग) रु.४५/-प्र.मी. (अंदाजे २ मी x४५रु.मी=रु.९०/-+शिलाई रु.७५/= १६५.००)<br>**२**-एस कुमार-सी किंग-पॉलिस्टर कॉटन (शर्टींग)रु.५३/-प्र.मी.(अंदाजे२ मीx५३रु.मी=१०६/-+शिलाई रु.७५/= १८१.००) | १६५.००<br>१८१.०० | |
| | मे. बांठीया एन्टरप्रायजेस पुणे | | सफेद | **१**-एसकुमार मील-बेलमोंट<br>**२**-सुझुकी मील प्लेन ट्रोव्हेन<br>**३**-सुझूकी मील गाबर्डइन हेवी | १९८.६४<br>१५६.००<br>१६८.४८ | १९०.००<br>१५०.००<br>१६०.०० |
| | **साडी/पेटीकोट/ ब्लाऊज पीस** | **४०** | **बदामी** | | | |
| | मे. मोटा गारमेंट,बारामती | | बदामी | साडी - रु.१९५/-<br>पेटीकोट - रु.७५/-<br>ब्लाऊज पीस- रु.४८/- } | ३१८/- | |
| | मे.सारडा इंटेरिअर,अहमदनगर | | बदामी | N.Q. | | |
| | मे.बांठीया एन्टरप्रायजेस, पुणे | | | N.Q. | | |
| | **फुल शर्ट/पॅट** | **१८** | | | | |
| | मे. मोटा गारमेंट ,बारामती | | | बेलमोंट शुटींग | ३९५.०० | |
| | मे.सारडा इंटेरिअर अहमदनगर | | | १-अ- शर्टसाठी -एस कुमार- गोल्ड माइन पॉलिस्टर स्पन (शर्टींग) रु.४५/-x अंदाजे २.५मी. =११२.५०<br>ब- पॅन्टसाठी -एस कुमार रॉयल्टी- पॉलिस्टर व्हिसकॉस (शुटींग) रु.११३/-x अंदाजे १.५ मी.=१६९.५०<br>क- शिलाई = १६०.०० | ४४२.०० | |
| | | | | २ -अ- शर्टसाठी -एस कुमार- गोल्ड माइन पॉलिस्टर स्पन (शर्टींग) रु.४५/-x अंदाजे २.५मी. = ११२.५०<br>ब - पॅन्टसाठी-एस कुमार ट्रिपल नाईन-पॉलिस्टर व्हिसकॉस (शुटींग) रु.१४४/-x अंदाजे १.५मी. =२१६.००<br>क- शिलाई =१६०.०० | ४८८.५० | |
| | | | | ३- अ-शर्टसाठी-एस कुमार सी किंग पॉलिस्टर कॉटन (शर्टींग) रु.५३/-xअंदाजे २.५ मी. =१३२.५०<br>ब- पॅन्टसाठी -एस कुमार रॉयल्टी- पॉलिस्टर व्हिसकॉस (शुटींग) रु.११३/-xअंदाजे १.५ मी. =१६९.५०<br>क- शिलाई =१६०.०० | ४६२.०० | |
| | | | | ४- अ- शर्टसाठी-एस कुमार सी किंग पॉलिस्टर कॉटन (शर्टींग) रु.५३/-xअंदाजे २.५ मी. =१३२.५०<br>ब- पॅन्टसाठी-एस कुमार ट्रिपल नाईन-पॉलिस्टर व्हिसकॉस (शुटींग) रु.१४४/xअंदाजे १.५मी. = २१६.००<br>क- शिलाई = १६०.०० | .<br>५०८.५० | |
| | मे. बांठीया एन्टरप्रायजेस, पुणे | | ट्राऊझर | सुपरफाइन क्वालिटी | ४५८.६४ | ४३०.०० |
| ५ | **हाफ शर्ट/पॅन्ट** | **११०** | | | | |
| | मे. मोटा गारमेंट ,बारामती | | | बेलमोंट शुटींग | ३७५.०० | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मे.सारडा इंटेरिअर अहमदनगर | | | १-अ- शर्टसाठी -एस कुमार- गोल्ड माइन पॉलिस्टर स्पन (शर्टींग) रु.४५/-x अंदाजे २ मी. =९०.००<br>ब- पॅन्टसाठी -एस कुमार रॉयल्टी- पॉलिस्टर व्हिसकॉस (शुटींग) रु.११३/-x अंदाजे १.५ मी. =१६९.५०<br>क- शिलाई = १६०.०० | ४१९.५० | |
| | | | | २ -अ- शर्टसाठी -एस कुमार- गोल्ड माइन पॉलिस्टर स्पन (शर्टींग) रु.४५/-xअंदाजे २मी. = ९०.००<br>ब - पॅन्टसाठी-एस कुमार ट्रिपल नाईन-पॉलिस्टर व्हिसकॉस (शुटींग) रु.१४४/-xअंदाजे १.५मी. = २१६.००<br>क- शिलाई =१६०.०० | ४६६.०० | |
| | | | | ३- अ-शर्टसाठी-एस कुमार सी किंग पॉलिस्टर कॉटन (शर्टींग) रु.५३/-xअंदाजे २ मी. =१०६.००<br>ब- पॅन्टसाठी -एस कुमार रॉयल्टी- पॉलिस्टर व्हिसकॉस (शुटींग) रु.११३/-xअंदाजे १.५ मी. =१६९.५०<br>क- शिलाई = १६०.०० | ४३५.५० | |
| | | | | ४- अ- शर्टसाठी-एस कुमार सी किंग पॉलिस्टर कॉटन (शर्टींग) रु.५३/-xअंदाजे २ मी. =१०६.००<br>ब- पॅन्टसाठी-एस कुमार ट्रिपल नाईन-पॉलिस्टर व्हिसकॉस (शुटींग) रु.१४४/-x अंदाजे १.५मी. = २१६.००<br>क- शिलाई = १६०.०० | ४८२.०० | |
| | मे. बांठीया एन्टरप्रायजेस, पुणे | | ट्राऊझर | सुपरफाइन क्वालिटी | ४४७.२० | ४१०.०० |
| | **सलवार/कुडता** | **३६४** | | | | |
| | मे. मोटा गारमेंट ,बारामती | | | बेलमोंट शुटींग | ३७५.०० | |
| | मे.सारडा इंटेरिअर, अहमदनगर | | | १-एस कुमार-गोल्ड माइन पॉलिस्टर स्पन (शर्टींग) रु.४५/-मीटर अंदाजे ४ मी.x४५/-१८०+शिलाई रु.७५/-<br>२-एस कुमार-सी किंग पॉलिस्टर कॉटन (शर्टींग) रु.५३/-मी. अंदाजे ४ मी.x५३/- + शिलाई ७५/- | २५५.००<br>२८७.०० | |
| | मे. बांठीया एन्टरप्रायजेस, पुणे | | बदामी | | २७०.४० | २७०.४० |

तरी उपरोक्तप्रमाणे कोटेशन धारकांना नमुना घेऊन मा.व्यवस्थापन समिती/उपसमिती सभेपुढे चर्चा/वाटाघाटीसाठी बोलवुन निर्णय घेणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६०२ वरीलपैकी फक्त मे. बांठीया एन्टरप्रायजेस, पुणे यांचे प्रितिनिधी हजर होते. पुढील सभेत उर्वरित निविदाधारकांना त्यांचेकडील नमुन्यासह आमंत्रित करुन निर्णय घेणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

---

**विषय नं.१४ विरार होमिओपॅथिक कॉलेज, विरार येथील इंटर्न घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णयानुसार श्री साईनाथ रुग्णालयात विरार होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज, विरार यांचेकडील ०८ इंटर्न घेणेस मान्यता आहे. त्यानुसार सध्या श्री साईनाथ रुग्णालयात विरार होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज, विरार यांचेकडील ०८ इंटर्न कार्यरत आहेत. सदर इंटर्नस हे विनामोबदला सेवा देतात. संस्थानमार्फत फक्त त्यांचे जेवणाची व रहाणेची मोफत व्यवस्था केली जाते.

विरार होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज, विरार यांनी त्यांचे जा.क्र.व्ही.एच.एम.सी./ १८१, दि.१९.०५.२००९ अन्वये श्री साईनाथ रुग्णालयास ०८ ऐवजी १६ होमिओपॅथीक इंटर्न पाठविणेस परवानगी द्यावी म्हणून विनंती केलेली आहे.

श्री साईनाथ रुग्णालयात एम.बी.बी.एस. इंटर्नच्या १६ जागा मंजूर असून, सदर इंटर्न एम.यू.एच.एस. विद्यापीठ, नाशिक कॉलेजकडील, प्रवरा मेडिकल कॉलेजमार्फत पाठविणेत येत असत त्यांना दरमहा रु.१,७००/- मानधन दिले जात आहे. परंतू आता प्रवरा मेडिकल कॉलेज, लोणी हे डीमड युनिव्हर्सिटी असलेने प्रवरा मेडिकल कॉलेज त्यांचेकडील इंटर्न श्री साईनाथ रुग्णालयात पाठविणार नाहीत.

तसेच रुग्णालयातील रुग्णांची मोठी संख्या लक्षात घेता, अशा प्रकारचे इंटर्नसची आवश्यकता असून रुग्णालयातील एम.यू.एच.एस. विद्यापीठ मेडिकल कॉलेजकडील प्रवरा मेडिकल कॉलेजमार्फत पाठविले जात असलेले इंटर्न बंद झाल्यास, तदनंतर रुग्णालयात रुग्णांची गैरसोय होऊ नये याकरिता इंटर्नची आवश्यकता भासणार आहे.

तरी विरार होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज, विरार येथील पुर्वीचे ०८ + नविन ०८ असे एकूण १६ इंटर्न पुर्वीच्याच अटी-शर्तीवर श्री साईनाथ रुग्णालयात घेणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६०३ सदरहू विषय स्थगित ठेवण्यात आला.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१५ एमआरआय मशिनचे युपीएस दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे रेडीओलॉजी विभागात मा. व्य. समिती सभेच्या दि. १४/१०/२००६ चे सभेतील निर्णयान्वये मे. सिमेन्स ली. मुंबई यांचेकडुन Magnetom Avanto एम. आर. आय. मशीन व एक १२० के.व्ही.ए. यु.पी.एस. एकुण रु. ५,०५,००,००/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आले आहे. सदरचे मशीन श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दि. ०१/०६/२००७ रोजी कार्यान्वीत करणेत आले असुन कंपनीने सदर मशीनकरीता दिलेला दोन वर्षांचा वॉरंटी कालावधी दि. ३१/०५/२००९ रोजी संपला आहे. सदर मशीनचे दुरुस्ती व देखभालीकरीता पुरवठा आदेशातील करारानुसार वार्षीक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेत येत आहे. सदर कालावधीत एम. आर. आय. मशीनचे दुरुस्तीकरीता आवश्यक असणारे स्पेअर पार्टस् कंपनी स्वखर्चाने बदलणार आहे.परंतु कन्झुमेबल पार्टस् (उदा.बॅटरी,स्वीचगियर इ.)संस्थानचे खर्चाने बदलावयाचे आहेत.

सदर १२० के.व्ही.ए. यु. पी. एस. दि. २०/०६/२००९ पासुन वारंवार बंद पडत असलेमुळे मे.सोकोमेक यु.पी.एस. इंडीया प्रा. ली. मुंबई यांना कळविणेत आले होते. त्यानुसार कंपनीचे इंजिनीअरने दि. २३/०६/२००९ रोजी यु. पी. एस. ची तपासणी करुन मशीनच्या एकुण ३२ बॅटरीज खराब झाल्या असल्याचे व त्या तातडीने बदलणेची आवश्यकता असल्याचे त्यांचे सर्व्हिस रिपोर्ट अन्वये कळविले आहे.तसेच सदर बॅटरीजकरीता त्यांचे दि. २४/०६/२००९ चे ई-मेल अन्वये सर्व करांसहीत एकुण रु. २,८७,७७५/- (अक्षरी रु. दोन लाख सत्याऐंशी हजार सातशे पंचाहत्तर मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. याकरीता अशा प्रकारच्या बॅटरीजचा पुरवठा करणाऱ्या विविध पुरवठा धारकांकडुन काटेशन मागणी करुन बदलता येतील असे नम्र मत आहे.

तरी एम. आर. आय. मशीनचे यु. पी. एस. करीता आवश्यक असणाऱ्या ३२ नग बॅटरीज विविध पुरवठा धारकांकडुन कोटेशन मागणी करुन बदलून घेणेस आणि त्यासाठी येणाऱ्या अंदाजे एकुण रु. २,८७,७७५/- चे खर्चास मान्यता असावी .

**निर्णय क्र.६०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, एम. आर. आय. मशीनचे यु. पी. एस. करीता आवश्यक असणाऱ्या ३२ नग बॅटरीज विविध पुरवठा धारकांकडुन कोटेशन मागणी करुन बदलून घेणेस आणि त्यासाठी येणाऱ्या अंदाजे एकुण रु. २,८७,७७५/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१६** **श्रीरामनवमी उत्सव कालावधीत तातडीने खरेदी केलेल्या औषधास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानमध्ये दरवर्षीप्रमाणे दि. ०२/०४/२००९ ते ०४/०४/२००९ या कालावधीत रामनवमी उत्सव साजरा करण्यात आलेला आहे. या कालावधीत मंदीराचे परीसरात प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात येते. मुंबईहून येणाऱ्या विविध पालख्यासाठी संस्थानची प्रथमोपचारासाठी रुग्णवाहिका पाठविण्यात येत असते. सदर प्रथमोपचार केंद्रासाठी लागणारी औषधे जी औषध भांडारमध्ये उपलब्ध नव्हती ती तातडीने स्थानिक विक्रेत्यांकडून खरेदी केलेली आहे, त्यासाठी रु.२६,३०३/- मात्र खर्च आलेला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे-

| Sr.No. | Name of Party | Bill No. | Date | Total Amt. |
|---|---|---|---|---|
| 1 | Jawahar Agencies, Kopargao | 155 | 01/04/2009 | 2832.00 |
| | | | **Total Amt.** | **2832.00** |
| 2 | Choudhari & Co. Nashik | 10083 | 26/03/2009 | 7809.00 |
| 3 | Choudhari & Co. Nashik | 10080 | 26/03/2009 | 8971.00 |
| 4 | Choudhari & Co. Nashik | 8339 | 24/03/2009 | 4819.00 |
| | | | **Total Amt.** | **21599.00** |
| 5 | Life Line Surgicals & Pharmaceuticals, Kopargaon | 984 | 31/03/2009 | 1872.00 |
| | | | **Total Amt.** | **1872.00** |
| | | **Total Amt. in Rs.** | | **26303.00** |

***Partywise Bill Summery-***

| Sr.N | Name of Party | Total Amt. |
|---|---|---|
| 1 | Jawahar Agencies, Kopargaon | 2832.00 |
| 2 | Choudhari & Co. Nashik | 21599.00 |
| 3 | Life Line Surgicals & Pharmaceuticals, Kopargaon | 1872.00 |
| | **Total Amt.** | **26303.00** |

तरी उपरोक्त प्रमाणे रामनवमी उत्सव कालावधीत तातडीने खरेदी केलेल्या औषधे खरेदीकामी आलेल्या पुर्णांकित रक्कम रु.२६,३०३/- (रु. सव्वीस हजार तीनशे तीन मात्र) चे खरेदीस व खर्चास कार्योत्तर मंजुरी असावी.

**निर्णय क्र.६०५** **प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे रामनवमी उत्सव कालावधीत तातडीने खरेदी केलेल्या औषधे खरेदीकामी आलेल्या पुर्णांकित रक्कम रु.२६,३०३/- चे खरेदीस व खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१७ फिलीप्स MP-२० मल्टीपॅरा मॉनिटरकरीता ETCO सेन्सर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** (०१) $ETCO_2$ सेन्सर हा रक्तातील कार्बन डायऑक्साईडच्या प्रमाणाचे सतत मापन करण्याचे उपकरण आहे. रक्तातील ऑक्सिजन लेवल सुयोग्य असणे जेवढे महत्वाचे असते त्याचप्रमाणे काही गंभीर रुग्णांना कार्बन डायऑक्साईडच्या प्रमाणाचे सतत मापन अत्यावश्यक असते.

(२) श्री साईबाबा हॉस्पिटल साठी MP-२० मल्टीपॅरा मॉनिटर्स करीता मा.व्यवस्थापन समिती सभेच्या दि.०३/०६/२००६ रोजीच्या निर्णय क्र.३८५ अन्वये मे.फिलीप्स मेडीकल सिस्टीम (इं) प्रा.लि. मुंबई यांचेकडून $ETCO_2$ सर्व्हर सेन्सरसह चार नग (प्रत्येकी एकुण रु.१,९०,०००/- ) खरेदी करण्यात आले.

(३) हे सेन्सर्स हॉस्पिटल मध्ये विविध ठिकाणी दि.२०/१०/०६ रोजी कार्यरत करण्यात आले. (संदर्भ पत्र दि.२०/१०/२००६ )

(४) या सेन्सर्सचा वॉरंटी पिरीयड ३ महिने होता, कारण हे सेन्सर्स कन्झ्युमेबल या प्रकारचे असतात.याच कारणामुळे त्याचे CMC/AMC होउ शकत नाही.

(५) दि.२९/०५/२००९ पासुन कार्डीयाक ओ. टी. विभागातील एक MP-२० मल्टीपॅरा मॉनिटरचा $ETCO_2$सेन्सर बिघडला असुन तो दुरुस्त होउ शकत नाही. (संदर्भ पत्र दि.२६/०६/२००९ )

(६) या सेन्सरने गेली सुमारे ३ वर्षे पर्यंत समाधानकारक काम दिले असुन ही कालमर्यादा या उपकरणासाठी समाधानकारक आहे, असे मत आहे. या कारणास्तव कार्डीयाक ओ. टी. साठी फिलिप्स कंपनीच्या याच मॉडेलचाच सेन्सर विकत घेणे योग्य राहील, असे नम्र मत आहे.

तरी विहीत पध्दतीने मे.फिलिप्स मेडीकल सिस्टीम (इं) प्रा.लि.मुंबई या कंपनीचा $ETCO_2$ सेन्सर अंदाजे किंमत रु.१,०४,०००/-( संदर्भ क्र.GJM/CMS/२००९/०६/१८ दि.१८/०६/२००९) खरेदी करण्यास मान्यता असावी,

**निर्णय क्र.६०६ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मे.फिलिप्स मेडीकल सिस्टीम (इं) प्रा.लि.मुंबई या कंपनीचा $ETCO_2$ सेन्सर विहित पद्धतीने खरेदीस व याकामी येणारे अंदाजे किंमत रु.१,०४,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१८ श्री दिगंबर निवृत्ती जगताप व इतर ०३ राहाणार शिर्डी ता.राहाता जि.अहमदनगर यांची मौजे कनकुरी येथील गट नं. १३४ मधील क्षेत्र ८४ आर खरेदी घेणेबाबत**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री. दिगंबर निवृत्ती जगताप, श्री. नवनाथ निवृत्ती जगताप, सौ. हिराबाई रायभान गुंजाळ, श्रीमती यमुनाबाई निवृत्ती जगताप सर्व राहणार शिर्डी, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर यांनी, त्यांची मौजे कनकुरी, तालुका राहाता येथील गट नंबर १३४ क्षेत्र ०० हे ८४ आर जमीन संस्थानने विकत घ्यावी, म्हणून दिनांक २५ मे, २००९ रोजी विनंती अर्ज दिलेला आहे.

**(ब) जमिनीविषयक माहिती :**

श्री. दिगंबर निवृत्ती जगताप व इतर ०३ यांनी सादर केलेल्या उपरोक्त अर्जासोबत जमिनीचे ७/१२ उतारा व इतर फेरफार जोडलेले आहेत. सदरहू जमिनीच्या ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता, खालीलप्रमाणे वस्तुस्थिती दिसून येत आहे :

| अ.नं. | गाव व गट नं. | क्षेत्र | कब्जेदार सदरी असलेली नोंद | इतर हक्कातील नोंदी |
|---|---|---|---|---|
| ०१ | मौजे कनकुरी<br>**गट नंबर १३४** | ०० हे ७५ आर<br>०० हे ०९ आर पोख<br>**०० हे ८४ आर** | दिगंबर निवृत्ती जगताप<br>नवनाथ निवृत्ती जगताप<br>हिराबाई रायभान गुंजाळ<br>यमुनाबाई निवृत्ती जगताप | ०१. कनकुरी वि.का.सोसा. इ.प.क.घे.<br>०२. शिर्डी वि.का.सोसा. इ.प.क.घे.<br>०३. श्री साई नागरी सह.पतसंस्था मर्या., शिर्डी<br>ग.ख.क.घे.<br>०४. विहीर सामायिक |

सदरहू उताऱ्यात पिकपहाणीस दिगंबर निवृत्ती व इतर यांचे नाव आहे.

सदर जमीन ही कनकुरी व शिर्डी येथील विविध कार्यकारी सहकारी सोसायटीस तसेच श्री साईनागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, शिर्डी यांना कर्जापोटी तारण आहे.

**(क) जमिनीची भौगोलिक स्थिती :**

अर्जदार यांचा मौजे कनकुरी येथील विषयांकित गट नंबर १३४ हा शिर्डी संस्थान - पिंपळवाडी - कनकुरी पाणीपुरवठा तळयाचे गट नंबर ११९, १२० व १२७ च्या पुर्व दिशेला गट नंबर १३२ व १३३ सोडून जवळ आहे.

**(ड) जमिनीच्या किंमतीबाबत :**

अर्जदार श्री. जगताप व इतर ०३ यांनी त्यांचे दिनांक २५ मे, २००९ रोजीचे अर्जात जमिनीची किंमत रक्कम रुपये ०३ लाख मात्र प्रति गुंठा मिळावी, अशी मागणी केलेली आहे. त्याबाबत विवेचन असे की,

०१. सन २००८ चे शासकीय मुल्यांकन दर (रेडिरेकनर) सन २००९ साठी अंमलात आहेत. सदरहू मुल्यांकन दर पुस्तिकेत (पान १३२ विभाग क्रमाक ०६) गट नंबर १३४ चा दर रक्कम रुपये ५,००,०००/- मात्र प्रति हेक्टर म्हणजेच रक्कम रुपये ५०००/- मात्र प्रति आर दर्शविलेला आहे.

०२. संस्थानने यापूर्वी म्हणजेच माहे मार्च, २००८ मध्ये श्री. बाबासाहेब रामभाऊ डांगे यांची मौजे कनकुरी येथील गट नंबर १२१ पैकी मधील क्षेत्र ०१ हे ५० आर रक्कम रुपये १ लाख मात्र प्रति आर या दराने खरेदी घेतलेली आहे.

०३. संस्थानने नुकतीच म्हणजेच माहे मार्च, २००९ मध्ये श्री.अण्णासाहेब रामभाऊ डांगे यांची मौजे कनकुरी येथील गट नंबर १२१ पैकी मधील क्षेत्र ०० हे ७९ आर रक्कम रुपये १,७१,०००/- मात्र प्रति आर या दराने खरेदी घेतलेली आहे.

०४. तसेच, श्री. देवराम बंडू पवार यांची मौजे कनकुरी येथील गट नंबर १३५/१ पैकी मधील क्षेत्र ०० हे ८० आर जमीन रक्कम रुपये १,८१,०००/- मात्र आर या दराने खरेदी करणेबाबत मा. व्यवस्थापन समितीने दिनांक ०८ फेब्रुवारी, २००९ रोजीच्या सभेत निर्णय घेतलेला आहे. तथापि कायदेशीर बाबीमुळे सदरहू खरेदी प्रलंबित आहे.

उपरोक्तपैकी अ.नं. ०२ व ०३ च्या जमिनी पाणीपुरवठा तळयाचे दक्षिणेला, अ.नं. ०४ ची जमीन तळयाचे पुर्व-दक्षिणेला तर अर्जदार श्री. जगताप यांची विषयांकित जमीन पाणीपुरवठा तळयाचे पुर्वेला आहे.

**(इ) जमिनीची उपयुक्तता :**

अर्जदार श्री. जगताप यांची जमीन संस्थानच्या पाणीपुरवठा तळयालगत असून, जमिनीचे क्षेत्र ८४ आर म्हणजेच साधारणत: ०२ एकर ०४ गुंठे म्हणजेच बऱ्यापैकी मोठे आहे. त्यामुळे भविष्यकाळात पाणीपुरवठा तळयाचे विस्तारीकरणासाठी उपयुक्त आहे.

**(ई) जमीनखरेदीकामी येणारी त्रुटी :**

०१. ०१. अर्जदार श्री. जगताप व इतर ०३ यांनी अर्जासोबत जोडलेल्या मौजे कनकुरी येथील गट नंबर १३४ चे ७/१२ उताऱ्यात इतर हक्कात विहीर सामायिक अशी नोंद आहे. सदरहू सामायिक विहीरीत कोणत्या खातेदारांचे हिस्से आहेत, त्यांनी पाणी पुरवठयाठी सायफन केले आहे किंवा कसे याबाबत अर्जात उल्लेख नाही.

त्यामुळे सदरहू जमिनीची संस्थानच्या कंत्राटी मोजणीदाराकडून पहाणी करुन, जमिनीची कच्ची मोजणी करुन, विहीरीचे स्थान, त्यावरुन केलेले सायफन कोण-कोणत्या दिशेस गेलेले आहे, किती खातेदार आहेत याची माहिती घेणेत येत आहे. तसेच सदरहू विहिरीत ज्या खातेदारांचे हक्क आहेत ते सदरचा हक्क सोडून देणार किंवा कसे याबाबत अर्जदार यांना पत्र देऊन माहिती घेणेत येत आहे.

०२. विषयांकित गट नंबर १३४ वर शिर्डी व कनकुरी येथील विविध कार्यकारी सहकारी सोसायटी व श्री साईनागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, शिर्डी यांचा कर्जाचा बोजा आहे, असे दिसून येत आहे.

त्याकामी संबंधित सोसायटी व पतसंस्थेस पत्र देऊन कर्ज व इतर बाबतीत माहिती घेणेत येत आहे.

तसेच उपरोक्त त्रुटींबाबत संस्थान वकिलांचा अभिप्राय घेऊन जमीन खरेदी करणेकामी कार्यवाही करणेत येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावाबाबत खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती :

०१. श्री. दिगंबर निवृत्ती जगताप व इतर ०३ यांची मौजे कनकुरी येथील गट नंबर १३४ क्षेत्र ०० हे ८४ आर (पोटखराब्यासह) खरेदी करणेत यावी किंवा कसे.

०२. जमीन खरेदी करावयाची ठरल्यास, अर्जदार श्री. जगताप यांचेशी चर्चा करुन जमिनीचा प्रति आर खरेदी दर ठरविणे.

०३. जमीन खरेदीकामी विहीत पध्दतीने संस्थान वकिलांमार्फत जमिनीचा सर्च रिपोर्ट घेणे, जमीन खरेदी करणेकामी येणाऱ्या त्रुटींबाबत अर्जदार यांचेकडून माहिती घेणे, सदरहू त्रुटी दूर करणेबाबत संस्थान वकिलांचा अभिप्राय घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही तसेच याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणे.

**निर्णय क्र.६०७ सदरहू विषय पुढील सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१९ नविन प्रसादालया समोर सर्व्हे नं.१६४ मधील दक्षिणोत्तर रस्ता श्री साईबाबा संस्थानमार्फत विकसित करणेबाबत**

**प्रस्ताव-** मौजे शिर्डी येथील सर्व्हे क्रमांक १६४ मधील दक्षिणोत्तर रस्ता हा शिर्डी नगरपंचायत हद्दीतील श्री किशोर भाऊसाहेब गोंदकर यांचे क्षेत्रामध्ये असून तो नियोजीत प्रसादालयाकडे जाणेसाठी विकसित करणेबाबत दि. ०६, सप्टेंबर, २००८ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

" .... आजचे सभेत मा. विश्वस्त श्रिमती उर्मिला जाधव यांनी असे सांगितले की, नविन श्री साईप्रसादालय इमारतीकडे जाणे-येणेकामी भक्तांना पर्यायी व जवळचा रस्ता उपलब्ध व्हावा म्हणून सर्व्हे नंबर १६४ पैकी मधील जमिनीतून दक्षिणोत्तर ०९ मिटरचा रस्ता देणेस जमीन मालक श्री किशोर भाऊसाहेब गोंदकर तयार

आहेत. याबाबत त्यांनी संबंधीत जमिन मालकाशी चर्चा केली आहे. यावर असे ठरले की, संबंधीत जमिन मालक विनामुल्य रस्ता देणेस तयार असतील दर त्यांचे जमिनीतून रस्ता विकसीत करणेकामी कायदेशीर बाबी तपासून कार्यवाही करण्यात यावी".

याबाबत जमीन मालकाशी चर्चा करणेसाठी त्यांना दि. १८/१०/२००८ रोजीचे सभेत बोलविण्यात आले होते. यावेळी त्यांचे प्रतिनिधी श्री रमेश भाऊसाहेब गोंदकर हे उपस्थित होते. यांचेशी सभेने चर्चा केली. प्रसादालयात जाणेसाठी सध्या एकच रस्ता असल्याने सदरचा रस्ता जादा पर्यायी रस्ता तातडीने उपलब्ध व्हावा म्हणून पहिल्या टप्प्यात डब्ल्यु बी एम करुन सी.डी. वर्कसह सदरहू रस्ता त्वरीत विकसीत करणेत यावा व याबाबत योग्य तो करारनामा करुन घेण्यात यावा असे ठरले. जमीन मालक यांनी सदरचा काँक्रीटीकरण करुन द्यावा अशी विनंती केली आहे.

सदर रस्त्यावर खर्च करणेसाठी श्री साईबाबा संस्थान अधिनियम २००४ मधील तरतूदीनूसार महाराष्ट्र शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. अथवा श्री. गोंदकर यांनी संस्थानचे नांवे सदरच्या रस्त्याची जागा करुन दिल्यास संस्थान मार्फत थेट रस्ता विकसीत करता येईल. याबाबत श्री. किशोर गोंदकर यांचेबंधु श्री. रमेश गोंदकर यांनी मा. अध्यक्ष सो‍ा यांची भेट घेऊन चर्चा केली असता सदर रस्ता संस्थानकडे थेट वर्ग न करता त्यांनी शिर्डी नगरपंचायत, शिर्डीकडे रस्ता वर्ग करणार असल्याचे चर्चेत नमूद केले.

सदर रस्ता शिर्डी नगरपंचायत, शिर्डी कडे वर्ग करणेत येत आहे. सदर कार्यवाही होईल परंतू आवश्यक बाब म्हणून सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करुन निवीदा मागविणेबाबत कार्यवाही सत्वर सुरु करावी अशी मा. अध्यक्ष सो‍ा यांनी सुचना केली. त्यानुसार आर्किटेक्ट निकम पाटील असोसिएटस, श्रीरामपूर यांचेकडून सदरचा रस्ता विकसीत करणेसाठी अंदाजपत्रक व नकाशे तयार करुन घेता येतील. सदरचा रस्ता डांबरीकरणात तयार करणेसाठी अंदाजे रक्कम रुपये १०,११,२९०.०० मात्र खर्च येईल व काँक्रीटीकरण करणेसाठी अंदाजे रक्कम रुपये ३६,००,०००.०० मात्र खर्च येईल.

तरी सर्व्हे नं. १६४ मधील दक्षिणोत्तर रस्ता विकसीत करणेसाठी आर्कि. निकम पाटील, श्रीरामपूर यांचेकडून आर्किटेक्ट सेवा घेणेस व सदरचा रस्ता डांबरीकरणात अथवा काँक्रीटीकरणात करणेबाबत निर्णय होणेस व खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६०८** **उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन, विषयांकित रस्ता संबंधीत जमीनमालक शिर्डी नगरपंचायतीकडे वर्ग करणार आहेत. शिर्डी नगरपंचायतीकडून विषयांकित रस्ता विकसीत करणेबाबत अधिकृत प्रस्ताव प्राप्त झालेनंतर, सदरहू कामाबाबत बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक संस्थान आर्किटेक्ट मे.निकम पाटील ॲण्ड असो., श्रीरामपूर यांचेकडून तयार करुन घेणेत यावेत. याकामी संबंधीत जमीनमालकांसह शिर्डी नगरपंचायत, शिर्डीचे ना हरकत प्रमाणपत्रही घेणेत यावे. याकामी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२०** **साईउद्यान इमारत ड्रेनेज लाईनबाबत**

**प्रस्ताव-** संस्थानचे साईउद्यान इमारतीमधील ड्रेनेज लाईन नेहमी चोकअप होऊन ड्रेनेज लाईनमधील पाणी साईउद्यान इमारतीच्या पुर्व भागात पसरते. सदरची ड्रेनेज लाईन लहान साईजची असून सदरची लाईन शिर्डी नगरपंचायत, शिर्डीचे ड्रेनेज लाईनला जोडलेली आहे. त्यामुळे नगरपंचायतीची ड्रेनेज लाईन पुर्ण क्षमतेने भरल्यानंतर त्या ड्रेनेज लाईनचे पाणी साईउद्यान इमारतीमध्ये मागे फीरते व पुर्व भागात पसरते. तरी याबाबत उपाययोजना करणेबाबत अधिक्षक, निवासस्थाने विभाग यांनी त्यांचेकडील दि. २६.०६.२००९ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

याबाबत पाणी पुरवठा विभागातील प्लंबर, आरोग्य विभागाचे सुपरवायझर यांचे समवेत पाहणी केली असता सध्या असलेली साईउद्यान इमारतीचे ड्रेनेज लाईन नगरपंचायतीचे ड्रेनेज लाईनला जोडलेली आहे. परंतू त्या लाईनचा उतार कमी असल्याने नगरपंचायतीची ड्रेनेज लाईन भरलेनंतर ते पाणी साईउद्यान मध्ये परत मागे येते. करीता साईउद्यानची ड्रेनेज लाईन शिर्डी नगरपंचायत, शिर्डीचे ड्रेनेज लाईनला हॉटेल गोरडीया समोर असलेल्या चेंबरला जोडल्यास योग्य तो उतार उपलब्ध होईल. व ड्रेनेज लाईन तुंबनार नाही. सदरची प्रस्तावीत ड्रेनेज लाईन व साईउद्यानचे पावसाचे पाणी वाहुन जाणारी सध्याची उघडी गटारही पाईप टाकुण भुमिगत करुन त्याचे आउट लेट १०" व्यासाचे आर. सी. सी. पाईप वापरुन साईउद्यान इमारतीचे पश्चिम बाजूचे कम्पांउंडचे आतिल बाजूने टाकुण हॉटेल गोरडीयाचे गेट समोरील चेंबरला जोडून देता येईल.

याकामी अंदाजे रु. १,२९,१८८.०० मात्र इतका अपेक्षित खर्च असून सदरचे काम पाणीपुरवठा विभागामार्फत करता येईल. व इकडील विभागामार्फत आवश्यक चेंबरचे बांधकाम करुन घेता येईल.

तरी याकामी येणारे अंदाजे रु. १,२९,१८८.०० मात्रचे खर्चास व सदरचे काम पाणी पुरवठा व बांधकाम विभागामार्फत संयुक्तीक रीत्या करुन घेणेस मंजूरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६०९ प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे साईउद्यान इमारतीकरिता ड्रेनेजलाईन टाकणेस व याकामी येणारे अंदाजे रु. १,२९,१८८/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून करुन घेणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२१ श्यामसुंदर हॉलचे छताचे पत्र्यावर कौले (मंगलोर टाईल्स) बसविणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री व्दारकामाई मंदिराचे पूर्व बाजूचे भिंतीलगत "शामसुंदर हॉल" असून, सदरहू ठिकाणी साईभक्तांना वाटप करणेसाठी छोटया प्लॅस्टिक पिशवीमध्ये उदीच्या पुडया मशिनव्दारे तयार केल्या जातात. मंदिर विभागाचे दिनांक ०२ जून, २००९ रोजीचे पत्रानुसार, सदरहू हॉलमध्ये पावसाचे पाणी ठिपकत असल्याने या हॉलचे ठिबकणे बंद करुन मिळावे अथवा पत्रे बदलून मिळावेत म्हणून कळविलेले होते. सदरहू पत्रानुसार सर्व पत्रे खोलून योग्य उतारासह दुरुस्ती करणेत आलेली आहे. सदरहू हॉलची दिनांक २६ जून, २००९ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांचेसमवेत अधिक्षक, मंदिर विभाग यांचेसह सदरहू हॉलचे छताचे दुरुस्तीबाबत समक्ष चर्चा करणेत आली. सदरहू चर्चेचे वेळेस, श्री व्दारकामाई मंदिराचे पत्र्याचे छतावर ज्या प्रमाणे कौले (मंगलोर टाईल्स) बसविण्यांत आलेल्या आहेत, त्याप्रमाणे शामसुंदर हॉलचे पत्र्याचे छतावर कौले (मंगलोर टाईल्स) बसविल्यास ते सुसंगत दिसेल, असे सर्वांचे मत झाले.

त्यास अनुसरुन, शामसुंदर हॉलचे पन्हाळी पत्र्याचे छतावर मंगलोर टाईल्स (कौले) लावणेचे ठरल्यास, याकामी सागवाड लाकुड, मंगलोर टाईल्स, खिळे इत्यादी साहित्यासाठी अंदाजित रक्कम रुपये ६१,३२०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. याकामी लागणारे साहित्य बांधकाम विभागामार्फत विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून खरेदी करण्यात येऊन, विभागामार्फत पूर्ण करुन घेता येईल.

उपरोक्तप्रमाणे "शामसुंदर हॉल" चे पत्र्याचे छतावर श्री व्दारकामाई मंदिरावरील छताशी सुसंगत अशी कौले (मंगलोर टाईल्स) बसविणेस व त्याकामी येणारे अंदाजित रक्कम रुपये ६१,३२०/- मात्र पर्यन्तचे खर्चास व सदरहू काम बांधकाम विभागामार्फत पूर्ण करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६१० प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे "शामसुंदर हॉल" चे पत्र्याचे छतावर श्री व्दारकामाई मंदिरावरील छताशी सुसंगत अशी कौले (मंगलोर टाईल्स) बसविणेस व त्याकामी येणारे अंदाजित रक्कम रुपये ६१,३२०/- मात्र पर्यन्तचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून काम करुन घेणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२२ शिर्डी पोलिस स्टेशन इमारत रंगकाम करणे व एक खोली बांधकाम करणेबाबत**

**प्रस्ताव-** शिर्डी पोलीस स्टेशन इमारतीतील कामे करुन मिळणेबाबत श्री. श्रीकांत जावळे, उप विभागीय पोलीस अधिकारी व श्री. नवलाथ तांबे, पोलस निरीक्षक यांनी मा. अध्यक्षांची दि. २१.०६.२००९ रोजी समक्ष भेट घेवुन विनंती केली. मा. अध्यक्ष सो यांचे सुचनेप्रमाणे शिर्डी पोलीस स्टेशन येथील कामांची प्रत्यक्ष पहाणी करुन वरिल अधिका-या समवेत चर्चा केली सध्याचे ठाणे अंमलदार कार्यालय पहिल्या मजल्यावर आहे. त्यामुळे नागरिक व साईभक्तांना पोलीस स्टेशनला तक्रार करण्यासाठी संपर्क करणे अवघड होते. तसेच पोलीस स्टेशन इमारतीत पुरेशी जागाही उपलब्ध नाही. ठाणे अंमलदार कार्यालयासाठी नविन खोलीचे बांधकाम करणे, तसेच उपरोक्त पोलीस स्टेशन इमारतीचे रंगकाम खराब झालेले असल्याने रंगकाम करणे आवश्यक आहे. तरी सदरची कामे करुन मिळणेस तसेच दि. २३.०६.२००९ रोजीचे पत्रान्वये स्वच्छतागृहाचे ड्रेनेजदुरूस्ती, फॅन, टयुबलाईट दुरुस्ती करणेबाबतही विनंती केली आहे. सदर कामासाठी सोबतचे अंदाजपत्रकानुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | ठाणे अंमलदार कार्यालयासाठी नविन खोलीचे बांधकाम | - रु. १,५३,६८०/- |
| ०२. | पोलीस स्टेशन इमारतीचे रंगकाम | - रु. १,१२,७२१/- |
| ०३. | स्वच्छतागहाचे ड्रेनेजदुरूस्ती, फॅन, टयुबलाईट दुरुस्ती इत्यादि | - रु. १२,०००/- |
| | एकूण | रु.२,७८,४०१/- |

तरी उपरोक्तप्रमाणे शिर्डी पोलीस स्टेशन इमारतीचे रंगकाम करणे, इतर किरकोळ कामे करणे व नविन खोलीचे बांधकाम करणेसाठी रु. २,७८,४०१/-मात्र खर्च अपेक्षित आहे. श्री साईबाबा संस्थान अधिनियम २००४ मधिल तरतुदीनुसार याकामी खर्च करणेसाठी शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. करीता सदर कामास व खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेस मंजूरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६११ उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन सदरहू काम लहान स्वरुपाचे असल्याने तसेच पोलिस स्टेशनची निकड लक्षात घेऊन रु.२,७८,४०१/- मात्रचे खर्चास व कामास मान्यता देण्यात आली.**
(कार्यवाही बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२३ निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं. १६९ कर्मचाऱ्यांचे निवासस्थान इमारतीचे प्लॉटला कंम्पाऊंड भिंतीचे बांधकाम करणेबाबत**

**प्रस्ताव-** संस्थानचे वर्ग-४ कर्मचाऱ्यांकरीता मौजे निमगाव कोऱ्हाळे येथील गट नंबर १६९ मध्ये निवासस्थान इमारतीचे बांधकाम सन २००७ मध्ये पुर्ण करण्यात आलेले असुन सदर इमारती कर्मचाऱ्यांचे निवासाकरीता देण्यात आलेल्या आहेत. सदर इमारतीचे पुर्व व दक्षिण बाजुस शेतीमहामंडळाचे शेती असून पश्चिम बाजुस खाजगी शेती आहे. निवासस्थान इमारतीचे लगतचा परिसर मोकळा असल्याने संरक्षणाचे दृष्टीने कंम्पाउंड भिंतीचे बांधकाम करणे गरजेचे आहे.

कंम्पाउंड भिंतीचे बांधकामाकरीता पाया नसल्याने पाईल फाऊंडेशन करावे लागणार असुन पाईल कॅप करुन आर.सी.सी. कॉलम, बीम व सहा फुट उंचीपर्यंत वीट बांधकाम आर.सी.सी. कोपींग,प्लॅस्टर, रंगकाम ग्रील गेट इ. कामे करावे लागणार आहेत. याकरीता सोबतचे अंदाजपत्रकानुसार अंदाजे रु १६,४१,५६१.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी सदर खर्चास व वर्ग -०४ कर्मचारी निवासस्थान इमारतीचे बाहेरील बाजूस कंम्पाउंड भिंत बांधणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६१२ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. याकामी विहीत पध्दतीने वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेत याव्यात. याकामी येणारे योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२४ नगर-मनमाड रस्त्यावर स्कॉयवॉक उभारणेबाबत**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री साईबाबा भक्तनिवासस्थान ते श्री साई प्रसादालय या अंतरात भक्तांसाठी स्कायवॉक सुविधा निर्माण करणेबाबत मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०५ एप्रिल, २००९ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ३७१ खालील प्रमाणे झालेला आहे :

.. .. यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या पहिल्या टप्प्यामध्ये बसस्थानक ते मंदिर परिसर व तेथून पूढे नवीन प्रसादालयापर्यन्त स्कायवॉक उभारणेबाबतचा प्रस्ताव तयार करणेत यावा. सदरहू काम खर्चिक स्वरुपाचे असल्याने ते बांधा-वापरा-हस्तांतरीत करा (B.O.T.) तत्वावर करणे शक्य आहे काय ? याबाबत पडताळणी करण्यात यावी व तपशिलवार प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे यथावकाश सादर करणेत यावा असे ठरले.

सदरहू निर्णयांस अनुसरुन, मे.आयव्हीआरसीएल, पुणे या कंपनीने प्राथमिक बांधकाम आराखडा व खर्चाचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. तसेच दरम्यानचे कालावधीत, मा.अध्यक्षसाो. यांनी मंदिर परिसर विकास प्रकल्पाचे संस्थान आर्किटेक्ट मे. माथूर ॲण्ड काप्रे असोसिएटस्, नवि दिल्ली यांच्या प्रतिनिधी श्रीमती सोनिया काप्रे यांना विषयांकित स्कायवॉक संबंधी सविस्तर माहिती व प्राथमिक बांधकाम आराखडा अंदाजपत्रकासह तयार करणेस तोंडी निर्देश दिलेले होते.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, मे. आयव्हीआरसीएल, पुणे व मे. माथूर ॲण्ड काप्रे असोसिएटस्, नवि दिल्ली यांनी विषयांकित स्कायवॉकचे प्राथमिक बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन बांधकाम विभागाकडे पाठविलेले आहेत, त्याचा थोडक्यात गोषवारा खालील परिच्छेदात दिला आहे.

**(ब) मे. आयव्हीआरसीएल, पुणे** यांनी सादर केलेल्या प्राथमिक अहवालात खालीलप्रमाणे बाबी समाविष्ट केलेल्या आहेत :

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | स्कायवॉकची लांबी | : | १९०० मीटर |
| ०२. | स्कायवॉकची रुंदी | : | ०४ मीटर |
| ०३. | स्कायवॉकची उंची | : | ०३ मीटर (फ्लोअरलेव्हल पासून) |
| ०४. | स्कायवॉकला सुविधा | : | ०५ क्रॉस कनेक्शन्स व ०५ जिने |
| ०५. | अंदाजित खर्च | : | रुपये ३१ ते ३३ कोटी मात्र |

सदरहू प्रस्तावात कंपनीने, स्कायवॉकसाठी एस्कलेटर्स, लिफ्टस याची सुविधा दिलेली नाही किंवा त्याची किंमत गृहीत धरलेली नाही. स्कायवॉकवर दुकाने अथवा इतर कोणतीही सुविधा नाही, दुकाने व इतर सुविधा उपलब्ध करुन द्यावयाची ठरल्यास, स्कायवॉकची रुंदी साधारणतः २ मीटरने वाढेल व त्याप्रमाणात खर्चही वाढेल.

आयव्हीआरसीएल कंपनीचे प्रतिनिधींनी मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, सदरहू स्कायवॉक बीओटी तत्वावर बांधकाम करणे शक्य नसल्याचे तोंडी सांगितले त्याऐवजी सदरहू प्रकल्प आयव्हीआरसीएल कंपनी EPC (इंजिनिअरींग प्रोक्युरमेंट कन्स्ट्रक्शन) या तत्वावर उभारणेस तयार आहे. यामध्ये कंपनी इंजिनिअरींग कन्सल्टंटची नेमणूक करुन, जागेचा सर्व्हे, माती परीक्षण (स्ट्राटा), स्कायवॉकचे बांधकाम आदि करेल. तथापि यासाठी आवश्यक असणारी तांत्रिक बांधकाम परवानगी संस्थानने आणावयाची आहे. याकामी कंपनी कागदपत्रांची पूर्तता करणेसाठी तांत्रिक सहाय्य करेल.

**(क) मे. माथूर ॲण्ड काप्रे असोसिएटस्, नवि दिल्ली** यांनी सादर केलेल्या प्राथमिक अहवालात खालीलप्रमाणे बाबी समाविष्ट केलेल्या आहेत **:**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | स्कायवॉकची लांबी | : | १७५० मीटर |

०२. स्कायवॉकची रुंदी : ०६ मीटर
०३. स्कायवॉकची उंची : ०५.५० मीटर (फ्लोअरलेव्हल पासून)
०४. स्कायवॉकची उंची : ०६.५० मीटर (रस्त्यापासून फ्लोअरलेव्हलपर्यन्त )
०५. स्कायवॉकला सुविधा : ०८ क्रॉस कनेक्शन्स व ०८ जिने.

सदरहू प्रस्तावात आर्किटेक्ट यांनी, स्कायवॉकसाठी लिफ्टस्, जिने, एस्कलेटर्सची सुविधा प्रत्येकी २५० मीटरवर दिलेली आहे. स्कायवॉकचे पदपाथावर पॉलिकॉबोनेटचे छत राहील. याकामी आर्किटेक्ट यांनी अंदाजित खर्च स्वतंत्ररित्या खालीलप्रमाणे दिलेला आहे :

अंदाजित खर्चाची विगतवारी :

०१. बांधकाम खर्च : रुपये ५३.४६ कोटी
०२. लिफ्टस १६ नग : रुपये ०२.४० कोटी
०३. एस्कलेटर्स ४ नग : रुपये ०२.०० कोटी
एकूण : रुपये ५७.८६ कोटी

तसेच आर्किटेक्टस् यांनी सदरहू प्रकल्पात रस्तांची दुरुस्ती, केबल्स, वायर्स पुन्हा टाकणे, ड्रेनेज लाईन्सची दुरुस्ती आदि अनुषंगिक कामासाठी रक्कम रुपये ७.२१ कोटी मात्र अंदाजे तरतूद करावी लागेल, असे नमूद केले आहे.

**(ड)** उपरोक्त परिच्छेद ब व क मध्ये नमूद केलेल्या दोन प्रस्तावामध्ये स्कायवॉकची लांबी व रुंदी वेगवेगळी दर्शविण्यांत आलेली आहे. तथापि संस्थानमार्फत साईआश्रम प्रकल्प (भाग १) पासून ते श्री साईप्रसादालय (पोलिस स्टेशननपर्यन्त) या १९०० मीटर अंतरात साधारणत: जमिनीपासून ०७ मीटर उंचीचे व त्यावर स्कायवॉक पदपथाची उंची ४ मीटर, ०८ ठिकाणी क्रॉस कनेक्शन्स, आवश्यकतेनुसार एस्कलेटर्स ०३ क्रॉस कनेक्शन्सवर, लिफ्टस ०८ क्रॉस कनेक्शनवर दोन्ही बाजूने निश्चित करता येतील. त्यानुसार आयव्हीआरसीएल, पुणे मे. माथूर अॅण्ड काप्रे असोसिएटस्, नवी दिल्ली अथवा या क्षेत्रातील इतर नामांकित कंपन्यांपैकी एका कन्सल्टंटची नेमणूक करुन त्यांचेकडून स्कायवॉक उभारणीसाठी सविस्तर अहवाल, बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन घेणे योग्य होईल. त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करता येईल.

**निर्णय क्र.६१३ सदरहू प्रस्तावावर चर्चा होऊन, स्कायवॉक उभारणेबाबतच्या प्रकल्पासाठी सल्लागाराची नेमणुक करणेस, त्यांचेकडून सविस्तर बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन घेणेत यावेत. तद्नंतर मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करणेत यावेत. याकामी येणारे योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२५ मौजे नांदुर्खी ता.राहाता येथील नियोजित रुग्णालयाचे बांधकामासाठी सल्लागार नियुक्तीकरीता प्राप्त झालेल्या प्रस्तावावर निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.६१४ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२६ वावी सायाळे मार्गे शिर्डी, पुणतांबा न.पा.वाडी मार्गे शिर्डी, पुणतांबा -वाकडीमार्गे शिडी व वारी ते पुणतांबा फाट्यापर्यन्त या विविध चार पालखी रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरण करणेबाबत**

**प्रस्ताव-** **(अ)** .. श्री साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डी येथे दिवसेंदिवस पालख्यांचे प्रमाण वाढत आहे. तसेच ग्रामीण भागातूनसुध्दा अनेक साईभक्त दर्शनासाठी पायी येत असतात. त्यासाठी खालील पालखी रस्त्यांचे साईभक्तांच्या सोयीच्यादृष्टीने काही भागातील खराब रस्त्यांचे खडीकरण, डांबरीकरण व सुशोभिकरण करणे गरजेचे आहे.

| अ.नं. | रस्त्यांची नांवे | किलोमीटर | अंदाजित रक्कम (लाखात) |
|---|---|---|---|
| ०१ | वावी (सिन्नर तालुका) - दुशिंगपूर - मलढोण - सायाळे - बहादरपूर - जवळके - धोंडेवाडी - वेस - डोऱ्हाळे - नांदुर्खी मार्गे - शिर्डी रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे. | १७ किमी | १३६ लाख |
| ०२ | पुणतांबा - न.पा.वाडी - राहाता मार्गे - शिर्डी रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे. | ०६ किमी | ०४८ लाख |
| ०३ | पुणतांबा- वाकडीमार्गे - शिर्डी या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे. | ०५ किमी | ०४० लाख |
| ०४ | वारी ते पुणतांबा फाट्यापर्यन्त रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे. | ०४ किमी | ०३२ लाख |
| | **एकूण** | **३२ किमी** | **२५८ लाख** |

वरीलप्रमाणे पालखी रस्त्यांचे संस्थानमार्फत खडीकरण व डांबरीकरणाचे काम करण्यासाठी आपण या सर्व रस्त्यांचे सर्व्हे व अंदाजपत्रके तयार करुन, ही अंदाजपत्रके नियमाप्रमाणे साई संस्थानच्या मा. व्यवस्थापन समितीच्या मिटींगपुढे ठेऊन मंजुरी घेऊन, निविदा काढण्यासाठी तातडीची कार्यवाही राबवावी. उपरोक्तप्रमाणे मा. श्री. शंकररावजी कोल्हे, उपाध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक संजी/कोप/२००९-१० दिनांक ०३ जुलै, २००९ नुसार मा.कार्यकारी अधिकारी यांना कळविलेले आहे.

**(ब)** उपरोक्त **परिच्छेद अ** मध्ये नमूद केल्यानुसार, मा.उपाध्यक्षसो. यांनी त्यांचे पत्रात, अ.नं. ०१ ते ०४ मधील एकूण ३२ किमी पालखी रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरण करणेसाठी अंदाजित रक्कम रुपये २.५८ कोटी मात्र अंदाजित खर्च दर्शविलेला आहे. उपरोक्त पालखी रस्ते हे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अखत्यारीतील असल्याने, सदरहू रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरण करणेसाठी येणाऱ्या अंदाजित खर्चाची अंदाजपत्रके व बांधकाम आराखडे त्यांचेकडून तयार करुन घेऊन, त्यांचेमार्फत काम पूर्ण करुन घेता येईल. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अशी अंदाजपत्रके प्राप्त झालेनंतर, ती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधील तरतुदीनुसार मा. शासनाची मान्यता घेणेकामी सादर करणे उचित राहील.

**(क)** उपरोक्त परिच्छेदांत विवेचन केल्यानुसार, **परिच्छेद अ** मधील अ.नं. ०१ ते ०४ मध्ये नमूद केलेल्या विविध ०४ रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरण सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत संस्थान निधीतून करणेस व त्याकामी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बांधकाम आराखडे व अंदाजपत्रके प्राप्त करुन घेऊन, अधिनियमातील तरतुदीनुसार मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस मान्यतेसाठी सादर करणेकामी मा.व्यवस्थापन समितीची तत्वतः मान्यता मिळणेकामी विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.६१५ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२७ नगर-मनमाड या राज्य मार्गावरील दुभाजकांचे सुशोभिकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा. अध्यक्षसो. यांनी अहमदनगर-मनमाड राज्यमार्गावर शिर्डीतून जाणाऱ्या चार पदरी रस्त्यावर बसविण्यांत आलेल्या दुभाजकांचे सुशोभिकरण करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. अहमदनगर - मनमाड या राज्यमार्गाचा शिर्डीतून जाणाऱ्या व संस्थानमार्फत विकसित करण्यात आलेल्या चार पदरी रस्त्याची लांबी १४२५ मीटर व रुंदी १.४० मीटर आहे. या रस्त्याचे मध्यभागी जुने साई प्रसादालय (लक्ष्मीनगरजवळील प्रवेशव्दार) ते श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० खोल्या इमारतीचे प्रवेशव्दार) पर्यन्त कॉंक्रिटचे दुभाजक बसविणेत आलेले असून, त्यामध्ये सध्या पोयटा/ माती भरुन लॉन व काही शोभेची झाडे लावणेत आलेली आहे. या दुभाजकांचे सुशोभिकरणासाठी खालीलप्रमाणे खर्च येईल :

**पर्याय १-**सदरहू दुभाजकांमध्ये बॉटल पाम ( उंची ५ ते ६ फुट) ही झाडे व बोगन वेल लावून सुशोभिकरण करता येईल. परंतु सदरहू झाडे लावल्यानंतर त्यांचे साधारणतः २ ते ३ वर्ष त्यांचे व्यवस्थित संगोपन करावे लागणार आहे. सुरुवातीस ही झाडे लहान असल्याने भक्त व स्थानिक नागरीकांकडून दुभाजक ओलांडणेचे वेळेस तुडविली जाण्याची दाट शक्यता आहे तसेच सदरहू झाडांच्या संगोपनासाठी भरपूर पाणी व मनुष्यबळ लागेल. यासाठी खालीलप्रमाणे खर्च येईल :

| अ.नं. | तपशील | संख्या | दर प्रति नग / रोप | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | बॉटल पाम (उंची ५ ते ६ फुट) | २४० नग | रु.५००/- | १,२०,०००/- |
| ०२ | बोगन वेल (कागदी फुलांची झाडे ) | ५००० नग | रु.०८/- | ०,४०,०००/- |
| | | | एकूण | १,६०,०००/- |

**पर्याय २** सदरहू दुभाजकांमध्ये बॉटल पाम (उंची ८ ते १० फुट) ही झाडे व शोभेची रोपे (कण्हेर,कॅल्नड्रा, पावडर पफ आदि) लावून सुशोभिकरण करता येईल. यामध्ये बॉटल पाम झाडांची उंची जास्त असल्याने त्याचे संगोपन कमी काळासाठी करावे लागेल तथापि त्यांची किंमत जास्त आहे तसेच शोभेच्या रोपांची वाढ चांगली होते. संगोपनासाठी मनुष्यबळ कमी लागून खर्च ही कमी येईल.

| अ.नं. | तपशील | संख्या | दर प्रति नग / रोप | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | बॉटल पाम (उंची ८ ते १० फुट) | २४० नग | रु.३०००/- | ७,२०,०००/- |
| ०२ | शोभेची रोपे (मागणीप्रमाणे) | ५००० नग | रु.२०/- | १,००,०००/- |
| | | | एकूण | ८,२०,०००/- |

सध्या या दुभाजकांमध्ये पूर्वी लावलेली काही झाडे सुव्यवस्थित व योग्य वाढ झालेली आहेत, ती झाले आहे तशीच ठेऊन आवश्यकतेनुसार झाडांची खरेदी विहीत पध्दतीने करुन सुशोभिकरण करता येईल.

**(ब)** उपरोक्त **परिच्छेद अ** मध्ये नमूद केल्यानुसार, पर्याय १ अथवा पर्याय २ वापरुन दुभाजकांचे सुशोभिकरण करता येईल. तरी उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी सादर.

**निर्णय क्र.६१६ यावर सविस्तर चर्चा होऊन, पर्याय क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दुभाजकांचे सुशोभिकरण करणेत यावे. याकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविण्यात यावीत. याकामी येणारे योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख/बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२८ नवीन भक्तनिवास येथे कारंजाच्या गोलाकार हौदाच्या सभोवताली सुशोभित ग्रिल तयार करणेबाबत**

**प्रस्ताव-** नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथे साई भक्तांच्या मनोरंजनासाठी संगीत कारंजा बसविलेला आहे. कारंजाच्या मुख्य हौदाच्या सभोवती पुर्वी ३ फूटापर्यंत शोभेची झाडे लावलेली होती. परंतू तेथे पाणी साचून डास होत असे व त्याचा भक्तांना उपद्रव होत असे. म्हणून ही झाडे काढून बांधकाम विभागाकडून सिमेंटचे ब्लॉक बसविण्यात आले आहेत.

सध्या कारंजा चालू केल्यानंतर बागेत जमलेले साईभक्त व त्यांची लहान मुले कारंजाच्या हौदाला खेटूनच उभी रहातात, बरोबर आणलेल्या शीतपेयाच्या बाटल्या, प्लास्टिक कागदे, आईस्क्रीमचे कप वगैरे कचरा हौदात फेकतात, काही साईभक्त डोक्याचे काढलेले केस कारंजातील पाण्यात फेकतात, व हा कचरा कारंजाचे नोझलमध्ये अडकून नोझल वरचेवर जाम होतात. साफसफाई करतांना अडचणी येतात, यामुळे काही अनुचित प्रसंग घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सबब वरील प्रसंग घडू नये व भक्तांना कारंजात घाण टाकता येऊ नये याकरीता कारंजाभोवती सुशोभित स्टील ग्रील तयार करुन बसवून मिळणेकामी ध्वनिक्षेपण / सीसीटीव्ही विभागाने दिनांक १०-०६-२००९ चे टिपणीन्वये कळविले होते.

त्यानुसार नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम ) येथे कारंजाच्या गोलाकार हौदाच्या सभोवताली सुशोभित स्टेनलेस स्टील ग्रील बाहेरील फॅब्रिकेटर्स/वर्कशॉपमधून करुन घेणेकामी खालीलप्रमाणे मटेरीअल व खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर(अंदाजे) | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१) | स्टेनलेस स्टील स्क्वेअर पाईप,<br>साईज :-१८ x १८ x ३ एम.एम. | ८५० फुट. | रु. ९४.००<br>(प्रति फुट) | ७९,९००.०० |
| ०२) | स्टेनलेस स्टील पट्टी,<br>साईज :-१८ x ३ एम.एम. | ४६० फुट. | रु. ४४.००<br>(प्रति फुट) | २०,२४०.०० |
| | | | एकुण :-<br>वॅट १२.५% | १,००,१४०.००<br>१२,५१८.०० |
| | | | रक्कम :-<br>+ ४०% मजुरी | १,१२,६५८.००<br>४५,०६३.०० |
| | | | एकुण रक्कम :- | १,५७,७२१.०० |

उपरोक्तप्रमाणे नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील कारंजाच्या गोलाकार हौदाच्या सभोवताली सुशोभित स्टेनलेस स्टील ग्रील बसविणेचे काम काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपमधून करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये १,५७,७२१.०० मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६१७ प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील कारंजाच्या गोलाकार हौदाच्या सभोवताली सुशोभित स्टेनलेस स्टील ग्रील बसविणेचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपमधून विहित पद्धतीने कोटेशन मागवुन करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,५७,७२१.०० मात्र चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२९ सेवाधाम इमारतीचे व्हरांड्यात (पॅसेज) ग्रील बसविणेबाबत**

**प्रस्ताव-** सेवाधाम इमारतीचे ठिकाणी मा.कार्यकारी अधिकारी साहेब व मा.उप कार्यकारी अधिकारी साहेब यांनी राऊंड घेतला असता सेवाधाम इमारतीचे पश्चिमेकडील पॅसेजमध्ये (वरांडयात) नविन लोखंडी ग्रील तयार करुन बसविणेसाठी सांगितले आहे.

त्यानुसार सेवाधाम इमारतीचे पश्चिमेकडील पॅसेजमध्ये (वरांडयात) नविन लोखंडी ग्रील तयार करुन बसविणेसाठी काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून करुन घेणेकामी खालीलप्रमाणे मटेरीअल व खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर(अंदाजे) | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१) | एम.एस.अँगल,<br>साईज :- ३५ x ३५ x ५ एम.एम. | ५९१ किलो. | रु. ५०.००<br>(प्रति किलो) | २९,५५०.०० |
| ०२) | एम.एस. फ्लॅट पट्टी, | ८१० किलो. | रु. ५०.०० | ४०,५००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | साईज :- २० x ५ एम.एम. | | (प्रति किलो) | |
| | | | एकुण :-<br>वॅट १२.५% | ७०,०५०.००<br>८,७५६.०० |
| | | | रक्कम :-<br>+ ४०% मजुरी | ७८,८०६.००<br>३१,५२२.०० |
| | | | एकुण रक्कम :- | १,१०,३२८.०० |

उपरोक्तप्रमाणे सेवाधाम इमारतीचे पश्चिमेकडील पॅसेजमध्ये (वरांडयात) नविन लोखंडी ग्रील बसविणेचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपमधून करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये १,१०,३२८.०० मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.६१८ प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे सेवाधाम इमारतीचे पश्चिमेकडील पॅसेजमध्ये (वरांडयात) नविन लोखंडी ग्रील बसविणेचे काम विहित पद्धतीने कोटेशन मागवून बाहेरील फॅब्रिकेटर्स /वर्कशॉपमधून करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,१०,३२८.०० मात्र खर्च मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.३०** **चहामध्ये दळलेली विलायची वापरणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी मार्फत साईभक्तांना अल्पदरात चहा, कॉफी, दूध दिले जाते. याकरीता २४ तास चहा कॅन्टीन अखंड कार्यरत आहे. भक्तांना चांगल्या प्रतीचा चवदार चहा मिळावा याकरिता त्यामध्ये असलेल्या पदार्थाचे प्रमाण कमी जास्त करुन चहाचे १००० कपास ५० ग्रॅम विलायची इतके प्रमाण वापरल्यास साधारण दररोज (२० हजार कप चहा लागतो.) यासाठी १ किलो दळलेली विलायचीचा वापर केल्यास भक्तांना चांगल्या प्रतीचा सुगंधी चहा मिळेल. प्रायोगिक तत्वावर दि.०६.०५.२००९ पासून काही दिवस दळलेली विलायची वापरण्यात आली. त्याबाबत भक्त/ ग्रामस्थ व कर्मचारी यांचेकडून चहा संबंधी चांगल्या प्रतीक्रिया आलेल्या आहेत. उपलब्धतेनुसार आद्रक व गवतीचहाचा पण वापर केला जातो. यामुळे विलायची कमी लागेल. एका वर्षास (१२ महिन्यास) ३६५ किलो किंवा त्यापेक्षा कमी विलायची लागेल.

तरी प्रती किलो रु.६६५.६० पैसे प्रचलित दराप्रमाणे ९ महिनेकरीता जुलै ते मार्च- २००९ अखेर अंदाजे २५० किलो इतक्या विलायची खरेदीस व रक्कम रु.१,६६,४००.०० चे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. विलायची खरेदीकामी विहित पद्धतीने कोटेशन मागविण्यात यावे,असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक खरेदी/अधिक्षक कॅन्टीन)

---

**विषय नं.३१** **अंतर्गत दुरध्वनी यंत्रणेच्या वार्षिक दुरुस्ती देखभाल कराराचे नुतनीकरणे करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानची अंतर्गत दूरध्वनी व्यवस्था अधिक गतीमान व अत्याधुनिक होणेसाठी तत्कालीन मा. विश्वस्त मंडळाने घेतलेल्या दिनांक २९-३१.०३.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१७९ नुसार, Siemens Hipath ४३००IP ही २००० लाईन्स क्षमतेची अद्ययावत डिजीटल ईपीएबीएक्स यंत्रणा मे. सिमेन्स लि., मुंबई यांचेकडून जा.नं.एसएसएस-वशी-संगणक-४१८२-०४,दि.२२.०४.२००४ चे कार्यादेशान्वये खरेदी करुन, दिनांक २२ जुलै, २००४ रोजी कार्यान्वीत केलेली आहे. सदर कार्यादेशातील **ई** नुसार दुरध्वनी यंत्रणेचा हमी कालावधी संपलेनंतर पुढील कालावधीकरिता वार्षिक दुरुस्ती व देखभाल करार करावयाचा असल्यास, दूरध्वनी यंत्रणा खरेदीच्या एकूण किंमतीच्या ९% रक्कम आदा करण्यात यावी, असे ठरलेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ६.०९.२००८ चे सभेतील निर्णय क्र.६९३ नुसार मे. सिमेन्स एन्टरप्राईजेस कम्युनिकेशन्स प्रा. लि., मुंबई यांचेशी Siemens Hipath ४३००IP या डिजीटल अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेचा दिनांक २२/०७/२००८ ते दिनांक २१/०७/२००९ या एक वर्षाचे कालावधीचा दुरुस्ती देखभाल करार करण्यात आलेला आहे. सदर कराराची मुदत दिनांक २१/०७/२००९ रोजी संपुष्टात येत असल्याने, पुढील कालावधीसाठी ( दिनांक २२/०७/२००९ ते दिनांक २१/०७/२०१०) दुरुस्ती देखभाल कराराचे नुतनिकरण करणेसाठी मे. सिमेन्स एन्टरप्राईजेस कम्युनिकेशन्स प्रा. लि., मुंबई यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावात कार्यादेशातील **ई** नुसार दूरध्वनी यंत्रणा खरेदीच्या एकूण किंमतीच्या ९% रक्कम रुपये २,१०,७५५/- इतका खर्च कळविलेला आहे.

Siemens Hipath ४३००IP ही अंतर्गत दूरध्वनी यंत्रणा नविन डिजीटल तंत्रज्ञानावर आधारित आहे. दूरध्वनी यंत्रणा व्यवस्थीत कार्यान्वीत राहण्यासाठी मे. सिमेन्स एन्टरप्राईजेस कम्युनिकेशन्स प्रा. लि., मुंबई यांचेशी करण्यात आलेल्या कराराचे पुढील एक वर्षासाठी (दिनांक २२/०७/२००९ ते दिनांक २१/०७/२०१०) नुतनिकरण करुन दुरुस्ती-देखभाल कराराची रक्कम रुपये २,१०,७५५/- मात्र त्यांना अदा करणेत यावे, असे नम्र मत आहे.

उपरोक्त विवेचनानुसार, मे. सिमेन्स एन्टरप्राईजेस कम्युनिकेशन्स प्रा. लि., मुंबई यांचेशी Siemens Hipath ४३००IP या डिजीटल अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेचे पुढील एक वर्षाकरिता (२२/०७/२००९ ते दिनांक २१/०७/२०१०) करण्यात आलेल्या दुरुस्ती देखभाल कराराचे नुतनिकरण करण्यास व यासाठी रुपये २,१०,७५५/- मात्र मे. सिमेन्स एन्टरप्राईजेस कम्युनिकेशन्स प्रा. लि., मुंबई अदा करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.६२०, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मे. सिमेन्स एन्टरप्राईजेस कम्युनिकेशन्स प्रा. लि., मुंबई यांचेशी Siemens Hipath 4300 IP या डिजीटल अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेचे पुढील एक वर्षाकरिता (२२/०७/२००९ ते दिनांक २१/०७/२०१०) करण्यात आलेल्या दुरुस्ती देखभाल कराराचे नुतनिकरण करण्यास व याकामी येणारे रक्कम रुपये २,१०,७५५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३२ सत्यनारायण पूजा जुन्या प्रसादालयात करणे,बॅचेस वाढविणे व त्याकामी लागणारे साहित्य खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमार्फत श्री साईसत्यनारायणव्रत पुजा दररोज केली जाते. सध्या एका बॅचमध्ये १०० सत्यनारायण पुजा करण्यात येतात. पहिली बॅच सकाळी ०८.०० ते ०९.००, दुसरी बॅच १०.३० ते ११.३० करण्यात येते. गर्दीनुसार बॅचेसमध्ये वाढ करण्यात येते. त्यामध्ये तिसरी बॅच दुपारी ०१.०० ते ०२.०० व चौथी बॅच ०३.०० ते ०४.०० या वेळात घेण्यात येतात. श्रावण मासात सत्यनारायण पुजेचे तिकीट मिळण्यासाठी भक्तांची व ग्रामस्थांची मोठया प्रमाणात चढाओढ असते. पुजेची तिकीटे संपल्यानंतर त्यांच्यामध्ये नाराजी होते.

यासाठी श्रावण मासात जुन्या प्रसादालय हॉलमध्ये जादा पुजेची व्यवस्था करावी असे वाटते. साधारणपणे एका बॅचमध्ये २०० पुजा याप्रमाणे ०४ बॅचेसमध्ये ८०० पुजाविधी करता येतील. यासाठी जादा पुजेचे साहित्य खरेदी करावे अथवा देणगी आलेस स्विकारणेत यावे.

**अ)** सध्या वापरात असलेल्या प्रमाणे सत्यनारायण पुजेसाठी सागवाणी लाकडाचे चौरंग व पाट बनविल्यास प्रति नग ०१ चौरंग व ०२ पाटास अंदाजे रु.२,५००/- इतका खर्च येतो. पुजेसाठी आणखी १५० नग चौरंग व ३०० नग पाट खरेदी करावे लागणार आहेत. त्यासाठी अंदाजे रु.३,७५,०००/- इतका खर्च व पुजेसाठी लागणारे साहित्य (मुर्ती, भांडी व इतर) खरेदीसाठी अंदाजे रु.१,२५,०००/- इतका खर्च असा एकूण रु.५,००,०००/- खर्च अपेक्षित आहे.

**ब)** सत्यनारायण पुजेसाठी राणावत लाकूड (जाड प्लायवूड) चे चौरंग व पाट बनविल्यास प्रति नग ०१ चौरंग व ०२ पाटास अंदाजे रु.५५०/- इतका खर्च येतो. पुजेसाठी आणखी १५० नग चौरंग व ३०० नग पाट खरेदी करावे लागणार आहेत त्यासाठी अंदाजे रु.८२,५००/- इतका खर्च व पुजेसाठी लागणारे साहित्य (मुर्ती, भांडी व इतर) खरेदीसाठी अंदाजे रु.१,२५,०००/- इतका खर्च असा एकूण रु.२,०७,५००/- खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त दर्शविलेल्या अ किंवा ब पर्यायापैकी निर्णय होऊन खर्चास मान्यता मिळावी व पुजेचे साहित्य खरेदीकामी खरेदी विभागामार्फत पुढील कार्यवाहीसाठी आदेश होणेस विनंती. तसेच जुन्या साईप्रसादालयाचे हॉलमध्ये सत्यनारायण पुजेच्या जादा बॅचेस घेणेत मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.६२१ सदरहू प्रस्ताव अमान्य करण्यात आला. मात्र फक्त श्रावण महिन्याचे कालावधीत गर्दी वाढणार असल्याने सत्यनारायण पुजेची सध्याची व्यवस्था चालू ठेवावी. तसेच जुन्या प्रसादालयातही व्यवस्था करण्यात यावी, याबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घ्यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक, मंदीर विभाग)

---

**विषय नं.३३ कॅश काऊंटिंग बंदोबस्तकामी सशस्त्र पोलिस कर्मचाऱ्यांचे शुल्काबाबत**

**प्रस्ताव-** दक्षिणा पेटी मोजणी बंदोबस्तकामी व मोजणी नंतर कॅश विविध बँकेत जमा करणेसाठी वहातूकी दरम्यान सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून एक सशुल्क सशस्त्र पोलिस कर्मचारी तैनात असतो.

उपरोक्त कामी मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.३०.०५.०३ चे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं ०९ व निर्णय क्रं.२४२ (ड) अन्वये प्रतिदिनी सशस्त्र पोलिस शुल्क रु.२९४/- प्रमाणे वार्षीक रु. १७,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

परंतु आता सरकारी नियमानुसार सशस्त्र पोलिस कर्मचाऱ्यांचा प्रतिदिनी दर रु.५८०/-इतका वाढलेला असून महिन्यातून ०८ कॅश-कांऊटिंग असे वार्षिक ९६ कॅश-कांऊटिंग अंदाजे गृहीत धरुन प्रतिवर्षी अंदाजे रु.५५,६८०/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

सदरील शुल्क हे आगाऊ दर सहा-सहा महिण्याचे अंतराने सरकारी नियमानुसार पोलिस स्टेशनला भरावे लागते.

करीता कॅश-कांऊटिग बंदोबस्त कामी सशुल्क सशस्त्र पोलिस कर्मचारी यांचेवर सरकारी नियमाप्रमाणे होणाऱ्या दर वाढीप्रमाणे दर वर्षीचे वार्षिक खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६२२ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.३४ बस क्र.एमएच-१७-टी-८५०५ चे टचअप दुरुस्ती खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** वाहन विभागाकडील बस क्रं.एमएच-१७/टी-८५०५ (टाटा बस) चा वापर साईभक्तांना न.भक्तनिवास स्थान ते मंदीर परिसर येथे ने-आण करणे करीता होत आहे. दि.२५/०३/२००९ रोजी न.भ.नि. स्थानचे पोर्चमधून गाडी वळवितांना कंत्राटी वाहन चालक श्री डिवरे यांचेकडून इंग्लिश मिडीयमस्कुलचे गेटसमोर रस्त्याचे कडेच्या सिमेंट ओटयास गाडी घासली. त्यामुळे गाडीची ड्रायव्हर बाजुकडील बॉडीचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले होते. निष्काळजीपणे वाहन चालविल्यामुळे सदर वाहन चालकास दि.२६/०३/२००९ पासून कामावरून कमी करण्यात आलेले आहे.

मा.कार्यकारी अधिकारी कार्यालय आवकनं.२७५१ दि.१९.०४.२००९ चे टिपणीनुसार, दि.१५.०४. २००९ पासून उन्हाळी सुट्टी असलेने श्री साईबाबांचे दर्शनाकरीता येणाऱ्या साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर बसचे तातडीने टचअप दुरूस्तीचे काम करून घेणेस तसेच याकामी येणाऱ्या रू.४० ते ४५ हजार मात्रचे खर्चास मान्यता घेण्यात आली होती.

उपरोक्त मान्यतेनुसार, सदर बसचे टचअप दुरूस्तीचे कामाकरीता परिसरातील बॉडी बिल्डर्स यांचेकडून कोटेशन बोलाविण्यात आलेले होती. सदर कोटेशन दि.०४/०६/२००९ रोजी समक्ष उघडणेत आली होती.

समक्ष उघणेत आलेल्या कोटेशनचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.नं. | बॉडी बिल्डर्सचे नांव | रक्कम |
|---|---|---|
| ०१. | जया ॲटो गॅरेज, शिर्डी. | ३६,०००.०० |
| ०२. | शिवकृपा मोटार बॉडी बिल्डर्स & फॅब्रीकेटर्स, बाभळेश्वर | ४४,५७०.०० |
| ०३. | श्री विश्वकर्मा मोटार बॉडी बिल्डर्स & काच फिटींग वर्क्स, बाभळेश्वर | ३२,५००.०० |

वरील तुलनात्मक तक्त्यातील दरांचा विचारकरता श्री विश्वकर्मा मोटार बॉडी बिल्डर्स & काच फिटींग वर्क्स, बाभळेश्वर यांचे निम्नतम दर रू.३२,५००/- मात्र मा.कार्यकारी अधिकारी कार्यालय आवक नं. ३८५२ दि.०९/०६/२००९ चे टिपणीनुसार मान्य करणेत येवुन त्यांचेकडून सदर बसच्या टचअप दुरूस्तीचे काम करून घेण्यात आलेले आहेत. नुकसान भरपाई बाबत विमाधारक दि.न्यु इंडीया एंन्शोरन्स कंपनी यांचेकडे विमा क्लेम करण्यात आलेला आहे.

तरी बस क्रं.एमएच-१७/टी-८५०५ चे टचअप दुरूस्तीचे काम करून घेणे कामी आलेल्या रू.३२,५००/- (अक्षरी रक्कम बत्तीस हजार पाचशे) मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यते बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.६२३ यावर सविस्तर चर्चा होऊन, बस क्रं.एमएच-१७/टी-८५०५ चे टचअप दुरूस्तीचे काम करून घेणे कामी आलेल्या रू.३२,५००/- (अक्षरी रक्कम बत्तीस हजार पाचशे) मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.३५ वाहन क्र. एमएच१५/बी.जे/८८८८ चे नुकसान भरपाई बाबत.**

**प्रस्ताव-** दि.३१/०५/२००९ रोजी वाहन विभागाकडील महिंद्रा मॅक्स क्रं.एमएच-१७/टी-७११२ या वाहनावर कंत्राटी वाहन चालक, श्री अमोल सुभाष कोते हे जनरल डयुटीवर (सकाळी १०.०० ते १८.००) होते.

सकाळी १०.०० वा. डयुटीवर आलेनंतर श्री कोते हे सदर वाहन नवीन प्रसादालय येथून मालवाहतुकी करीता कर्मचारी घेउन साईनिवास भांडार येथे गेले असता भांडारमध्ये दुसरे वाहन उभे असलेने त्यांनी सदर वाहन भांडार समोर पार्क करून लघुशंकेकरीता गेले. जातेवेळेस वाहनाची चावी त्यांचेकडून गाडीत राहीली. श्री कोते गेले नंतर मालभरणेकरीता गाडीसोबत आणलेले श्री मधुकर चंद्रकांत वाणी (कंत्राटी मदतनीस, प्रसादालय विभाग) यांनी गाडी चालू केली व मागे घेतली. सदर गाडी मागे घेते वेळेस तेथे पार्किंगमध्ये उभ्या असलेले मा. विश्वस्त श्री. के. सी. पांडे सो. यांच्या गाडीस (ऑडी- एमएच-१५/बीजे-८८८८) धक्का लागला. त्यामुळे श्री पांडे सो. यांच्या वाहनांचे पुढील भंपरचे नुकसान झाले. संस्थान वाहनाचे काहीही नुकसान झालेले नाही.

विमा क्लेम करणे करीता पोलीस पंचनामा आवश्यक असलेने मा. विश्वस्त श्री पांडे सो. यांचे वाहनावरील वाहन चालक यांनी संस्थान वाहन व वाहन चालक यांचे बाबत पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली. शिर्डी पोलीस स्टेशन यांनी वाहन चालका विरुध्द निष्काळजीपणे वाहन चालविले बद्दल गुन्हा दाखल केलेला आहे. तसेच त्याबाबत जाब जवाब घेणे बाबतचे काम पोलीस स्टेशन मार्फत चालु आहे.

दि.२५/०६/२००९ चे पत्राने, मा. विश्वस्त श्री. के. सी. पांडे सो. यांनी वाहनांचे भंपर व इतर पार्ट फायबरचे असल्यामुळे इन्शुरस क्लेम मिळत नसलेने नुकसान भरपाई पोटी रु.१,३७,२८९/- मात्र रक्कम श्रेयान्स ॲटोमोबाईल्स, प्रा. लि., मुंबई यांचे नांवे डी.डी. ची मागणी केलेली आहे.

तरी मा. विश्वस्त श्री. के. सी. पांडे सो. यांचे वाहन क्रं. एमएच-१५/बीजे-८८८८ चे नुकसान भरपाई पोटी श्रेयान्स ॲटोमोबाईल्स, प्रा. लि., मुंबई यांचे नांवे रु.१,३७,२८९/- मात्र रक्कमेचा डी.डी. देणे बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे पुढील निर्णयाकरीता सविनय सादर.

**निर्णय क्र.६२४ सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वाहन विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३६ व्दारावती इमारतीच्या टेरेसवरील पाण्याच्या टाकीज सिरीज करणेकामी लागणारे प्लंबींग मटेरिअल खरेदी करणेबाबत**

**प्रस्ताव-** व्दारावती भक्तनिवास या इमारतीचे प्लंबींग काम हे ठेकेदार यांचेमार्फत पूर्ण करण्यात आलेले आहे. यामध्ये टाक्या हया स्वतंत्र पाईपने एकमेकांना (सिरीज) जोडणे आवश्यक होते. हे काम ठेकेदार मार्फत होणेसाठी बांधकाम विभागामार्फत त्यांना वेळोवेळी कळविले होते. परंतू टेंडरमध्ये हे काम नसल्याने त्यांनी असमर्थता दर्शविली. सर्व टाक्या एकमेकांना स्वतंत्र पाईपने जोडलेल्या नसल्याने पुर्व बाजुच्या टाक्या रिकाम्या रहातात. ज्या टाकीत पाणी पडते त्या टाकीच्या जवळील रुमलाच फक्त पाणी येते. त्यामध्ये अजुन सोलर सिस्टीम चालू होणे बाकी आहे. याचाच परिणाम म्हणून दि.०३.०६.२००९ रोजी व्दारावतीच्या काही रुमला पाणी नव्हते. म्हणून या विषयी चर्चा करणेसाठी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांच्या कक्षात झालेल्या मिटींगमध्ये सदरचे काम विभागांतर्गत करुन घेणेविषयी आदेश दिलेले आहे. तेथील सर्व रुमला सारख्याच दाबाने पाणी जाणेकरीता सर्व टाक्या स्वतंत्र पाईपने एकमेकांना जोडणे (सिरीज करणे) आवश्यक आहे. त्याकरीता खालीलप्रमाणे मटेरीयल खरेदी करावे लागेल.

| अ. नं. | तपशील | साईज | कंपनी | मागणी | अंदाजे दर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जी.आय.पाईप सी-क्लास | ३" | प्रकाशसुर्या/ झेनिथ | ७९० फुट | २३०/- प्रती फुट | १,८१,७००.०० |
| २ | जी.आय.पाईप सी-क्लास | २.१/२" | प्रकाशसुर्या/ झेनिथ | ७९० फुट | २०५/- प्रती फुट | १,६१,९५०.०० |
| ३ | जी.आय.पाईप सी-क्लास | २" | प्रकाशसुर्या/ झेनिथ | १०० फुट | १७५/- प्रती फुट | १७,५००.०० |
| ४ | एअर व्हॉल | १" | इंटालियन मॉडेल | १० नग | ६४५/- प्रती नग | ६,४५०.०० |
| ५ | रबर शिट | ५ एमएम | हेवी | २५ किलो | ७०/- किलो | १,७५०.०० |
| ६ | एम.एस. नटबोल्ट | ५/८" x २" | हेवी | ४० किलो | ९०/- किलो | ३,६००.०० |
| ७ | फ्लॅन्ज टाईप गेट व्हॉल बीडाचे | ३" | ISI- हेवी | ०४ नग | २३००/- प्रती नग | ९,२००.०० |
| ८ | फ्लॅन्ज टाईप गेट व्हॉल बीडाचे | २.१/२" | ISI- हेवी | ०४ नग | २१००/- प्रती नग | ८,४००.०० |
| ९ | गेट व्हॉल पितळी | २" | लिडर, साई | ०८ नग | ३०००/- प्रती नग | २४,०००.०० |
| १० | जी.आय. सॉकेट | ३" | ISI- हेवी | ४५ नग | ११०/- प्रती नग | ४,९५०.०० |
| ११ | जी.आय. एल्बो | ३" | ISI- हेवी | ३५ नग | १२८/- प्रती नग | ४,४८०.०० |
| १२ | जी.आय. टि | ३" | ISI- हेवी | १२ नग | २१०/- प्रती नग | २,५२०.०० |
| १३ | जी.आय. टि | ३"x२" | ISI- हेवी | ०४ नग | २१०/- प्रती नग | ८४०.०० |
| १४ | जी.आय. सॉकेट | २.१/२" | ISI- हेवी | ४५ नग | ७४/- प्रती नग | ३,३३०.०० |
| १५ | जी.आय. एल्बो | २.१/२" | ISI- हेवी | ३५ नग | ११०/- प्रती नग | ३,८५०.०० |
| १६ | जी.आय. टि | २.१/२" | ISI- हेवी | १२ नग | १९०/- प्रती नग | २,२८०.०० |
| १७ | जी.आय. टि | २.१/२"x२" | ISI- हेवी | ०४ नग | १९०/- प्रती नग | ७६०.०० |
| १८ | जी.आय. रेडयुसर | ३"x२" | ISI- हेवी | ०४ नग | १७०/- प्रती नग | ६८०.०० |
| १९ | जी.आय. रेडयुसर | ३"x२.१/२" | ISI- हेवी | ०३ नग | १७०/- प्रती नग | ५१०.०० |
| २० | एम.एस. फ्लॅन्ज | ३" | ISI- हेवी | ४० नग | ९५/- प्रती नग | ३,८००.०० |
| २१ | एम.एस. फ्लॅन्ज | २.१/२" | ISI- हेवी | २४ नग | ८५/- प्रती नग | २,०४०.०० |
| २२ | होल टाईट | --- | --- | ०४ किलो | २६०/- प्रती नग | १,०४०.०० |
| २३ | जी.आय. रेडयुसर | २.१/२"x २" | ISI- हेवी | ०४ नग | १९०/- प्रती नग | ७६०.०० |
| | | | | | एकुण- | ४,४६,३९०.०० |
| | | | | | +१२.५ % व्हॅट- | ५५,७९८.७५ |
| | | | | | एकूण अंदाजे रु.- | ५,०२,१८८.७५ |
| | | | | | पुर्णांकित- | ५,०२,१८९.०० |

तरी वरीलप्रमाणे मटेरीयल विहीत नमुन्यात खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व येणाऱ्या अंदाजे एकूण रु.५,०२,१८९/- मात्रचे खर्चास मान्यता मिळावी, हि विनंती.

**निर्णय क्र.६२५ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे व्दारावती इमारतीच्या टेरेसवरील पाण्याच्या टाकीज सिरीज करणेकामी लागणारे प्लंबींग मटेरिअल विहित पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ५,०२,१८९/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग/पाणीपुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.३७ श्रीसाईसतचरित्र Czech भाषेत प्रकाशित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** Jitka Kucerova, यांनी दि.०५.०६.२००९ चे इमेल पत्रात श्री साई सत्चरित्र Czech भाषेत रुपांतर करुन साईचरित्र तयार केले आहे. Czech साईभक्तांसाठी प्रकाशित करणेस परवानगी मिळल्यास भक्तांना चांगलाच उपयोग होईल असे कळविले आहे. Czech भाषेत साईचरित्र प्रकाशित करणेसाठी ६ साईभक्तांनी देणगीस्वरुपात पैसे दिले आहे. Czech भाषेतील भक्तांना इंग्रजी भाषा अवगत नाही.

संस्थान Czech भाषेत श्री साई सत्‌चरित्र प्रकाशित करण्यास तयार असेल तर प्रकाशनाचे सर्व हक्क संस्थानला देण्यास तयार असलेबाबत कळविले आहे.

श्री साईबाबांच्या जीवन व कार्याचा प्रचार व प्रसार जगभर व्हावा या दृष्टीने त्यांना परवानगी देणेस हरकत नाही असे वाटते.

संस्थान काऊंटरवर Czech या भाषेतील चरित्राची कोणत्याही भक्ताकडून मागणी झालेली नाही. त्यामुळे संस्थान मार्फत प्रकाशित करणे योग्य वाटत नाही.

संस्थानने प्रकाशित होणा-या प्रकाशनाची वाढती संख्या विचारात घेऊन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०५.२००८ चे सभेत "इतर कुठल्याही अन्य खाजगी प्रकाशनांचे हक्क स्वीकारण्यात येऊ नयेत" असा निर्णय क्र.४१५ झालेला आहे.

सबब श्री साईबाबांचे कार्याचा प्रचार-प्रसार व्हावा ह्या हेतूने त्यांना मुळ संहितेत बदल न करता ना नफा ना तोटा या तत्त्वावर श्री साईसच्चरित्र, Czech भाषेत प्रकाशन करण्यास परवानगी देणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.६२६ याबाबत तपासणी करुन सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.३८ संस्थान प्रकाशने ,पुस्तके/फोटो दैनंदिनी/दिनदर्शिका-२००९ व ऑडिओ कॅसेट/सीडी,व्हीसीडी ,फोटो स्टॉक संभावना खर्चाला कार्योत्तर मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.लेखापरिक्षक अभय शास्त्री ॲण्ड एसोशिएशन,पुणे यांचे प्रतिनिधी यांनी प्रकाशने विभागाचे पुस्तके/ फोटो/ दैनंदिनी/ दिनदर्शिका, कॅसेट/ सी.डी. तपासणी करतेवेळी - प्रकाशने विभागातून ज्या संस्थानअतर्गत ज्या-त्या विभागामार्फत पुस्तके/फोटो, दैनंदिनी/दिनदर्शिका कॅसेट/सी.डी. मोफत देण्यात आलेल्या आहेत अशा पुस्तके/ फोटो/ दैनंदिनी/दिनदर्शिका कॅसेट/सी.डी. चे होणा-या एकूण प्रतींना व रकमेला मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी असे निर्देश दिलेले आहेत. सन २००८-२००९ या कालावधीत प्रकाशने विभागाद्वारा मा. कार्यकारी अधिकारी व मा.प्रशासकीय अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या मान्यता प्राप्त आदेशानुसार संस्थानअंतर्गत ज्या त्या खात्याचे संबंधीत संपर्कातील अधिका-यांना तसेच वेगवेगळया क्षेत्रातील अति महत्त्वाच्या व्यक्तिंना त्यांचे शिर्डी भेटीअंती जनसंपर्क कार्यालयामार्फत खालील दर्शविल्याप्रमाणे पुस्तके/फोटो व कॅसेट/सी.डी., दैनंदिनी/ दिनदर्शिका मोफत देण्यात आलेल्या आहेत.

| पी यु बी नं. | पुस्तकाचे नांव | भाषा | मोफत नग | छपाई दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| पी यु बी नं.१ | श्री साई सच्चचरीत्र | मराठी | ८२ | ६५.४० | ५,३६२.८० |
| पी यु बी नं..२ | श्री साई सत्‌चरीत्र | हिंदी | ३१ | २५.३५ | ७८५.८५ |
| पी यु बी नं..३ | श्री साई सत्‌चरीत्र | इंग्रजी | १८ | २३.३० | ४१९.४० |
| पी यु बी नं..४ | श्री साई सत्‌चरीत्र | गुजराथी | ४ | ३२.१५ | १२८.६० |
| पी यु बी नं..५ | श्री साई सत्‌चरीत्र | कन्नड | १ | २६.९८ | २६.९८ |
| पी यु बी नं..६ | श्री साई सत्‌चरीत्र | तेलगु | १ | २८.८७ | २८.८७ |
| पी यु बी नं..७ | श्री साई सत्‌चरीत्र | तामीळ | १ | ३२.९० | ३२.९० |
| पी यु बी नं..१४ | श्री साई सगुणोपासना आरती | मराठी | २० | २.२० | ४४.०० |
| पी यु बी नं.१८ | श्री साई सगुणोपासना पुजाविधी आरती | तेलगु | ५० | ६.६९ | ३३४.५० |
| पी यु बी नं.२१ | श्री साई स्तवन मंजरी | इंग्रजी | ५ | ३.७५ | १८.७५ |
| पी यु बी नं.२२ | श्री साई स्तवन मंजरी | गुजराथी | ४ | २.१८ | ८.७२ |
| पी यु बी नं.२३ | अर्वचिन भक्त व संत लिलामृत यातील चार अध्याय | मराठी | १ | ४.७५ | ४.७५ |
| पी यु बी नं.३१ | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | १ | ५.१३ | ५.१३ |
| पी यु बी नं.३३ | मुलांचे साईबाबा | कन्नड | ४ | ५.४९ | २१.९६ |
| पी यु बी नं.३७ | साईबाबा ऑफ शिरडी प्रधान | इंग्रजी | १ | ४.२५ | ४.२५ |
| पी यु बी नं.३८ | साईबाबा ऑफ शिरडी भरुचा | इंग्रजी | १ | ७.०० | ७.०० |
| पी यु बी नं ४१ | गुरुपाठाचे अभंग | मराठी | १ | २.५२ | २.५२ |
| पी यु बी नं.४३ | श्री साईचें सत्य चरित्र | मराठी | १२ | ७६.०५ | ९१२.६० |
| पी यु बी नं.४७ | साईनाथ स्तवन मंजरी | कन्नड | १ | २.५५ | २.५५ |
| पी यु बी नं.४९ | श्री साई सगुणोपासना आरती | इंग्रजी | ४ | १०.९९ | ४३.९६ |
| पी यु बी नं.५४ | दैनंदिन साईबोध | मराठी | ४ | ३८.०० | १५२.०० |
| पी यु बी नं.५६ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती | हिंदी | ४१ | ७.५० | ३०७.५० |
| पी यु बी नं.६० | साईबाबा शिकवण आणि तत्वज्ञान | मराठी | १ | ९.८३ | ९.८३ |
| पी यु बी नं.६१ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती | तामीळ | ४ | ९.०५ | ३६.२० |
| पी यु बी नं.६२ | श्री साई सत्‌चरित्र | बंगाली | १ | २९.२४ | २९.२४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पी यु बी नं.६३ | श्री साई माहात्म्य | मराठी | १ | १२.९५ | १२.९५ |
| पी यु बी नं.६५ | श्री साई सत्चरित्र तेलगु पोथी | तेलगु | ३ | ५२.०० | १५६.०० |
| पी यु बी नं.६७ | श्री साई दोहावली | हिंदी | ३ | ५९.६१ | १७८.८३ |
| पी यु बी नं.६९ | मातृ साई | तेलगु | २ | २७.३२ | ५४.६४ |
| पी यु बी नं.७४ | श्री साई समर्थ चरित्र | इंग्रजी | ४ | १३४.५० | ५३८.०० |
| पी यु बी नं.७५ | श्री साई सत्चरित्र स्टोरी | तेलगु | १४ | ९९.५० | १,३९३.०० |
| | | | पुस्तकांची एकूण रक्कम- | | **११,०६४.२८** |
| पी यु बी नं. | फोटोचे नांव | भाषा | मोफत नग | छपाई दर | एकुण रुपये |
| पी यु बी नं.१३२ | समाधी फोटो ३d | २.५x३.५ | ६८ | ६.५० | ४४२.०० |
| | | | फोटोची एकुण रक्कम- | | **४४२.००** |

| **पी यु बी नं.** | **सी.डी/कॅसेटचे गांव** | **भाषा** | **मोफत नग** | **छपाई दर** | **एकुण रुपये** |
|---|---|---|---|---|---|
| पी यु बी नं.२०४ | गुरुपाठाचे अभंग | सी डी -२ | २ | २१.४२ | ४२.८४ |
| पी यु बी नं.२०५ | ओंकार साधना | Acd/Vcd | २ | २५.४७ | ५०.९४ |
| पी यु बी नं.२०८ | मंदिर आरती व्हीडीओ | Vcd-२ | १६ | २२.२० | ३५५.२० |
| पी यु बी नं. २०९ | शिर्डी दर्शन | vcd | ३ | १५.१८ | ४५.५४ |
| पी यु बी नं. २१० | मंदिर आरत्या Dvd | Dvd | ५ | ३७.४४ | १८७.२० |
| पी यु बी नं..२११ | श्री साई चरित्र Mp3 | तेलगु Acd | १२१ | ५४.०८ | ६,५४३.६८ |
| पी यु बी नं..२१२ | श्री साई सत्चरित्र Mp3 | मराठी Acd | ५५ | ७०.५० | ३,८७७.५० |
| पी यु बी नं..२१३ | साई सत्चरित्र दोहावली | हिंदी Acd | १०७ | ५७.५० | ६,१५२.५० |
| पी यु बी नं..२१४ | मंदिर आरती Mp3 | मराठी Acd | १ | १४.६० | १४.६० |
| पी यु बी नं..२१५ | श्री साई की आरतियाँ | मराठी हिंदी cd | १६ | १५०.०० | २,४००.०० |
| | | | | एकुण कॅसेट /सी.डी मोफत र | **१९,६७०.००** |
| पी यु बी नं. ३०५ | श्री साई दैनंदिनी २००९ | मराठी | २५३६ | ५३.०० | १३४,४०८.०० |
| पी यु बी नं..४१२ | श्री साई दिनदर्शिका २००९ | १ पानी | १६८० | १०.०० | १६,८००.०० |
| पी यु बी नं..४१३ | श्री साई दिनदर्शिका २००९ | १ पानी | १९९९ | ४.५० | ८,९९५.५० |
| पी यु बी नं..४१० | श्री साई दिनदर्शिका २००९ | ८ पानी | २०६ | १८५.०० | ३८,११०.०० |
| पी यु बी नं.३०४ | श्री साई दैनंदिनी ०८ | मराठी | ४७ | ४९.५० | २,३२६.५० |
| पी यु बी नं.४०८ | श्री साई दिनदर्शिका २००८ | १ पानी | २ | ४.७५ | ९.५० |
| पी यु बी नं..४०९ | श्री साई दिनदर्शिका २००८ | ६ पानी | २ | ८.४० | १६.८० |
| पी यु बी नं..४११ | श्री साई दिनदर्शिका २००९ | ६ पानी | १० | २७.५० | २७५.०० |
| पी यु बी नं..४१४ | श्री साई दिनदर्शिका २००९ | थ्रीडी ७ पाने | ४ | १४५.०० | ५८०.०० |
| | | | | एकुण डायरी कॅलेंडर मोफत रक्कम | **२०१,५२१.३०** |

| | |
|---|---|
| एकुण मोफत पुस्तके रक्कम | ११,०६४.२८ |
| एकुण मोफत फोटो रक्कम | ४४२.०० |
| एकुण कॅसेट /सी.डी रक्कम | १९,६७०.०० |
| एकुण डायरी कॅलेंडर रक्कम | २,०१,५२१.३० |
| एकुण रक्कम | २,३२,६९७.५८ |

उपरोक्तप्रमाणे माहे एप्रिल २००८ ते माहे मार्च २००९ या कालावधीत पुस्तके/फोटो,कॅसेट/सी.डी. व दैनंदिनी/दिनदर्शिका पोस्टेज स्टॉकमधून कमी करुन संभावना खाती खर्ची टाकण्यात आल्याने त्याची होणारी पुर्णांकित एकूण रक्कम रु २,३२,६९८.०० मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता असावी .

तसेच श्री साईभक्त श्री कोठान्नद रमन,चेन्नई यांचेकडून देणगी दाखल प्राप्त झालेले श्री साई सत्चरीत्र तामिळ हे संस्थान प्रकाशित नसल्याने १०२४ नग दर रु. ९९/- प्रमाणे रु. १,०१,३७६/- देणगी म्हणून संस्थानचे देणगीदार श्री रमनी यांचे चेन्नई येथील साई मदिरास देणगी पाठविण्यात आले आहे.त्याचे रु. १,०१,३७६/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता असावी.

**निर्णय क्र.६२७ उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.३९ कोपरगांव तालूक्यातील मंजूरी मिळालेल्या पिण्याचे पाण्याचे योजनांना १० टक्के लोकवर्गणीची अर्थिक निधीची मदत देणेबाबत**

**प्रस्ताव-** मा.उपाध्यक्ष श्री. शंकरराव कोल्हे यांनी दि.०३/०७/२००९ चे पत्रान्वये, कोपरगांव तालुक्यातील ११ गावांना पिण्याच्या पाण्यांची तीव्र टाचाई असून तेथे पिण्याच्या पाण्याच्या योजनांचा आराखडा तयार तयार करण्यात आलेला आहे. त्याचा एकूण खर्च रुपये ३,८१,६७०००/- आहे. त्यापैकी गांवकऱ्यांनी १० लोकवर्गणी म्हणुन रुपये १७,६३,०००/- जमा केले आहे. तरीही लोकवर्गणी पोटी २० लाख, ५३ हजार रुपयांची ही लोकवर्गणीची रक्कम जमा होऊ शकत नसल्यामुळे सदरच्या योजना अनेक वर्षापासून रखडल्या आहेत. मानवतेच्या दृष्टीकोनातुन या गावांच्या पिण्याच्या पाण्याच्या योजनांच्या कामांना संस्थानच्या मा. व्यवस्थापन समितीच्या बैठकीत मान्यता घेऊन त्यास तातडीने संस्थान मार्फत रुपये २०,५३,०००/- (रु.विस लाख,त्रेपन्न हजार मात्र) निधी उपलब्ध करुन देणेचे कळविले आहे.

| अ.न. | योजनेचे नांव | अंदाजपत्र-कीय रक्कम लक्ष रुपये | १० टक्के लोक वर्गणी लक्ष रुपये | जमा झालेली लोकवर्गणी लक्ष रुपये | उर्वरित आवश्यक लागणारी लोकवर्गणी लक्ष रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे शिंगणापुर येथे नळ पाणिपुरवठा योजना करणे | ४७.६७ | ०४.७७ | ०२.७१ | ०२.०६ |
| २ | मौजे ओगदी येथे नळ पाणिपुरवठा योजना करणे | १६.०० | ०१.६० | ००.३१ | ०१.२९ |
| ३ | मौजे उक्कडगांव येथे नळ पाणिपुरवठा योजना करणे | २५.५० | ०२.५५ | ००.५३ | ०२.०२ |
| ४ | मौजे पोहेगांव येथे नळ पाणिपुरवठा योजना करणे | ७३.३५ | ०७.३३ | ०३.६७ | ०३.६६ |
| ५ | मौजे जेऊरकुंभारी येथे नळ पाणिपुरवठा योजना करणे | ०६.१७ | ००.६२ | ००.०० | ००.६२ |
| ६ | मौजे कुंभारी येथे नळ पाणिपुरवठा योजना करणे | ३२.०० | ०३.२० | ०१.६० | ०१.६० |
| ७ | मौजे सहजानंदनगर येथे नळ पाणिपुरवठा योजना करणे | ४८.५० | ४.८५ | ०३.५० | ०१.३५ |
| ८ | मौजे धामोरी येथे नळ पाणिपुरवठा योजना करणे | ३९.३१ | ०३.९३ | ०२.३१ | ०१.६२ |
| ९ | मौजे सोनारी येथे नळ पाणिपुरवठा योजना करणे | ३५.३७ | ०३.५३ | ०१.५० | ०२.०३ |
| १० | मौजे नाटेगांव येथे नळ पाणिपुरवठा योजना करणे | २७.८० | ०२.७८ | ०१.५० | ०१.२८ |
| ११ | मौजे कोल्हेवस्ती येसगांव येथे नळ पाणिपुरवठा योजना | ३०.०० | ०३.०० | ००.०० | ०३.०० |
| | **एकूण रुपये-** | **३८१.६७** | **३८.१६** | **१७.६३** | **२०.५३** |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ (२) (एक) नुसार ग्रामपंचायतींना आर्थिक अनुदान देण्याबाबत तरतुद नाही.

**निर्णय क्र.६२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अधिनियम-२००४ चे कलम २१ (२) नुसार छाननी समितीचे अखत्यारित नसल्यामुळे शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा,असे ठरले.**

(कार्यवाही- प्रशासन शाखा- वशी-०३)

---

**विषय नं.४०** **कोपरगांव तालूक्यातील टाकळी येथील एकलव्य अदिवासी आश्रम शाळेतील मुलींचे वसतीगृह व शाळा खोल्यांचे बांधकामासाठी संस्थानकडून ३० लाखाची आर्थिक मदत देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.उपाध्यक्ष श्री. शंकरराव कोल्हे यांनी दि.०३/०७/२००९ चे पत्रान्वये, कोपरगांव तालुक्यातील भिल्ल, महादेव कोळी व पारधी अशी आदिवासी समाजाची सुमारे १८ हजार विद्यार्थी संख्या असून हा समाज अशिक्षीत आहे. त्याला शिक्षण प्रवाहात सामिल करुन घेण्यासाठी संजीवनी ग्रामिण शिक्षण संस्थेने कोपरगांव तालुक्यातील मौजे टाकळी येथे शासनाच्या आदिवासी विकास विभागाकडुन एकलव्य आदिवासी आश्रम शाळेस इयत्ता १ ली व इयत्ता २ री साठी सन २००४ पासून मान्यता मिळाली आहे. संस्थेने या आदिवासी मुलामुलींच्या शिक्षणासाठी बाहेरुन कर्ज घेऊन इयत्ता ७ वी पर्यंत शाळा खोल्या बांधल्या आहेत.

विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेता इयत्ता ८ वी ते इयत्ता १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी ५ वर्ग खोल्या व मुलींसाठी वसतीगृह असे अनुक्रमे रु.१० लाख व रु.२० लाख असे एकुण ३० लाख खर्चाचे बांधकामाचे नियोजन केले आहे. मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृहाची व्यवस्था करावी असा शासनाचा आग्रह आहे. परंतु एकलव्य आदिवासी आश्रमशाळेची आर्थिक परिस्थीती सक्षम नसल्याने ते मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृहाचे बांधकाम करु शकत नाही. म्हणुन श्री साईबाबा संस्थान मार्फत भरीव मदत देण्यासाठी शिफारस केली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ (२) (एक) नुसार छाननी समितीच्या शिफारसीनुसार राज्य शासनाचे मान्यतेने अनुदान देण्याची तरतुद आहे.

सदरच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली. याकामी छाननी समितीची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्रशासन शाखा- वशी-०३)

---

**विषय नं.४१** **श्री साईबाबा हॉस्पिटलकडील वैद्यकिय अधिकारी यांचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटल कडे खालीलप्रमाणे वैद्यकिय अधिकारी यांच्या एक वर्ष कालावधीसाठी एकत्रित मानधनावर नेमणूका करण्यात आलेल्या असून त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे तारखेस एक वर्ष कालावधी संपुष्टात येत आहे.

| अ.नं. | वैद्यकिय अधिकारी नांव | नेमणूक दिनांक | एक वर्ष कालावधी संपुष्ठात आलेची तारीख | एकूण झालेली सेवा |
|---|---|---|---|---|
| ०१ | डॉ.योगेश बाळकृष्ण गेठे,<br>ई.एन.टी. सर्जन श्री साईबाबा हॅासपीटल<br>(प्रत्यक्षात काम श्री साईनाथ हॉस्पीटल) | ०६/०८/२००८ | ०५/०८/२००९ | ०१ वर्षे |
| ०२. | डॉ.योगिनी हेतल शहा<br>सि.रेडीओलॉजिस्ट,श्री साईबाबा हॉस्पीटल,शिरडी | ०१/०९/२००८ | ३१/०८/२००९ | ०१ वर्षे |
| ०३. | डॉ.अशिष राधेशाम आग्रवाल<br>कार्डीयाक सर्जन श्री साईबाबा हॉस्पीटल, शिरडी | ०१/०९/२००८ | ३१/०८/२००९ | ०१ वर्षे |

सदर एक वर्ष नेमणूकीचे कालावधीमध्ये अ.नं. ०१ वरील वैद्यकिय अधिकारी डॉ.योगेश बाळकृष्ण गेठे, ई.एन.टी.सर्जन यांचे काम समाधानकारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. त्यांचेबाबत मार्च-२००९ या महिन्यात किरकोळ तक्रारी आल्या होत्या. डॉ.कुलकर्णी यांचेबरोबर एकत्र ओ.पी.डी.असतांना त्यांच्या तक्रारी असत. पुर्वी भूलतज्ञ नाही म्हणूण तक्रारी करीत असत. नंतर ओ.पी.डी. वेगळी केली असता आता पेशंट कमी झाले असे म्हणतात. तेथे स्टाफ कमी असल्याने व डॉ.गेठे अतिरिक्त झाल्यामुळे त्यांना प्रत्येक वेळेस स्टाफ उपलब्ध करुन देणेस अडचणी येतात. सदर बाबीचा विचार करुन त्यांना मुदतवाढ द्यावयाची झाल्यास **०६ महिने** तसेच **अ.नं. ०२ व ०३** वरील वैद्यकिय अधिकारी यांचे काम समाधानकारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच हुकूमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात. त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालू नाही किंवा प्रस्तावीत नाहीत. त्यामुळे त्यांना **०१ वर्ष मुदतवाढ** देणेस हरकत नाही असे अभिप्राय, वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी दिले आहेत

वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हॉस्पीटल यांचे संबंधीतांचे बाबत उपरोक्त अभिप्राय विचारात घेऊन **अ.नं. ०१** वरील वैद्यकिय अधिकारी डॉ.गेठे,ई.एन.टी.सर्जन. यांना त्यांची मुदत संपुष्ठात आलेचे तारखेचे लगतचे तारखेपासून पुढे **०६ महिने** मुदतवाढ व तसेच **अ.नं. ०२** वरील डॉ. योगिनी शहा, सि.रेडीओलॉजिस्ट व **०३** वरील डॉ. राधेशाम आग्रवाल, कार्डीयाक सर्जन यांना त्यांची मुदत संपुष्ठात आलेचे तारखेचे लगतचे तारखेपासून पुढे **०१ वर्ष** मुदत वाढ देणेबाबतचे प्रस्तावावर विचार होणेस विनंती.

**निर्णय क्र.६३० डॉ.गेठेंसह सर्वांना १ वर्ष मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ०१. प्रसादालय परिसराचे सुरक्षा संदर्भात प्रसादालय परिसराचे कास्टींग आयर्न कंपाऊंडला आतून सुरक्षिततेकरीता लोखंडी बारीक जाळी बसविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**प्रस्ताव-** प्रसादालय परिसराचे सुरक्षा संदर्भात प्रसादालय परिसराच्या कास्टींग आयर्न कंपाऊंडला आतून सुरक्षिततेकरीता लोखंडी बारीक जाळी बसविणेकामी येणा-या रक्कम रुपये ९,५४,२८१.०० इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८-०३-२००९ चे सभेतील विषय क्र.६९ निर्णय क्र.२३८ अन्वये मान्य करण्यात आला आहे. या कामासाठी येणा-या खर्चास व याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या टेंडरसचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक |
| ०२ | मे.आजाद एन्टरप्राईजेस, नाशिक |
| ०३ | मे.रविंद्र रबर प्रॉडक्टस ॲण्ड फब्रिकेशन, श्रीरामपूर |

उपरोक्तप्रमाणे प्रसादालय परिसराचे सुरक्षा संदर्भात प्रसादालय परिसराच्या कास्टींग आयर्न कंपाऊंडला आतून सुरक्षिततेकरीता लोखंडी बारीक जाळी बसविणेकामी प्राप्त झालेली टेंडर उघडून टेंडरधारकांशी वाटाघाटी / चर्चा करुन निर्णय होणेची विनंती आहे.

**निर्णय क्र.६३१ सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा,असें ठरलें.**

(कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०२. बी.ए.एम.एस. आर.एम.ओ यांचे नियुक्तीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे आकृतीबंधात आर.एम.ओ या पदासाठी एम.बी.बी.एस. ही शैक्षणिक पात्रता, रू. ८०००-१०००० ही वेतनश्रेणी व ४० पदे मंजुर करणेत आलेली आहेत. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये आर.एम.ओं.ना नविन नियुक्ती देतांना रू. १७०००/- मात्र फिक्स पे देण्यात येतो व तदनंतर एक वर्षाने पे स्केल लागु करून एकुण वेतन रू. २२०००/- मात्र पर्यंत देण्यात येते. परंतु श्री साईबाबा हॉस्पिटल सुरू झालेपासून आर.एम.ओ. या पदासाठी आपण वारंवार जाहीरात देऊन आर.एम.ओं ची पदे भरणेत आलेली आहेत. परंतु त्यातील बरेचशे आर.एम.ओ. कमीत कमी एक वर्ष काम न करता राजीनामा देऊन निघुन जातात किंवा संस्थान नियमाप्रमाणे एक महिना पुर्व नोटीस न देता विनापरवानगी गैरहजर असतात. ते गैरहजर असल्यामुळे त्यांचे जागेवर कामाची पर्यायी व्यवस्था म्हणून नविन आर.एम.ओं. ची नेमणुक करता येत नाही. गैरहजेरी व राजीनामा देणा-या आर.एम.ओं.ची संख्या प्रत्येक महिन्याला १० ते १५ असते. त्यामुळे हॉस्पिटलमध्ये आर.एम.ओं. ची कायमच कमतरता असते. त्यामुळे आय.सी.यु., जी.आय.सी.यु., सी.आर.यु., कॅज्युअल्टी अशा अतिदक्षतेच्या ठिकाणी २४ तास तिन्ही शिफ्टमध्ये आर.एम.ओ. उपलब्ध होऊ शकत नसल्याने हॉस्पिटलमधील रूग्णसेवेवर याचा विपरीत परिणाम होतो.

सध्या श्री साईबाबा हॉस्पिटलच्या आस्थापनेवर ३३ आर.एम.ओं. ची नावे असुन त्यातील ४ आर.एम.ओं. नी राजीनामा पुर्व नोटीस दिलेले आहे व ४ आर.एम.ओ. विनापरवानगी गैरहजर आहे. म्हणजे प्रत्यक्षात पुढील महिन्यात २५ आर एम ओ कार्यरत राहतील. २५ आर एम ओ यांच्या रजा, सुट्टया, देतांना अडचणी येणार आहे. अशाप्रकारे कमी जास्त प्रमाणात आरएमओं हे राजीनामा देतात व गैरहजर असतात याकरीता यावर पर्यायी व्यवस्था म्हणुन सध्या मंजुर असलेल्या ४० आर.एम.ओ. पदांपैकी १० बी.ए.एम.एस. वैद्यकीय अधिकारी मानधनावर व ३० एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी नेमणेबाबत विचार व्हावा असे मत आहे कारण भविष्यात एम.बी.बी.एस. आरएमओ उपलब्ध झाल्यास बी.ए.एम.एस. आर.एम.ओ. यांना एक महिना नोटीसपुर्व वेतन देऊन त्यांना सेवासमाप्तीचे आदेश देता येऊ शकते.

तरी उपरोक्तप्रमाणे सर्व परिस्थितीचा विचार करता व एम.बी.बी.एस. उमेदवार हे पुढील उच्च शिक्षणासाठी जात असल्याने ते हॉस्पिटलला सलग सेवा देऊ शकत नाहीत त्यामुळे कामाची पर्यायी व्यवस्था म्हणून बी.ए.एम.एस. आरएमओंना नेमणुक द्यावी. बी.ए.एम.एस. आरएमओंची नेमणुक करतांना सदर उमेदवार हे प्रथम श्रेणीत पास झालेले असावेत, इमर्जन्सी सर्विसेसचा त्यांना तीन वर्षाचा अनुभव असावा असे नियम ठरविण्यात यावेत व ज्या उमेदवारांनी Certificate Course/ Diploma in emergency Services केलेला असेल त्यांचा प्राधान्याने विचार करावा. सदरचे बी.ए.एम.एस. आर.एम.ओ. यांना रू. १००००/- मात्र प्रति माह एकत्रित मानधनावर ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक देणेबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.६३२ यावर सविस्तर चर्चा होऊन, एम.बी.बी.एस., आर.एम.ओ. हे पुढील उच्च शिक्षणासाठी जात असल्याने ते हॉस्पिटलला सलग सेवा देऊ शकत नाहीत त्यामुळे कामाची पर्यायी व्यवस्था म्हणून दहा बी.ए.एम.एस. आरएमओंना नेमणुक द्यावी. बी.ए.एम.एस. आरएमओंची नेमणुक करतांना सदर उमेदवार हे प्रथम श्रेणीत पास झालेले असावेत, इमर्जन्सी सर्विसेसचा त्यांना तीन वर्षाचा अनुभव असावा असे नियम ठरविण्यात यावेत व ज्या उमेदवारांनी Certificate Course/ Diploma in emergency Services केलेला असेल त्यांचा प्राधान्याने विचार करण्यात यावा. सदरचे बी.ए.एम.एस. आर.एम.ओ. यांना रू. १००००/- मात्र प्रति माह एकत्रित मानधनावर ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक देण्यात यावी असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/अधिक्षक,आस्थापना)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०३. दिनांक ०८.०७.२००९ व दिनांक ०९.०७.२००९ रोजी घेण्यात आलेल्या वॉक इन इंटरव्हयूबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे श्री साईनाथ रूग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये आवश्यक असणारे तज्ञ वैद्यकीय अधिकारी वॉक इन इन्टरव्यव्हद्वारे भरणेकामी वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करणेस व त्यानुसार येणा-या डॉक्टरांच्या मुलाखती संचालक व उपवैद्यकीय संचालक यांनी घ्याव्यात असे मा. व्यवस्थापन समितीचे दि.२१/०६/२००९ रोजी चे सभेमध्ये मा. अध्यक्ष महोदय यांनी निर्देश दिलेले होते. त्यानुसार दि.०८/०७/०९ व दि.०९/०७/२००९ रोजी वॉक इन इन्टरव्युव्ह ठेवणेत आले होते. पैकी दि. ०८/०७/२००९ रोजीची वॉक इन इन्टरव्युव्ह मा. विश्वस्त डॉ. गोंदकर सा़े, मा. वैद्यकीय संचालक व उपवैद्यकीय संचालक हे उपस्थित होते. व दि.०९/०७/२००९ रोजी मुलाखती ह्या मा. वैद्यकीय संचालक व उपवैद्यकीय संचालक यांनी घेतलेल्या आहेत. सदर घेणेत आलेल्या मुलाखतींचा तपशिल खालिलप्रमाणे आहे.

| अ. - नं | पदनाम | अर्जदाराचे - नाव | शिक्षण | आकृतीबंधानुसार शैक्षणिक पात्रता व वेतनश्रेणी | श्री साईबाबा | | श्री साईनाथ | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | मंजुर पदे | रिक्त पदे | मंजुर पदे | रिक्त पदे | |
| १ | युरोलॉजिस्ट | | | डी. एम. / डी एन बी | २ | २ | ० | ० | यापदासाठी एकही उमेदवार मुलाखतीस आलेला नाही. |
| २ | युरोसर्जन | डॉ. सुश्रुत एम फुलारे | एमबीबीएस-९८, एमएस(जन. सर्जरी)-२००३, डीएनबी (युरो) -ॲपिअर | एम.एस./ एम.सी.एच./ डी.एन.बी. रू.१०,०००-३२५-१५२०० | २ | १ | ० | ० | काम करणेस इच्छुक आहे प्रतिक्षा यादीवर नं. १ वर ठेवावे असे मत आहे. |
| | | डॉ. राहुल प्रकाश मोदगी | एमबीबीएस-९९, डीएनबी (जन.सर्जरी)-२००३ एमएस (जन.सर्जरी)-२००३, डीएनबी (युरो सर्जरी)-२००७, एमसीएच (युरो सर्जरी)२००६ | | | | | | ०१ ऑक्टोबर २००९ पासून कामावर येण्यास तयार आहे, ३०००० पगार + डॉक्टर शेअर द्यावे व अर्जदार व त्यांचे पत्नी दोघेही डॉक्टर असल्याने फॅमिली कॉर्टर द्यावे असे मत आहे. |
| ३ | युरोसर्जन | | | एम सी एच / डी एन बी | २ | २ | ० | ० | यापदासाठी एकही उमेदवार मुलाखतीस आलेला नाही. |
| ४ | रेडीओलॉजिस्ट | डॉ. विराज राजेंद्रभाई व्यास | एमडी (रेडीओलॉजी)-२००९ | एम.डी. रु.१०,०००-३२५-१५२०० | १ | ० | १ | १ | पगार + इन्सेटीव्हस व फॅमिली कॉर्टरची मागणी केलेली आहे. नेमणुक आदेश देणेबाबत निर्णय व्हावा, असे मत आहे. |
| | | डॉ. पल्लवी बी. गद | डीएमआरडी - २००९ (रिझल्ट अवेटेड) | | | | | | कामावर हजर होण्यास तयार आहे. परंतु पुर्ण एक वर्ष काम करू शकणार नाही. प्रतिमाह ४०००० रू. पगार मिळावा. अशी अपेक्षा व्यक्त कलेली आहे. सदर उमेदवारास कामावर घ्यायचे झाल्यास ज्यु. रेडीओलॉजिस्टचे पद देवुन ३०००० रू. पगार + १०००० रू फिक्स इन्सेनटिव्ह द्यावेत असे मत आहे. |
| | | डॉ. पाटील प्राची अरूण | एमबीबीएस-२००३ एमडी (रेडीओलॉजी)-रिझल्ट अवेटेड | | | | | | काम करणेस इच्छुक आहे प्रतिक्षा यादीवर ठेवावे असे मत आहे. |
| ५ | जनरल फिजिशीयन | डॉ. गुडसुरकर प्रकाश शशिकांत | एमबीबीएस-२००३ डीएनबी (जन. मेडीसीन)-२००९ | एम.डी./ डी.एन.बी. रु.१०,०००-३२५-१५२०० | ४ | २ | २ | १ | ३५०००+ पगाराची अपेक्षा व्यक्त केली. श्री साईनाथ रूग्णालयासाठी निवड करणेत आलेली आहे. तरी त्यांचे पगाराबाबत व श्री साईनाथ रूग्णालयाकडे नेमणुक आदेश देणेबाबत निर्णय व्हावा. |
| ६ | जनरल सर्जन | डॉ. सुजय आर विखे | एमबीबीएस- २००६ एमएस (जन. सर्जरी) २००९ | एम.एस./डी.ए-न.बी. रु.१०,०००-३२५-१५२०० | ४ | ३ | ३ | २ | क्लिनीकल असिस्टंट या पदावर रू. २५००० प्रतिमाह पगारावर निवड करण्यात आलेली असुन क्लिनीकल असिस्टंट या पदावर नियुक्ती आदेश देण्यात आलेले असुन कामावर हजर झालेले आहेत. त्यास मान्यता असावी. |
| | | डॉ. नजन दिपक गुलाब | एमबीबीएस-२००३ एमएस (जन. सर्जरी)-२००६ | | | | | | ०१ ऑगष्ट नंतर निकाल लागणार आहे. कामावर येण्यास तयार आहे.<br>नियमानुसार पगार घेऊन कामावर येण्यास तयार आहे.<br>श्री साईनाथ रूग्णालयाकडे जनरल सर्जन या पदावर नेमणुक द्यावी. असे मत आहे. |
| | | डॉ. पन्हाळे शिरीषकुमार प्रल्हाद | एमबीबीएस-२००२ एमएस (जन. सर्जरी)-२००८ | | | | | | संस्थान नियमाप्रमाणे पगार घेऊन काम करणेस इच्छुक आहे. प्रतिक्षा यादीवर नं. १ वर ठेवावे असे मत आहे. |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | पिडॅट्रीशिया | डॉ. सुवंश एस मेश्राम | एमबीबीएस-२००४ एमडी (पिडॅट्रेसिया)-२००८ | एम.डी./ डी.एन.बी रु.१०,०००-३२५-१५२०० | ४ | ४ | १ | १ | रू. ५००००+ प्रायव्हेट प्रॅक्टीसची मागणी केलेली आहे. याबाबत निर्णय व्हावा असे मत आहे. तसेच घ्यावयाचे झाल्यास श्री साई-नाथ रूग्णालयाकडे घेता येईल. |
| ८ | इन्टेनसिव्हीस्ट | डॉ. मगर पंकज कोंडीराम | एमबीबीएस-२००३ डीटीसीडी-२००८ | एम.डी.(मेडीसिन / अनेस्थेसिया) /एफ. सी. सी. एम. रु.१०,०००-३२५-१५२०० | ३ | २ | ० | ० | चेस्ट फिजिशियन पदाची मागणी केलेली आहे. फिजिशियन पदासाठी पात्र नसल्याने नेमणुक देता येत -नाही, असे मत आहे. |
| ९ | सिनि/ज्यु ॲनॅस्थेसिओलॉजिस्ट | डॉ. प्रशांत पंडीत पवार | एमबीबीएस- २००१ एमडी (ॲनेस्थेसिया)-२००७ | एम.डी. रु.१०,०००/-३२५-१५२०० | ६ | ४ | ४ | ३ | सध्या ज्यु. ॲनेस्थेसिस्ट या पदावर रू. २५००० पगारावर कार्यरत आहे. रू. ३०००० पगार देवुन सिनि. ॲनेथेसिस्ट या पदावर नेमणुक द्यावी. सध्याच्या पगारातील व देण्यात येणा-या पगारातील फरक देऊ नये. असे मत आहे. |
| | | डॉ. सोनवेकर सुहासिनी आर | एमडी (ॲनेस्थेसिया)-१९९८ | | | | | | रू. ४०००० पगाराची अपेक्षा व्यक्त केली. तरी त्यांचे पगाराबाबत व कोणत्या रूग्णालयाबाबत काम द्यावे याबाबत निर्णय व्हावा. असे मत आहे. |
| | | डॉ. चोगले अपुर्वा देवेंद्र | एमबीबीएस-२००४ एमडी (ॲनेस्थेसिया)-२००९ | एम.डी./ डी.ए. रु.८,०००-२७५-१३,५०० | १२ | २ | ० | ० | काम करणेस इच्छुक आहे. रू. ४०००० पगाराची अपेक्षा व्यक्त केली. श्री साईनाथ रूग्णालयाकडे नेमणुक करणेबाबत व पगाराबाबत निर्णय व्हावा असे मत आहे. |
| | | डॉ. जोशी निहार भालचंद्र | एमबीबीएस-२००२ एमडी (ॲनेस्थेसिया)-२००९ | | | | | | रू. ३०००० पगारावर काम कणेस तयार आहे. श्री साईाथ रूग्णालयाकडे ॲनेस्थेसिऑलॉजिस्टचे पदावर नेमणुक देवुन फॅमिली कॉर्टर द्यावे असे मत आहे. |
| | | डॉ. खेमनर स्वाती दत्तात्रय | एमबीबीएस-२००३ डीए (ॲनेस्थेसिया)-२००७ | | | | | | काम करणेस इच्छुक आहे प्रतिक्षा यादीवर नं. १ वर ठेवावे असे मत आहे. |
| | | डॉ शिरसाठ मनिषा लक्ष्मण | एमबीबीएस-२००३ डीए (ॲनेस्थेसिया)-२००९ | | | | | | सध्या श्री साईनाथ रूग्णालयात आरएमओ (ॲनेस्थेसिआ) या पदावर कार्यरत आहेत त्यांना श्री साईनाथ रूग्णालयाकडे ॲनेस्थेसिआलॉजिस्टचे पद द्यावे किंवा कसे याबाबत निर्णय व्हावा असे मत आहे. |
| | | डॉ. संतोष सुरवसे बब्रुवान | एमबीबीएस-२००२ डीए (ॲनेस्थेसिया)-२००६ | | | | | | सध्या श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये क्लिनीकल असिस्टंट या पदावर कार्यरत आहेत. ज्यु. ॲनेस्थेसिओलॉजिस्ट या पदावर नेमणुक द्यावी असे मत आहे. |
| | | डॉ. सचिन दिलीप खोचिकर | एमबीबीएस-१९९९ डीए (ॲनेस्थेसिया)-२००५ | | | | | | सध्या श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये क्लिनीकल असिस्टंट या पदावर कार्यरत आहेत. ज्यु. ॲनेस्थेसिओलॉजिस्ट या पदावर नेमणुक द्यावी असे मत आहे. |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | ऑप्थलमॉलॉजिस्ट | डॉ. काळे सिमा भास्करराव | एमबीबीएस-२००१, डीएनबी(ऑप्थल)-२००९ | एम.एस./ डी.ए-न.बी. रु.१०,०००-३२५-१५२०० | ३ | २ | २ | २ | सदर पदाची जाहीरात देणेत आलेली नव्हती. सध्या श्री साईनाथ रूग्णालयात आरएमओ (ऑफ्थलमॉलॉजिस्ट) या पदावर कार्यरत आहेत. श्री साईनाथ रूग्णालयात नेत्ररोग तज्ञ या पदावर नेमणुक द्यावी. असे मत आहे |
| ११ | बीटीओ | डॉ. उमा राहुल मोदगी | एमबीबीएस-२००४ एमएस (स्त्री रोग)-२००८ | एमबीबीएस रु. ८,०००-२७५-१३,५०० | ४ | ३ | ४ | २ | श्री साईनाथ रूग्णालयाकडे बी.टी.ओ. या पदावर नेमणुक द्यावी. असे मत आहे. |
| | | डॉ. गाडेकर सचिन छग-नराव | एमबीबीएस-२००३ | | | | | | श्रीसाईबाबा रूग्णालयात आर.एम.ओ. या पदावर नेमणुक द्यावी. असे मत आहे. |
| | | डॉ. पोपटलाल रायचंद भंडारी | एमबीबीएस-१९७५ | | | | | | वय वर्ष ५९ असल्याने - नेमणुकीसाठी शिफारस करता येत नाही, ठेवावे असे मत आहे. |
| | | डॉ. तोडमल भाऊसाहेब संपत | एमबीबीएस-१९७८ डीव्हीडी-१९९९ | | | | | | श्री साईनाथ रूग्णालयामध्ये बीटीओ या पदासाठी प्रतिक्षा यादीवर ठेवावे असे मत आहे. |
| १२ | आरएमओ | डॉ. विखे गणेश व्ही | एमबीबीएस-२००४ | एमबीबीएस रु. ८,०००-२७५-१३,५०० | ४० | ७ | १३ | ० | श्री साईबाबा रूग्णालयात आर.एम.ओ. या पदावर -नेमणुक द्यावी. |
| | | डॉ. शर्मा आशिष कैलास | एमबीबीएस-२००१, एमएस (आर्थो)-२००६ | | | | | | श्री साईबाबा रूग्णालयात आर.एम.ओ. या पदावर नेमणुक द्यावी. असे मत आहे. |
| | | डॉ. दिव्यश्री डी अदालतवाले | एमबीबीएस-१९७३, डीजीओ-१९९१, | | | | | | वय वर्ष ६० असल्याने संस्थान नियमानुसार -नेमणुकीसाठी शिफारस करता येत नाही ठेवावे असे मत आहे. |

तरी उपरोक्तप्रमाणे शेरा कॉलममध्ये नमुद केलेल्या अभिप्रायानुसार वैद्यकिय अधिकारी भरती करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६३३ प्रस्तावित केलेप्रमाणे नियमानूसार नेमणूका करण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना/ वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ०४. पंचकर्म विभागातील दर निश्चित करणे बाबत.**

**प्रस्ताव-** दि.१८.०९.२००८ रोजी मा.उपाध्यक्ष, श्री.कोल्हे सो. यांनी रुग्णालयात राऊंड घेतला असता, त्यांनी श्री साईनाथ रुग्णालयात सर्व सोयींनी युक्त असा पंचकर्म विभाग सुरु करणेबाबत आदेश दिलेले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही सुरु असून सदर विभागात दिल्या जाणाऱ्या सेवांचा सेवाआकार निश्चित करणे आवश्यक आहे.

डॉ.रामदास आव्हाड यांनी त्यांचे खाजगी रुग्णालयात खालीलप्रमाणे दर आकारत असलेबाबत कळविले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| वमन | ९००/- | मात्रा बस्ती | १००/- |
| निरुह बस्ती | १२०/- | वैतरण बस्ती | १२०/- |
| लेखन बस्ती | १२०/- | जानु बस्ती | १००/- |
| उत्तर बस्ती | २००/- | मन्याबस्ती | १२०/- |
| कटी बस्ती | १२०/- | शिरोधारा | २००/- |
| हृदय बस्ती | १२०/- | स्वेदन | ५०/- |
| सर्वांग स्नेहन स्वेदन | २००/- | रक्त मोक्षण | ५०/- |
| नेत्र तर्पण | १००/- | जलौकावचारण | ३०/- |

परंतु उपरोक्त दर डॉ.रामदास आव्हाड हे त्यांचे खाजगी रुग्णालयात आकारत असून, श्री साईनाथ रुग्णालय हे धर्मादाय रुग्णालय असल्याने तसेच या रुग्णालयात उपचार घेणारे रुग्ण हे दारीद्रय रेषेखालील तसेच आर्थिक परिस्थीती गरीब असलेले आहेत. त्यामुळे उपरोक्त दर श्री साईनाथ रुग्णालयात आकारणे योग्य होणार नाही.

याबाबत श्री साईनाथ रुग्णालयाकडील दि.२७.०६.२००९ रोजीच्या पंचकर्म विभागातील सेवांचा दर निश्चितीबाबतच्या प्रस्तावावर मा.वैद्यकिय संचालक यांनी सुचविल्याप्रमाणे डॉ.एस.बी. गोंदकर, वरिष्ठ वैद्यकिय अधिकारी (आयुर्वेद विभाग) यांनी डॉ.रामदास आव्हाड, मानद आयुर्वेद तज्ञ, कोपरगाव यांच्याशी फोनवर चर्चा करुन खालीलप्रमाणे दर सुचित केलेले आहेत. सदर दर निश्चीत करताना त्यात रुग्णालय खर्च तसेच धर्मादाय रुग्णालय या गोष्टींचा विचार केलेला आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| | | | |
|---|---|---|---|
| वमन | २००/- | मात्रा बस्ती | ५०/- |
| निरुह बस्ती | ३०/- | वैतरण बस्ती | ६०/- |
| लेखन बस्ती | ३०/- | जानु बस्ती | ५०/- |
| उत्तर बस्ती | ५०/- | मन्याबस्ती | ५०/- |
| कटी बस्ती | ५०/- | शिरोधारा | १००/- |
| हृदय बस्ती | ५०/- | स्वेदन | १०/- |
| सर्वांग स्नेहन स्वेदन | ६०/- | रक्त मोक्षण | १०/- |
| नेत्र तर्पण | ५०/- | जलौकावचारण | २०/- |

श्री साईनाथ रुग्णालयात आयुर्वेद विभागाअंतर्गत पंचकर्म विभागात उपरोक्तप्रमाणे सेवा सुरु करावयाच्या असून, सदर सेवांचा सेवाआकार (दर) वर नमुद केल्याप्रमाणे आकारण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६३४ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०५. कार्डीयाक ऑपरेशन थिएटरमधील लाईट सोर्स दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागाकरीता मा. व्य. समितीच्या दि. ११/०२/२००६ चे सभेतील निर्णय क्र. २२ अन्वये मे. बी. एल. लाईफ सायन्सेस प्रा. ली. मुंबई यांचेकडुन एक झेनॉन लाईट सोर्स (Luxtec LX ३००) सर्व करांसहीत एकुण रु. २,८६,०००/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आला आहे. सदर लाईटसोर्स दि. २०/०४/२००६ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कार्यान्वीत करण्यात आला असुन कंपनीने सदर लाईटसोर्स करीता दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. १९/०४/२००७ रोजी संपला आहे. सदर लाईटसोर्सची दुरुस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जात आहे. परंतु दुरुस्ती करीता आवश्यक असणारे स्पेअर पार्ट पुरवठाधारक कंपनीकडुनच खरेदी करावे लागतात.

सध्या सदरचा लाईट सोर्स नादुरुस्त झाला असुन तो येथे दुरुस्त होउ शकत नसल्याने पुढील दुरुस्तीकरीता इकडील पत्र क्र. १३४ दि. २२/०६/२००९ अन्वये मे. बी. एल. लाईफ सायन्सेस प्रा. ली. मुंबई यांचेकडे पाठविणेत आला आहे. कंपनीने सदर लाईटसोर्सची तपासणी करुन मशीनचा पॉवर सप्लाय बोर्ड खराब झाला असुन बदलणेची आवश्यकता असल्याचे सांगीतले आहे. त्यासाठी कंपनीने त्यांचे पत्र क्र. BLL/MUM/०९५/०९-१० दि. ०७/०७/२००९ अन्वये सर्व करांसहीत एकुण रु. ७६,५००/- (अक्षरी रु. शहात्तर हजार पाचशे मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. सदर रकमेपैकी ५०% रक्कम म्हणजेच रु. ३८,२५०/- (अक्षरी रु. अडतीस हजार दोनशे पन्नास मात्र) ची कंपनीने आगाउ मागणी केली आहे. कंपनी सदर दुरुस्तीची सहा महीने वॉरंटी देत आहे. सदर लाईट सोर्स मे. बी. एल. लाईफ सायन्सेस प्रा. ली. मुंबई यांनी पुरवठा केला असुन त्याचे स्पेअर पार्ट फक्त त्यांचेकडेच मिळतात.

तरी कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागातील लाईट सोर्स मे. बी. एल. लाईफ सायन्सेस प्रा. ली. मुंबई यांचेकडुन दुरुस्त करुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. ७६,५००/- चे खर्चास आणि सदर रकमेपैकी ५०% रक्कम म्हणजेच रु. ३८,२५०/- कंपनीस आगाऊ अदा करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.६३५ यावर सविस्तर चर्चा होऊन, कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागातील लाईट सोर्स मे. बी. एल. लाईफ सायन्सेस प्रा. ली. मुंबई यांचेकडुन दुरुस्त करुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. ७६,५००/- चे खर्चास आणि सदर रकमेपैकी ५०% रक्कम म्हणजेच रु. ३८,२५०/- कंपनीस आगाऊ अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०६. जैव वैद्यकीय घनकचरा व्यवस्थापन व हाताळणीबाबत**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलला स्वतंत्रपणे दि.१/०४/२००८ ते दि.३१/०३/२००९ या एक वर्षांचे कालावधीकरिता जैव वैदयकीय घनकचरा व्यवस्थापन व हाताळणीकरिता ऑथरायझेशन दिलेले आहे. सदरच्या ऑथरायझेशन पत्रात दिलेल्या नियम व अटीतील अट क्र.०६ नुसार,

"दोन्ही हॉस्पिटलमध्ये निघणारा जैव वैदयकीय घनकचरा पुढील कार्यवाहीकरीता सार्वजनिकरीत्या जैव वैदयकीय घनकचरा विल्हेवाट लावणा-या व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने मान्यता दिलेल्या

संस्थेस म्हणजे मे.बायोक्लीन सिस्टीम्स,अहमदनगर यांना देणे व सदरची माहीती महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास देणे बंधनकारक आहे."

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे पुढील कालावधीत ऑथरायझेशन नुतनीकरण करणेकरीता दोन्ही हॉस्पिटलसाठी स्वतंत्रपणे अर्ज करण्यात आले आहेत. परंतु दोन्ही हॉस्पिटलकरीता स्वतंत्रपणे सांडपाणी प्रक्रीया संयंत्र अद्याप पावेतो उभारण्यात आले नसल्यामुळे महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाने ऑथोरायझेशन नुतनीकरण प्रमाणपत्र दिलेले नाही. रुग्णालय विभागाकडुन त्याबाबतीत पाठपुरावा सुरु आहे.

श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये निघणारा जैव वैदयकीय घनकचरा महाराष्ट्र प्रदुषण मंडळाचे आदेशानुसार पुढील विल्हेवाट लावणेकामी मे.बायोक्लीन सिस्टीम्स, अहमदनगर यांना दि. ०१/०९/२००८ ते दि. ३१/०८/२००९ या कालावधीकरीता देणेबाबत मा. व्य. समितीच्या दि. १८/१०/२००८ चे सभेतील निर्णय क्र. ७५९ (११) अन्वये कार्यादेश देण्यात आला होता. सदर कार्यादेशानुसार मे.बायोक्लीन सिस्टीम्स, अहमदनगर हे दोन्ही हॉस्पिटलमधील जैव वैद्यकिय घनकचरा पुढील विल्हेवाट लावणेकामी घेउन जात असुन त्याकरीता त्यांना प्रतीमाह रु. ३४,०००/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे.

वरील कार्यादेशाचा कालावधी दि. ३१/०८/२००९ रोजी संपत असल्यामुळे मे.बायोक्लीन सिस्टीम्स, अहमदनगर यांनी पुढील कालावधीत जैव वैद्यकिय घनकचरा पुढील कार्यवाहीकरीता घेउन जाणेकरीता त्यांचे पत्र क्र. AMD/८९ दि. ०१/०७/२००९ अन्वये मागील वर्षा प्रमाणेच प्रतिमहीना एकुण रु. ३४,०००/- (अक्षरी रु. चौतीस हजार मात्र) इतके रक्कमेचे कोटेशन पाठविले आहेत.

तरी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे नियमानुसार मे.बायोक्लीन सिस्टीम्स, अहमदनगर यांना पुढील एक वर्षाचे कालावधीकरीता श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये निघणारा जैव वैदयकीय घनकचरा पुढील कार्यवाहीकरीता घेउन जाणेसाठी कार्यादेश देणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६३६ यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे नियमानुसार मे.बायोक्लीन सिस्टीम्स, अहमदनगर यांना पुढील एक वर्षाचे कालावधीकरीता श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये निघणारा जैव वैदयकीय घनकचरा पुढील कार्यवाहीकरीता घेऊन जाणेसाठी कार्यादेश देणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०७. मौजे निमगाव कोऱ्हाळे येथील गट नं. १६९ मध्ये वर्ग- ०४ कर्मचारी निवासस्थान बांधकाम ठेकेदार मे.अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई यांचे दि.०१.०४.२००९ रोजीचे पत्राबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** संस्थानचे मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं. १६९ मधील जागेत संस्थानचे वर्ग ०४ कर्मचारी यांचे करीता निवासस्थान बांधकाम करणेचे काम ठेकेदार मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचे मार्फत पूर्ण करण्यात आले आहे. या प्रकल्पाची माहिती खालील प्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| ०१ | कामाचे नांव | निमगांव (को.) गट.नं.१६९ मध्ये वर्ग-४ कर्मचारी निवासस्थानांचे बांधकाम करणे. |
| ०२ | आर्किटेक्ट | मे.भालचंद्र चावरे, नाशिक. |
| ०३ | ठेकेदाराचे नांव | मे.अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा. लि. मुंबई |
| ०४ | अंदाजपत्रकीय रक्कम | रू. ३,७४,७६,२८६/- |
| ०५ | निविदा टक्केवारी | ५.०४% अधिक |
| ०६ | मंजूर निविदा रक्कम | रू. ३,९३,६५,०९१/- |
| ०७ | व्य.मं.निर्णय क्रमांक व दि. | नि.क्र. ६५६ दि. ०५/११/२००५ |
| ०८ | कार्यादेश क्रमांक | एसएसएस/ वशी- बांधकाम-१३४३१/०५ दि.२१/११/२००५ |
| ०९ | काम सुरु केल्याचा दिनांक | दि. ०३/१२/२००५ |
| १० | निविदेनुसार काम पूर्ण करण्याची मूदत | १२ महिने - दि.०२/१२/२००६अखेर |
| ११ | मंजूर मूदतवाढ | दि.३०/०४/२००७ , दि.१५/०८/२००७ |
| १२ | काम पुर्ण झाल्याची दिनांक | दि. १५/०८/२००७ |
| १२ | अंतिम बिलापर्यंत झालेल्या कामाची किमंत | रु. ३,५०,४३,७७७.०० |
| १३ | दोषदायित्व कालावधी (Defect liability period) | १२ महिने - दि.१४/०८/२००८अखेर |

ठेकेदार अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि.,मुंबई यांचे काम दि. १५/०८/२००७ रोजी पुर्ण झाल्यानंतर व ठेकेदार यांनी अंतिम बिलातील त्रुटींची पुर्तता केल्यानंतर मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. २१६/७ दि. १६.०३.२००८ अन्वये मंजूरी नंतर अंतिम बिल अदा करण्यात आले आहे.

त्यानंतर ठेकेदार यांनी दि. ०१.०४.२००९ चे पत्रान्वये अंतिम बिल व सुरक्षा ठेव स्वीकारलेनंतर रु.२,०७,५०,४४१.०० मात्र इतक्या अतिरीक्त रकमेची मागणी केली असून सदर रक्कम पंधरा दिवसाचे

आत न मिळाल्यास आर्बिट्रेशनमध्ये जाणेबाबत कळविले आहे. ठेकेदार यांचे पत्रातील मुद्दे व वस्तुस्थिती खालील प्रमाणे आहे.

ठेकेदार यांनी कळविले आहे की,

"संस्थान व आर्किटेक्ट यांचेकडून विविध बाबींसाठी उशीर तथा अडथळे निर्माण झाले, करार भंग झाला, त्यामुळे सदर काम विहीत मुदतीपेक्षा उशिराने दि.१५.०८.२००७ रोजी पूर्ण झाले. सदर काम दि. १५.०८.२००७ रोजी पूर्ण झाले असले तरी सदर कामाचा अंतिम हिशोब अद्यापही आपणांकडून पुर्ण झ ाालेला नाही. सादर केलेले कामाचे अंतिम बिल विवादात्मक रित्या रु.३,५०,४३,४७७.०० इतक्या कमी रकमेसाठी प्रमाणीत करण्यात आले, ॲबस्ट्रक्ट व बिलाची प्रत आम्हाला दि.३१.१२.२००८ रोजी मिळाली. दर व परिमाणामध्ये वजावटीबाबतचा तपशिल अद्यापही आम्हाला प्राप्त झालेला नाही. आम्ही संस्थानचे ३१.१२.२००८ रोजीचे पत्र व त्यासोबतचे पेमेंट रु.१६,८४,१५९.०० मात्र कायदेविषयक हक्क राखून प्राप्त केले. त्यानंतर आम्हाला रु. २०,००,०००.०० मात्र फुल ॲण्ड फायनल सेटलमेंट म्हणून देण्यात आले. परंतू ही रक्कम फुल ॲण्ड फायनल सेटलमेंट म्हणून आम्हाला मान्य नाही. आतापर्यंत दिलेली रक्कम देखील आर्किटेक्ट यांनी प्रमाणीत केलेल्या रकमेशी जुळत नाही. अद्याप सुरक्षा ठेव व इसारा रक्कम देखील मिळणे बाकी आहे. आम्ही सतत आर्थीक अडचणीत होतो, त्यामुळे सुरक्षा ठेव मिळणेबाकी असल्याने कोणतेही मुद्यावर मागणी करु शकत नव्हतो. शेवटी दि. ३०.०३.२००९ रोजी मोठ्या विलंबानंतर आम्हाला सुरक्षा ठेव परत करण्यात आली. आता पर्यंत मिळालेली रक्कम कामाचे परिमाण लक्षात घेता कुठल्याही प्रकारे प्रतिबींबीत होत नसल्याने आम्ही खालील यादी नूसार विवीध रकमाही निवीदेतील व कायदेशीर तरतूदीनूसार मागणी करीत आहोत. "

ब) ठेकेदाराच्या पत्रातील मुद्दयानुसार वस्तुस्थितीदर्शक स्पष्टीकरण :-

**मुद्दा क्र. ०१ :-** कामाची एकूण रक्कम रु. ४,१७,९९,२२८.०० अशी होते. तथापी आर्किटेक्ट यांनी प्रमाणीत केलेनुसार बिलाची रक्कम फक्त रु.३,५०,४३,४७७.०० आहे. अशाप्रकारे उर्वरीत रक्कम रु.६७,५५,७५१.०० मात्र करारनाम्यातील अटीनुसार देय असणाऱ्या अतिरिक्त बाबी व अतिरिक्त क्वाटींटीसाठी आहे. आर्किटेक्ट यांचेकडून दि. ३१/१२/२००८ रोजी मिळालेल्या सर्टीफिकेट मध्येही बिलाचा, वजावटीचा, दर कपातीबाबतचा असे तपशिल नमूद केलेले नसल्याने बिलाचे सर्टीफिकेट बरोबर आहे किंवा नाही. याविषयी वक्तव्य करता येत नाही. म्हणून आर्किटेक्ट यांनी रु.६७,५५,७५१.०० प्रमाणीत करुन संस्थानने अदा करावेत.

वस्तुस्थितीः-

i. ठेकेदार यांनी प्लिंथलेव्हल पर्यंत पूर्वीचे बिलात आर्कीटेक्ट यांनी अंतिम केलेल्या क्वांटीटी न घेता वाढीव मोजमापे नव्याने घेऊन क्वांटीटी व दर वाढविले व त्यानुसार वाढिव रकमेसह बिल सादर केले आहे

ii. निविदेमध्ये असलेल्या मोझॅक टाईल ऐवजी सिरॅमिक टाईल फ्लोरींगसाठी संडास बाथरुम क्वांटीटी व्यतिरिक्त इतर क्वांटीसाठी जादा दराची मागणी केली आहे.

iii. निविदेत दर असून ही आर सी सी पडदी दर जादा ॲटममध्ये दर मागीतला.

iv प्लिंथ मध्ये मुरमाव्यतीरीक्त मटेरीअल रॅबीट भरलेले असतांना मुरुम भराईचे दराची मागणी केली

वरील प्रमाणे जादा दर क्वांटीटीसाठी मागणी ची निविदा शर्तीनुसार अदा करण्यात आली व साईटवरील मोजमांपानंतर क्वांटीटी कमी झाल्याने बिल रक्कम कमी झाली. त्यामुळे त्यांना उपरोक्तप्रमाणे रु ६७,५५,७५१.०० मात्र देय होत नाहीत. तसेच संपूर्ण बिल, वजावटीचा तपशील इ. ठेकेदार यांना यापुर्वीच वेळोवेळी दाखविण्यात आले आहे.

तसेच उपरोक्त वाढीव दरांबाबत यापुर्वी देखील मा. व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होऊन निविदा शर्तीनुसार बिल अंतिम करण्याबाबत ठरले आहे. त्यानुसार ठेकेदार यांना अंतिम बिल व भावफरक बिल अदा करणेत आले आहे.

**मुद्दा क्र. २ :-** अंतिम बिल प्रमाणपत्रानुसार आम्हाला रू.४०,२७,१७१.४५ मात्र देय होतात. तथापी या देय रकमेतून आम्हाला पार्ट पेंमेंट मिळाले. उर्वरीत रु.३,४३,०१२.०० आर्किटेक्ट यांचे चुकीचे सर्टीफिकेटनुसारही देय आहे. त्यामुळे वरीलप्रमाणे रु.३,४३,०१२.०० मात्र प्रमाणीत होऊन आम्हाला मिळावेत.

वस्तुस्थिती :- ठेकेदार यांना आर्किटेक्ट यांचे प्रमाणपत्रानुसार रु.४०,२७,१७१.०० मात्र दि. ०७.०४.२००८ चे पेमेंट सर्टीफिकेटनुसार अदा करण्यात आली आहे.याबाबत आर्किटेक्ट यांचा अभिप्राय मागविता येईल.

**मुद्दा क्र. ३:-** निविदा शर्तीनुसार ५०% सुरक्षा ठेव काम पूर्ण झाल्यावर म्हणजे दि.१५.०८.२००७ रोजी मिळायला हवी होती. तसेच उर्वरीत ५०% सुरक्षा ठेव दोषदायीत्व (Defects liability period) पूर्ण झ ाल्यानंतर दि.१५.०८.२००८ रोजी मिळायला हवी होती. तथापी सदर सुरक्षा ठेव मोठ्या विलंबानंतर दि.

३०.०३.२००९ रोजी मिळाली. त्यामुळे विलंबाने मिळालेल्या सुरक्षा ठेवीवर १८% दराने रु.४,३५,१८२.०० मात्र व्याज मिळण्यास पात्र ठरतो. तरी रु. ४,३५,१८२.०० मात्र व्याज प्रमाणीत होऊन आम्हाला मिळावे.

वस्तुस्थिती :-निविदाशर्तीनुसार ५०%सुरक्षा ठेव आर्किटेक्ट यांचेकडील व्हर्च्युयल कम्प्लीशन सर्टीफिकेट (virtual complition certificate)प्राप्त झाल्यावर ठेकेदार यांना परत करता येते उर्वरीत ५०% सुरक्षा ठेव स्पेशलाईज्ड बाबीवरील सुरक्षा ठेव वगळता दोषदायीत्व कालावधी पूर्ण झाल्यानंतर परत करता येते.

ठेकेदार यांनी दि.१५/०८/२००७ ला काम पूर्ण केल्याने म्हटले असले तरी ठेकेदार यांनी त्यांचे निवीदेनूसार सर्व कामे पुर्ण केलेली नाहीत. सदरची कामे ठेकेदार यांनी निवीदेमधील स्पेशल कन्डीशन पान नं. २९ क्लॉज नं. १३ नूसार निवीदेमध्ये समाविष्ट नसलेली कामे परंतू सदर प्रकल्प पुर्ण करावयासाठी लागणारी कामे ठेकेदार यांनी आर्किटेक्ट यांनी प्रमाणीत केलेले दरानूसार ठेकेदार यांनी पूर्ण करावयाची होती मात्र ठेकेदार यांनी कंपाउंड वॉल,पॅनेल रुम, रोडचे काम, ड्रेनेज लाईन इ. कामे न केल्याने ती संस्थानला विभागामार्फत पूर्ण करावी लागली. त्यामुळे ठेकेदार यांचे काम व्हर्च्युअल कम्पलीशन झालेले नसल्याने त्यांना ५०% डीपॉझीट रक्कम परत करणेत आलेले नाहीत. अंतिम बिलाचे प्रमाणपत्रानुसार सुरक्षाठेव रक्कम अंतिम झाल्यावर ठेकेदार यांना सुरक्षा ठेव रक्कम अदा करण्यात आली. त्यामुळे ठेकेदार यांना सदर रकमेवरील व्याज देय होत नाही.

**मुद्दा क्र. ०४ :-** काम पूर्ण करण्यास दि. ३०.११.२००६ ते दि. १५.०८.२००७ इतका विलंब झाल्याने या काळात ओव्हरहेड, आस्थापना पर्यवेक्षकीय स्टाफ, मशिनरी साधनसामुग्री, सेट्रींग, शटरींग व स्कॅफोल्डींग इ.बाबींवर सुमारे रु.६,००,०००.००प्रतीमाह दराने साडेआठ महिन्यांसाठी एकूण रु. ५१,००,०००.०० मात्र नुकसान झाले आहे. हे नुकसान केवळ आर्किटेक्ट/ संस्थानकडून विलंब झाल्याने झालेले आहे. सबब ते आम्हाला मिळावे.

वस्तुस्थिती :- सदरचा विलंब हा ठेकेदार यांचे प्रकल्प नियोजनातील त्रुटींमुळे झालेला आहे. त्यांनी मटेरीअल खरेदी, मजूर / कुशल कारागीर नियोजन इ. बाबत वेळीच व्यवस्थित नियोजन करून पाठपुरावा करुन कामाचे नियोजन केले असते तर त्यावर योग्य ते मॉनिटरींग होऊन कामासाठी मटेरीअल लेबर, इ. बाबी वेळेवर उपलब्ध होऊन कामाची गती राखून वेळेत काम पूर्ण करता आले असते. पंरतू तसे झाले नाही. वेळोवेळी त्यांचेकडे मजूर/ कुशल कारागीर, मटेरीअल इ. बाबींची कमतरता भासल्याने काम वेळेत पूर्ण झाले नाही. ठेकेदार यांनी त्यांचे स्वत:चे अडचणीमुळे कामास विलंब होत असल्याचे मान्य करीत मुदतवाढीबाबत दि. ३१.१०.०६ व २६.०६.०७ चे पत्रान्वये कळविलेल्या होत्या. त्या खालीलप्रमाणे होत्या.

**अ)**

१. वाळु उपलब्ध न झाल्यामुळे बाहेरुन वाळु आणावी लागली
२. माल वाहतुकीच्या नियामात बदल झाल्याने अडचणी आल्या.
३. बांधकाम साहित्यात वाजवीपेक्षा दरवाढ झाली.

**ब)**

१. बांधकाम साहित्याच्या दरात मोठया प्रमाणात झालेली वाढ.त्यांचे भांडवलातील बराचशा भाग बांधकाम साहित्याच्या खरेदीत अडकला बांधकाम साहित्याच्या खरेदीसाठी रोख बिल अदा करावे लागले.
२. रंगकाम २५/०४/२००८ पर्यंत पुर्ण करता आले नाही.
३. उपठेकेदार उपलब्ध झाले नाही.

उपरोक्त बाबींमुळे ठेकेदार यांनी काम उशीराने पुर्ण केल्यामुळे संस्थानचे एकुण ९९ फ्लॅट धारकांना जादा दराने खाजगी रुम भाडोत्री घेऊन राहावे लागले. त्यामुळे संस्थानचेच नूकसान झालेले असल्यामुळे ठेकेदार यांनाच दंड आकारणी करुन नूकसान भरपाई आकारणे आवश्यक होते. परंतू संस्थानने सकारात्मक दृष्टीकोण ठेऊन दंड आकारणी न करता मुदतवाढ दिलेली आहे. त्यामुळे त्यांना रु. ५१,००,०००/- मात्र रक्कम अदा करण्याचा प्रश्नच येत नाही.

**मुद्दा क्र. ०५ :-** निविदेतील त्रुटींबाबत/ आयटेमचे परिमाणाबाबत - ठेकेदार यांनी सदरची निविदा टक्केवारी दराने असल्याने निविदेत असलेले परिमाण हे बरोबर असल्याचे गृहीत धरुन निविदा दर भरलेले होते. पंरतू निविदेतील काही बाबींचे परिमाण कमी जास्त झाल्याने रु.१८,९९,३६०.०० इतकी नुकसान भरपाई मिळावी.

वस्तुस्थिती : - ठेकेदार यांना निविदेसोबत आर.सी.सी व वर्किंग ड्रॉईंग देण्यात आलेले होते. ठेकेदार यांनी प्रत्यक्ष साईटची पहाणी करुन व कामाच्या परिमाणाची स्वत: तपासणी करुन तसेच बाजारातील मटेरीअलची उपलब्धता दर हया सर्व बाबींची खातरजमा करुनच दर भरणे अपेक्षीत होते. तसेच निवीदेमधील पान नं. ३७ क्लॉज नं. ४० नूसार निवीदेतील परिमाणपेक्षा २५% परिमाण जादा झाल्यास सदर ॲटम आर्थीक वर्षाचे दरसूची नूसार देण्याची तरतूद होती. तसेच नॉन डी. एस. आर. ॲटमसाठी बाजारातील मटेरियल व मजूरीदर व त्यावर १०% प्रॉफीटसह दर देण्याची तरतूद होती. व त्यानूसार आर्किटेक्ट यांनी ठेकेदार यांना दर तपासणी करुन देण्यात आलेली आहे. त्यामुळे आता काम पूर्ण झाल्यावर

याबाबत वेगळी नुकसान भरपाई मागणे योग्य नाही. निविदेतही अशाप्रकारची तरतूद नाही. निविदेनुसार Price Variation & quantity varriation clause नुसार ठेकेदार यांना बिल अदा करण्यात आलेले आहे. ठेकेदार यांनी बिलात बऱ्याचशा बाबींचे परिमाण झालेल्या कामापेक्षा जादा मागणी केलेली आहे. सदर मोजमापे तपासणी अंती कमी झालेली आहे. त्यामुळे त्यांना रुपये १८,९९,३६०.०० मात्र रक्कम देय होत नाही.

साईटवरील आवश्यकतेनुसार ठेकेदार यांचेकडून काम करुन घेण्यात आले आहे. याबाबत वेळोवेळी झालेल्या कामाचे आढावा मिटींगमध्ये ठेकेदार यांचे प्रतीनिधी यांनी निविदा दरामध्ये काम करणेचे मान्य केले.

**मुद्दा क्र. ६ :-** मटेरीअलचे लिड चार्जेस बाबत -ठेकेदार यांचे म्हणणेनुसार जिल्हा दरसूची मधील चार्जेसप्रमाणे सदर कामाकरीता आवश्यक मटेरीअल उदा. विट, वाळू, खडी, मुरुम उपलब्ध झाले नाही. त्यामुळे जादा अंतरावरुन मटेरीअल आणणेकामी रु २४,९९,५४४.०० अतिरिक्त खर्च करावा लागला तो मिळावा.

वस्तुस्थिती :- ठेकेदार यांनी निवीदेतील अटी व शर्तीचा अभ्यास करुन तसेच परिसरातील मटेरियलची उपलब्धतता व दर यांचा अभ्यास करुन निवीदा भरणे आवश्यक होते. ठेकेदार यांनी वेळीच मटेरियलचा स्टॉक केला असता तर त्यांना योग्य भावात व पुरेशे मटेरियल उपलब्ध झाले असते. व जे मटेरियल परिसरात उपलब्ध नव्हते त्या मटेरियलची उपलब्धता व दर यांचा विचार करुन दर भरणे आवश्यक होते. तसेच ठेकेदार यांनी जादा वहातूकीचे दराबाबत केलेली मागणी अवास्त व अयोग्य असल्याने मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०६.०१.२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८७ अन्वये ठेकेदार यांची मागणी अमान्य करणेत आलेली आहे. ठेकेदार यांनी योग्य ते नियोजन करुन मटेरीअल खरेदी केले असते तर त्यांना स्थानिक बाजारातच मटेरीअल उपलब्ध झाले असते, परंतू योग्य नियोजनाअभावी त्यांना अधिक अंतरावरुन मटेरीअल आणावे लागले असल्यास त्यास संस्थान जबाबदार नाही. त्यामुळे सदर रक्कम त्यांना देय होत नाही.

**मुद्दा क्र. ७ :-** फ्लोअर पी.सी.सी. चे बाबीबाबत - काम सुरु करतेवेळी प्लींथ लेव्हलला फ्लोअर बेड करीता पी.सी.सी. चा आयटेम होता. परंतू मुरुम फिलींग उंची जास्त असल्याने फ्लोअर बेडचे पी.सी.सी. करीता स्टील वापरणेबाबत संस्थानने सांगितले. तरी सदरचा आयटेम पी.सी.सी. ऐवजी आर.सी.सी. धरण्यात यावा व ॲटम मधील दराचे फरकानुसार रु.४,५०,१२२.१६ मात्रचा खर्च मिळावा.

वस्तुस्थिती :- ठेकेदार यांना सदर बाबींबाबत फ्लोअर पी.सी.सी. १:३:६ बाबीनुसार निविदा दराप्रमाणे रक्कम अदा केलेली असून फ्लोअर पी.सी.सी. मध्ये वापरण्यात आलेले स्टील वेगळे अदा केलेले आहे. याबाबींकरीता ठेकेदार यांनी कोणतेही प्रकारचे शटरींग व सेट्रींग मटेरीअल वापरलेले नाही. करीता ठेकेदार यांना सदरचा आयटेम हा आर.सी.सी. आयटेम म्हणून देय होत नाही. याकरीता कोणताही अतिरिक्त खर्च देय होत नाही. याबाबत आर्किटेक्ट यांचेकडून माहिती घेता येईल.

**मुद्दा क्र. ८ :-** अंतिम बिलाचे तपासणीकरीता झालेल्या विलंबाबत -दि. १४.०८.२००७ पुर्वीकाम पूर्ण केले असल्याचे व अंतिम बिल तपासणी कामी संस्थानने विलंब केल्याने दि. १४.०८.२००७ ते दि. ३१.०३.२००८ (अंदाजे ७.५ महिने कालावधीत) हयाकामी त्यांना त्यांचा स्टाफ ठेवावा लागला. सदर स्टाफकरीता त्यांना रु. ३,६९,०००.०० प्रतीमाह याप्रमाणे पगार द्यावा लागला. त्यानुसार एकूण रु. २७,६७,५००.०० अतिरिक्त खर्चापोटी नुकसान भरपाई मिळावी.

वस्तुस्थिती :- ठेकेदार यांनी दि.०८.०९.२००७ रोजीचे पत्रान्वये सदर कामाचे आठवे रनिंग बिल सादर केले होते. त्यानंतर दि. ०८/१२/२००७ चे पत्रान्वये ठेकेदार यांनी अंतिम बिलाचे ॲब्स्ट्रॅक्ट सादर केले होते. त्यानंतर दोनच दिवसांनी दि. १०.१२.२००७ चे पत्रान्वये आठवे रनिंग बिलातील मोजमापे अंतिम बिलाकरीता धरण्यात यावी असे कळविले तसेच दि.२३.०१.२००८ रोजीचे पत्रान्वये अंतीम बिलातील उर्वरीत मोजमापे सादर केली. यावरुन ठेकेदार यांनी अंतीम बिलाची पुर्तता दि. २३.०१.२००८ रोजी पुर्तता केली. यावरुन ठेकेदार यांचे कामातच अपूर्तता असल्याने ठेकेदार हे २३.०१.२००८ पर्यंत अंतिम सादर करु शकले नाहीत. ठेकेदार यांनी बिलही योग्य पद्धतीने सादर केलेले नव्हते व साईटवर स्टाफही ठेवलेला नव्हता. व त्यानंतर निवीदेनूसार ०२ महिन्यात त्यानुसार इकडील दि. २२.१२.२००७ रोजीचे पत्रान्वये आर्किटेक्ट यांना अंतिम बिल तपासणीकरीता कळविण्यात येऊन आर्किटेक्ट यांनी अंतीम बिलाची संयुक्त तपासणी केली. दि. २०.०१.२००८ चे पत्रान्वये आर्किटेक्ट यांनी प्राथमिक ॲब्स्ट्रॅक्ट शिट सादर केले होते. यामध्ये इलेक्ट्रीकल आयटेममध्ये बऱ्याशा त्रुटी असल्याने संस्थानचे इलेक्ट्रीकल विभागाचे अभिप्रायानंतर अंतिम बिलाची रक्कम ठरविता येईल असे कळविले . संस्थानचे विद्युत विभाग व आर्किटेक्ट यांनी दि. ०२.०२.२००७ पर्यंत विद्युतविषयक बाबी तपासून दि. ०७.०२.२००८ पत्रान्वये अंतिम बिलाबाबत प्रमाणपत्र तयार करुन पाठविले. निविदा शर्तीनुसार अंतिम बिल दोन महिनेत अदा करणेबाबत तरतूद आहे. ठेकेदार यांनी आर्किटेक्ट यांचे अंतिम बिलाची एक प्रत तपासणी करणेकामी सादर करणे आवश्यक होते.

ठेकेदार यांनी दि. ०७.०२.२००८ चे प्रमाणपत्रान्वये प्रमाणीत केलेले अंतिम बिल मा. व्यवस्थापन समितीचे दि. १६.०३.२००८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते. दि. ०७.०४.२००८ रोजीचे अहवालानुसार बिल ठेकेदार यांना अदा करणेबाबत मंजुरी देण्यात आली. त्यामुळे ठेकेदार यांनी अंतिम बिलाचे तपासणी विलंबाबत मागणी केलेली रक्कम रु. २७,६७,५००.०० मात्र देय होत नाही.

मुद्दा क्र. ०९ :- अंतिम बिल भावफरकाचे बिलाबाबत - अंतिम बिलाचे भावफरकाची रु.५,००,०००.०० रक्कम याबाबत आर्किटेक्ट यांचेकडून प्रमाणपत्रानंतर अदा करण्यात यावी .

वस्तुस्थिती :- ठेकेदार यांनी अंतिम बिलासोबत भावफरक (Escalation) मिळणेबाबतचे बिल सादर केलेले नसल्याने आर्किटेक्ट यांचेकडून भावफरकाबाबत प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही. त्यामुळे सदर रक्कम अदा करता येणार नाही.

मुद्दा क्र. १० :- उपरोक्तप्रमाणे मागणी केलेल्या रकमेवर विलंबाचे कालावधीत सदर रकमेवर १५.०२.२००८ पासून सदरची रक्कम मिळेपर्यंत १८ टक्केप्रमाणे व्याजसह भरपाई मिळावी.

वस्तुस्थिती :- ठेकेदार यांनी नुकसान भरपाईपोटी केलेली मागणी हि निविदाशर्ती व करारनाम्यास धरुन नसल्याने व्याज देय होत नाही.

उपरोक्त प्रमाणे रक्कम पंधरा दिवसात न मिळाल्यास त्यानंतर Arbitration मध्ये जाण्याबाबतही त्यांनी कळविले आहे. ठेकेदार यांचे दि.१/४/२००९ चे पत्र सोबत अवलोकनार्थ जोडले आहे.

**क)** सर्वसाधारण टिपणी :

सदरचे काम पुर्ण करण्यासाठी संस्थान अथवा आर्किटेक्ट यांचेकडून कुठल्याही प्रकारे करार भंग, उशीर अथवा अडथळा निर्माण करण्यात आलेला नव्हता. कामाचे विलंबास ठेकेदार यांचे व्यक्तीगत अडचणी, साईटवरील व्यवस्थापन व तदनुषंगीक बाबींच जबाबदार आहेत. उलट काम लवकरात लवकर व दिलेल्या वेळेत कसे पुर्ण करुन घेता येईल याबाबत ठेकेदार यांना आवश्यक ती सर्व मदत करण्यात आली. प्रकल्पातील अडचणींचे वेळेवर निराकरण होउन कामाची गती राखता यावी यासाठी वेळोवेळी आर्कीटेक्ट, संस्थान व ठेकेदार प्रतिनिधींची प्रकल्प आढावा बैठका घेउन ठेकेदार यांचे अडचणी दूर करण्यात आल्या. तसेच निविदेतील Price variation क्लॉजनुसार ठेकेदार यांना भाववाढ देण्यात आली. निविदेत व करारात तरतुद नसतांनाही विशेष बाब म्हणून ठेकेदार यांना सिमेंटचे प्रत्यक्ष बाजारातील दर व बेसिक दर यातील फरक अदा करण्यात आला. तसेच वेळोवेळी मटेरियल ॲडव्हान्सही दिला गेला. तरीही ठेकेदार यांचे काम त्यांनी सादर केलेल्या बारचार्टप्रमाणे होत नसल्यामुळे त्यांना वेळेत काम पुर्ण करणेबाबत इकडील जा. नं. ३७६२/२००७ दि. ०९.०३.२००७, जा. नं. ८२०१/२००७ दि.२८.०५.२००७ चे पत्रान्वये कळविण्यात आले होते. तसेच आर्किटेक्ट यांनी २३.०८.२००७ रोजी कामाची गती वाढवून काम वेळेत पूर्ण करणेबाबत पत्र दिले. तसेच ठेकेदार यांनी खाली नमूद केलेल्या अडचणीमुळे कामास विलंब होत असल्याचे मान्य करीत मुदतवाढीबाबतचे दि. ३१/१०/०६ व २६/०६/०७ रोजी पत्र देऊन मुदतवाढ मागितलेली आहे.

मुदतवाढी बाबत कळविलेल्या अडी-अडचणी खालील प्रमाणे: -

**अ)**

१. वाळु उपलब्ध न झाल्यामुळे बाहेरुन वाळु आणावी लागली

२. माल वाहतुकीच्या नियमात बदल झाल्याने अडचणी आल्या.

३. बांधकाम साहित्यात वाजवीपेक्षा जास्त दरवाढ झाली.

**ब)**

१. बांधकाम साहित्याच्या दरात मोठया प्रमाणात झालेली वाढ.त्यांचे भांडवलातील बराचशा भाग बांधकाम साहित्याच्या खरेदीत अडकला बांधकाम साहित्याच्या खरेदीसाठी रोख बिले अदा करावी लागली.

२. रंगकाम २५/०४/२००८ पर्यंत पुर्ण करता आले नाही.

३. उपठेकेदार उपलब्ध झाले नाही.

वास्तविक पहातां, सदरहू इमारतीचे बांधकाम ठेकेदारांने मुदत पूर्ण केल्याने, तसेच इमारतीचा ताबा उशीरा दिल्याने सदर इमारत कर्मचाऱ्यांचे निवासासाठी देता न आल्याने संस्थानचे पूर्वीचे वर्ग ४ कर्मचारी रहात असलेल्या मध्यवर्ती जागेतील सेवाधाम इमारत नूतनिकरणाचे काम प्रलंबीत ठेवावे लागले त्यामुळे संस्थानची पर्यायाने साईभक्तांचीच गैरसोय झालेली आहे. या बद्दल ठेकेदार करारातील अटी शर्तीनूसार दंड आकारणीस पात्र होतात. परंतू संस्थानने सकारात्मक व मानवतावादी दृष्टीकोण स्वीकारुन ठेकेदार यांना दोन वेळेस एकुण ०९ महिने कालावधीसाठी दंड आकारणी न करता मुदतवाढ दिलेली आहे.

ठेकेदार यांनी दि. ०८.१२.२००७ रोजी अंतिम बिल सादर केले व सदरचे बिल सादर करतांना पुर्वी आर्कीटेक्ट यांनी तपासलेल्या क्वॉटीटी न घेता नव्याने वाढीव मोजमापे व वाढीव दर लावून बिलाची रक्कम काढली तसेच त्यात बरीचशी मोजमापे व्यवस्थीत लिहीलेली नसल्याने व काही बाबींची मोजमापे नव्याने घेऊन दि. २४.०१.२००८ रोजी पुरवणी बिल सादर केले. सदर बिलातील त्रुटी / अपुर्तता व कामातील त्रुटी

निवारण करून देणेबाबत त्यांना जा.नं २०१४० दि.२२/१२/२००७ चें पत्रान्वये कळविण्यात आले आहे.त्यातील त्रुटी खालीलप्रमाणे कळविण्यात आल्या होत्या.

१. अंतिम बिलासोबत सविस्तर मोजमापे सादर करणे

२. ठेकेदार यांनी दि. १०/१२/०७ चे पत्रान्वये आठवे रनिंग बिलासोबत जोडलेले माजमापे अंतिम बिलासाठी धरण्यात यावे असे कळविले मात्र त्यामध्येही रोडचे काम,ओ.एच.टँक,प्लींथ लेव्हलपर्यंतचे स्टील मेजरमेंट सादर केलेले नव्हते.

३. त्याचप्रमाणे प्रा.फंडाचे पुर्ततेबाबत जानं /वशी १० अ/१३६१दि.२४/११/०५,१३६०४ दि.०३/१०/०४, १३०६९दि.२१/०८/०७,५८१३ दि.१७/०४/०८,९२०३ दि.२४/०६/२००८, २६०दि.१५/०७/२००८, ५७९८दि.२४/१०/०८ व१२८५२दि.३०/०८/२००८ चे पत्रान्वये ठेकेदार यांना कळविण्यात आले आहे.

तसेच ठेकेदार यांना दि.२९/०१/०८जा.नं.१८३९ चे पत्रान्वये अंतिम बिलातील त्रुटीसह अंतिम बिलाची तारीख १०/१२/०७ अशी धरण्यात येत असल्याचे कळविण्यात आले होते.त्याचप्रमाणे कामातील अपुर्णतेबाबत दि.०६/०३/२००८ चे पत्रान्वये पुर्तता करणेबाबत कळविण्यात आले होते.

सदर पुर्तता ठेकेदार यांनी केल्यानंतर आर्किटेक्ट यांनी दि. ०७.०२.२००८ रोजी पेमेंट सर्टीफीकेट दिले व मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. २१६/७ दि. १६.०३.२००८ अन्वये मंजूरी नंतर बिल अदा करणेबाबत कार्यवाही करण्यात आली. ठेकेदार यांना वारंवार कळवूनही त्यांचे कडून कर्मचारी भविष्य निर्वाह निधी बाबतचे रेकॉर्ड उपलब्ध झाले नाही. त्यांनी योग्य ती पुर्तता केल्यानंतर दि. ३१.१२.२००८ अखेर बिल अदा करण्यात आले आहे. उपरोक्त बिलातील सर्व मोजमापे ठेकेदार आर्किटेक्ट यांचे प्रतिनीधी समवेत सयुक्त रित्या घेण्यात आलेली आहेत. तसेच बिलाबाबतचे सर्व तपशिल ठेकेदार यांना उपलब्ध करुन देण्यात आले होते. आर्किटेक्ट यांचे पेमेंट सर्टीफीकेट नूसार ठेकेदार यांना सर्व पेमेंट व सुरक्षा ठेव / इ.एम. डी. देण्यात आलेली आहे.

**ड)** ठेकेदार यांचे पत्राबाबत इकडील जा. नं. ४४८३/२००९ दि. २१.०४.२००९ अन्वये संस्थानचे कायदेविषयक सल्लागार एस. डी. कुलकर्णी, कोपरगांव यांचा अभिप्राय मागविण्यात आला असता त्यांनी दि. २१.०४.२००९ अन्वये ठेकेदार मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांना संस्थानतर्फे मार्फत नोटीस देउन ठेकेदार यांनी केलेली जादा रकमेची मागणी करारानूसार योग्य नसल्यामुळे त्यांची मागणी अमान्य असल्याचे नोटीसी अन्वये कळविले.

त्यानंतर ठेकेदार यांनी दि. २६.०४.२००९ रोजीचे पत्रान्वये सदरहू प्रकल्पाचे आर्किटेक्ट भालचंद्र चावरे, नाशिक यांनी, आम्ही केलेली अतिरीक्त मागणी केलेली रक्कम प्रमाणीत करुन द्यावी अन्यथा निवीदेतील क्लॉज नं. ५६ नूसार ते वादातील मुद्याबाबत Arbitration मध्ये जाऊ असे कळविले आहे. तसेच त्यांनी दि. ०६.०६.२००९ अन्वये आर्किटेक्ट यांनी उत्तर न दिल्याने निवीदेतील क्लॉज नं. ५६ नूसार त्यांनी Arbitrator म्हणून श्री. एन. ए. बढेका यांचे नांव सुचवून त्यास संस्थानची सहमती कळवावी अन्यथा अन्य नांव सुचवावे असे कळविले आहे.

इकडील जा. नं. ७६७२/२००९ दि. २०.०६.२००९ रोजीचे पत्रान्वये आर्किटेक्ट श्री. भालचंद्र चावरे, नाशिक यांनी निवीदेतील क्लॉज नं. ५६ चा ठेकेदार हे फायदा घेत असल्यामुळे आपंण क्लॉज नं. ५६ नूसार ठेकेदार यांचे पत्राबाबत कार्यवाही करावी असे कळविण्यात आले, तसेच इकडील जा. नं. ७६७१/२००९ दि. २०.०६.२००९ अन्वये ठेकेदार यांना Arbitrator म्हणून श्री. एन. ए. बढेका यांचे सुचविलेले नांव संस्थानला मान्य नसून करारानूसार वादग्रस्त मुद्दे हे प्रथम आर्किटेक्ट यांचे मार्फत सोडविणे बाबत क्लॉज नं. ५६ मध्ये तरतूद असल्यामुळे त्यांनी प्रथम आर्किटेक्ट यांचेकडे मुद्दे ठेवावे, आर्किटेक्ट याबाबत प्रथम निर्णय घेतील.

यानंतर ठेकेदार यांनी पुन्हा दि. २५.०६.२००९ अन्वये आर्किटेक्ट हे त्यांनी सादर केलेल्या मुद्याबाबत प्रतिसाद देत नसल्यामुळे आर्किटेक्ट यांचेकडे जाण्याचा प्रश्नच येत नाही. असे कळवून व Arbitrator म्हणून श्री. एन. ए. बढेका यांची नेमणूक Arbitrator म्हणून कोर्टामार्फत करुन घेऊ असे कळविले आहे.

त्यानंतर ठेकेदार यांना जा. नं. ८२०८/२००९ दि. ०४.०७.२००९ चे पत्रान्वये (संस्थानमार्फत दि. ०४.०७.२००९ चे पत्रान्वये) कळविण्यात आले की, त्यांनी केलेली मागणी संस्थानला मान्य नसून त्यांनी सुचविलेला Arbitrator ही संस्थानला मान्य नाही. तसेच आर्किटेक्ट चावरे हे क्लॉज नं. ५६ नूसार ते जबाबदारी स्विकारण्यास तयार असल्यामुळे Arbitrator म्हणून श्री. चावरे यांचे नियुक्तीस दोघांकडूनही मान्यता असावी असे कळविले आहे.

तरी ठेकेदार मे. अस्मिता कंन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांनी दि. ०१.०४.२००९ चे पत्रान्वये आर्किटेक्ट यांनी प्रमाणीत केलेल्या अंतिम बिला व्यतिरीक्त अतिरीक्त रक्कम रु. २,०७,५०,४४१.०० मात्र रकमेबाबत निवीदेतील अटी नूसार सदरहू प्रकल्पाचे आर्किटेक्ट भालचंद्र चावरे, नाशिक यांची

Arbitrator म्हणून नेमणूक करणेस व संस्थानचे कायदेविषयक सल्लागार एस. डी. कुलकर्णी, कोपरगांव यांचा सल्ला घेऊन पुढील कार्यवाही करणेस मंजूरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६३७ सदरहू बाबतीत कायदेशीर सल्ला घेऊन त्यानुसार उचित कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०८. गुंतवणूकीविषयी निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** माहे ऑगस्ट,२००९ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | बँक ऑफ बरोडा, नासिक | ०२/०८/२००९ | ३,३१,६२,८१३.०० |
| ०२ | स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी | ०४/०८/२००९ | ८,३२,९५,९७२.०० |
| ०३ | GOI ८ % Saving ( Taxable ) Bonds | ०६/०८/२००९ | १,११,२१,०००.०० |
| ०४ | GOI ८ % Saving ( Taxable ) Bonds | ०६/०८/२००९ | ४१,४०,०००.०० |
| ०५ | स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी | २२/०८/२००९ | ३,३४,३८,६३८.०० |
| ०६ | स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी | २३/०८/२००९ | १,११,४६,२१३.०० |
| ०७ | GOI ८ % Saving ( Taxable ) Bonds | २६/०८/२००९ | १,८५,४७,०००.०० |
| ०८ | GOI ८ % Saving ( Taxable ) Bonds | २६/०८/२००९ | १,३९,६४,०००.०० |
| ०९ | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | २७/०८/२००९ | ३,३३,५७,३५३.०० |
| १० | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | २७/०८/२००९ | १,११,१९,११८.०० |
| ११ | दैनंदिन खर्च वजा जाता माहे ऑगस्ट २००९ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | ७,००,००,०००.०० |
| १२ | माहे ऑगस्ट -०९ मध्ये आर.बी.आय.बॉण्डवर मिळणारी व्याजाची अंदाजे रक्कम - | | ४,००,००,०००.०० |
| | एकूण | | **३६,३२,९२,१०७.००** |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम **रु. ३६.३२ कोटी** गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

वरीलप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

०१. युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी　　०२. सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
०३. आंध्र बँक, शिर्डी　　०४ स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
०५. बँक ऑफ बरोडा, कोपरगांव　　०६. बँक ऑफ बरोडा, नासिक
०७. बॅंक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी　　०८. विजया बँक, शिर्डी

तरी वरील अ.नं. १ ते ८ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम **रु.३६.३२** कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर ठेवण्यासाठी मंजुरी मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.६३८ गुंतणूकीसाठी उपलब्ध होणारी रक्कम रु.३६.३२ कोटी संस्थानला नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदराने टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यात यावी, असें ठरलें.**

**याचवेळी उपलब्ध रक्कम बँकेमध्ये गुंतविण्याऐवजी संस्थानने जमिनी खरेदी केल्यास ते भविष्याचे दृष्टीने फायदेशीर ठरेल याकरिता शिर्डी परिसरात व परिसराबाहेर संस्थानकरिता जमिनी खरेदी करण्यास प्राधान्य देण्यात यावे. याकामी मा.विश्वस्त सर्वश्री पांडुरंग गमाजी अभंग, सुरेश गोरक्षनाथ वाबळे, डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व अशोक भिमाशंकर खांबेकर यांची समिती नेमण्यात आली. या समितीने संस्थानकामी आवश्यक असणारी योग्य जमिनीची पहाणी करुन अहवाल व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा तोपर्यंत नेहमीप्रमाणे कार्यवाही चालू ठेवावी.**

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी/ बांधकाम विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०९. युनियन बँक ऑफ इंडियाच्या विस्तारीत कक्षासाठी दिलेल्या जागेच्या करारनाम्याचे पूढील एक वर्षासाठी नुतनीकरण करणे बाबत.**

**प्रस्ताव-** युनियन बँक ऑफ इंडिया ही संस्थानला चांगल्याप्रकारे बँकींग सेवा पुरवत आहे. बँकेचे संस्थानला नेहमीच सहकार्य असून, दक्षिणा पेटी मोजणी, देयकांचे धनादेश इत्यादी सेवा देण्यात तत्पर आहे. या सर्व सेवांचा विचार करुन बॅकेच्या शिर्डी येथील विस्तारीत कक्षासाठी संस्थानच्या साईनाथ छाया इमारतीमध्ये एक वर्षासाठी जागा भाडेतत्वावर देण्यात आलेली आहे. बँकेने त्यांच्या दिनांक ०६/१०/२००८ च्या पत्रानुसार सदर जागेस पुढील एक वर्षासाठी मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे.

बॅकेच्या विस्तारीत कक्षासाठी साईनाथ छाया इमारतीमध्ये जागा एक वर्षासाठी भाडे तत्वावर देण्यात आली होती. त्याची मुदत ३१ मार्च २००९ रोजी संपल्याने, बॅकेस संस्थानने दिनांक ३१ मार्च २००९ रोजी दिलेल्या पत्रान्वये त्यांना बाजारभावाने या जागेसाठी रुपये ११,२००/- असे मासिक भाडे आकारण्यात येईल, असे कळविले आहे. या भाड्यात १ एप्रिल २००९ च्या पुढे १०% वाढ करुन त्यांना सन २००९-२०१० या आर्थिक वर्षासाठी रुपये १२,३००/- मासिक भाडे आकारावयाचे आहे.

उपरोक्त विवेचनाप्रमाणे युनियन बँकेच्या विस्तारीत कक्षासाठी संस्थानच्या साईनाथ छाया इमारतीमध्ये देण्यात आलेल्या जागेचे पुढील एक वर्षाच्या करारनाम्याचे दिनांक ०१/०४/२००९ ते ३१/०३/२०१० या कालावधीसाठी मासिक भाडे रुपये १२,३००/- प्रमाणे नुतनीकरण संस्थानच्या विधी विभागामार्फत करण्याच्या प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६३९ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे युनियन बँकेच्या विस्तारीत कक्षासाठी संस्थानच्या साईनाथ छाया इमारतीमध्ये देण्यात आलेल्या जागेचे पुढील एक वर्षाच्या करारनाम्याचे दिनांक ०१/०४/२००९ ते ३१/०३/२०१० या कालावधीसाठी मासिक भाडे रुपये १२,३००/- प्रमाणे नुतनीकरण करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी/विधी अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १०. संगणक देणगी पावत्यांची छपाई करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईभक्तांना देणगी देणे सोईचे व सुलभ व्हावे, या उद्देशाने मंदिर परिसरामध्ये देणगी स्विकारणेसाठी आठ संगणकांवर सोय करण्यात आली आहेत. संगणकासाठी वापरण्यात येणारी प्रि-प्रिंटेड स्टेशनरी श्री साईभक्तांच्या मोठ्या प्रमाणातील ओघामुळे संपत आलेली आहे. संगणकासाठी वापरण्यात येणारी प्रि-प्रिंटेड स्टेशनरी श्री साईभक्तांकडून रोख, कपडे व वस्तु, चेक, डी.डी., परकीय चलन, भक्तमंडळ सभासद व साईलिला व्दिमासिक वर्गणी तसेच दैनंदिन सत्यनारायण व अभिषेक कुपन देण्यासाठीही वापरण्यात येत आहे.

देणगी काऊंटरवर वापरण्यात येणारी प्रि-प्रिंटेड सलग संगणक स्टेशनरी ६ x ८ x २ या साईजची असून, त्याची जाडी ८० जीएसएम अशी आहे. भक्तांचा मोठ्या प्रमाणातील ओघ पहाता सध्या वापरण्यासाठी २४ लाख स्टेशनरीची आवश्यकता भासणार आहे. या स्टेशनरी छपाईसाठी अंदाजे खर्च रुपये १०,२०,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे देणगी काऊंटरवर दैनंदिन वापरासाठी प्रि-प्रिंटेड सलग संगणक स्टेशनरी ६ x ८ x २ या साईजची ८० जीएसएम मध्ये छपाई करणेसाठी, त्यावर येणारा अंदाजे रुपये १०,२०,०००/- खर्चाच्या मान्यतेसाठी तसेच सदर छपाईची कार्यवाही खरेदी विभागामार्फत होण्याच्या प्रस्तावास मंजूरी असावी.

**निर्णय क्र.६४० प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे देणगी काऊंटरवर दैनंदिन वापरासाठी प्रि-प्रिंटेड सलग संगणक स्टेशनरी ६ x८x२ या साईजची ८० जीएसएम मध्ये छपाई कोटेशन मागवून करणेस व याकामी येणारे अंदाजे रुपये १०,२०,०००/- खर्चाच्या मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ११. सन २००९-१० प्रसादालय व कँटीन वार्षिक किराणा माल खरेदी दरवाढीबाबत**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०३.०१.२००९ मधील निर्णय क्र.७१ नुसार सन २००९-१० करीता प्रसादालय व कॅन्टीन विभागासाठी दैनंदिन वापराकरीता आवश्यक असणारा किराणा माल खरेदीस तत्वतः मान्यता मिळालेली आहे.

खालील मालाचे दरवाढीबाबतचे पत्र आलेले आहे.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव व गांव | मालाचे वर्णन | मागणी | मंजूर दर (प्र.क्विंटल) | मागितलेला दर (प्र.क्विंटल) | % वाढ |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | मे.जयंत ट्रेडींग कंपनी, जळगांव | तुरडाळ-लातुरफटका | १५०० क्विंटल | रु.५,२५०/- | रु.७,९५०/- | ५१.४२% |
| | | मुगडाळ | २६० क्विंटल | रु.४,९५०/- | रु.५,५००/- | ११.११% |
| ०२. | मे.कुणाल टी सेंटर, शिरडी | चहा पावडर - सपट सहयादी कडक डस्ट | ७५ क्विंटल | रु.११,८७५/- +४% व्हॅट | रु.१४,३७५/- +४% व्हॅट | २१.०५% |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०३. | सोनदुर्गा सन्स, नवी मुंबई | साबुदाणा | २५० क्विंटल | रु.३,०००/- +४% व्हॅट | रु.३,९००/- +४% व्हॅट | ३०.००% |
| | | हिरवी विलायची | ५० क्विंटल | रु.६४,०००/- +४% व्हॅट | रु.९०,०००/- +४% व्हॅट | ४०.६३% |
| | | सुंठ | २.५०क्विंटल | रु.१२,०००/- +४% व्हॅट | रु.१८,०००/- +४% व्हॅट | ५०.००% |
| | | मसाला विलायची | १.५० टल | रु.१८,०००/- +४% व्हॅट | रु.२४,०००/- +४% व्हॅट | ३३.३३% |
| | | मगज बी | ३ क्विंटल | रु.१६,०००/- +४% व्हॅट | रु.२६,०००/- +४% व्हॅट | ६२.५०% |
| | | उडीदडाळ-सफेद | ४ क्विंटल | रु.४,२००/- | रु.५,०००/- | १९.०५% |

उपरोक्त तिन्ही पुरवठाधारकांकडील पुरवठा चालू आहे तथापि मे.जयंत ट्रेडींग कंपनी, जळगांव यांनी त्यांचे दि.०३.०७.२००९ चे पत्रात कमी पावसामुळे व पावसाच्या अनियमिततेमुळे तुरडाळ व मुगडाळ मध्ये सुमारे २००० ते २५०० रु.प्रती क्विंटल दरवाढ झालेली असून अजून भाववाढ होण्याची शक्यता असल्याचे नमुद केलेले आहे. तसेच त्यांनी दरवाढीमुळे तुरडाळीचा दर रु.८०००/- ते रु.८५००/- व मुगडाळीचा दर रु.५४००/- ते रु.५५००/- पर्यंत मिळणेची विनंती केलेली आहे, मे.कुणाल टी सेंटर, शिरडी यांनी त्यांचे दि.३०.०६.२००९ चे पत्रात वारंवार चहाचे दर लिलावामध्ये वाढत असल्याने कंपनीने रु.२५/- प्रती किलो दरवाढ करणेची विनंती केलेली आहे. तसेच मे.सोनदुर्गा सन्स, नवी मुंबई यांनी त्यांचे दि.०९.०७.२००९ चे पत्राने सर्व मालाचे भाव वाढल्याचे सांगून नवीन वाढलेल्या दराप्रमाणे दर मिळणेची विनंती केलेली आहे.

उपरोक्त पुरवठाधारकांना आजचे सभेत चर्चेसाठी आमंत्रित करणेत आलेले आहे. तरी पुरवठाधारकांशी चर्चा करुन निर्णय घेणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र. ६४१ आजचे सभेत मे.जयंत ट्रेडिंग कंपनी,जळगाव, मे.कुणाल टी सेंटर,शिर्डी व मे.सोनदुर्गा सन्स,नवी मुंबई हे उपस्थित होते. त्यांचेशी चर्चा करण्यात आली असता, त्यांनी भाव वाढ झाल्याने वाढलेल्या दराप्रमाणे भाववाढ मिळणेबाबत विनंती केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त निविदासादरकर्त्यांनी पुरवठा आदेशाचे शर्ती व अटींनुसार वर्षभर मालाचा पुरवठा करणे त्यांचेवर बंधनकारक आहे. उपरोक्त पुरवठादारांनी मालाचा पुरवठा न केल्यास व साईभक्तांना सेवा पुरविण्यास अडचणी निर्माण झाल्यास संबंधितांचे अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन, बाजारभावाप्रमाणे जप्त केलेल्या रकमेतून माल खरेदी करण्यात यावा. तसेच उर्वरित कालावधीसाठी आवश्यक माल खरेदीकामी फेर निविदा मागविण्यात याव्यात,असें ठरलें.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १२.** **ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** पाणी पुरवठा विभागाचे कनकुरी साठवण तलाव येथे पाणी शुध्दीकरणांसाठी ब्लीचिंग पावडर विक्रम (ग्रासीम) ब्रॅंड डी.सी.एच.(डी.एस.सी.एल.) आय.एस.आय. मार्क ३४ % क्लोरीन उपलब्ध, फेरीक ॲलम- १६% ॲलोमिना फेरीक उपलब्ध व क्लोरीन गॅस सिलेंडर (१०० किलोचे) यांची दैनंदिन आवश्यकता भासते. मागील वर्षी आपण मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार वार्षिक खरेदीमध्ये निविदा मागवून नियमानुसार खरेदी केलेली आहे. सदरच्या मटेरियलचा झालेला खर्च तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | मागणी कालावधी | मागणी | जुन २००९ अखेर खर्च | शिल्लक येणे बाकी |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | ब्लीचिंग पावडर. | ०१-०९-२००८ ते ३१-०८-२००९ | ३० टन. | २१ टन. | ०९ टन. |
| ०२. | फेरीक ॲलम. | ०१-०९-२००८ ते ३१-०८-२००९ | ५० टन. | ३८ टन ५६० किलो. | ११ टन ४४० किलो. |
| ०३. | क्लोरीन गॅस सिलेंडर. | ०१-०९-२००८ ते ३१-०८-२००९ | २५ सिलेंडर. | २४ सिलेंडर. | ०१ सिलेंडर. |

पुढील वर्षासाठी नविन निविदा मागवून मटेरियल खरेदी करणे आवश्यक आहे. त्यात खालील प्रमाणे मटेरियलची आवश्यकता आहे.

| अ.नं. | तपशिल | आवश्यक | अंदाजे दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | **ब्लीचिंग पावडर.** विक्रम (ग्रासीम) ब्रॅंड डी.सी.एच. (डी.एस.सी.एल.) आय.एस.आय. मार्क ३४ % क्लोरीन उपलब्ध. | ३५ टन. | रु.१६,६००/- प्रती टन. १२.५ % वॅटसह. | ५,८१,०००.०० |
| ०२. | **फेरीक ॲलम.** | ६० टन. | रु.९,३००/- प्रती टन. | ५,५८,०००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (१६% ॲलोमिना फेरीक उपलब्ध) | | १२.५ % वॅटसह. | |
| ०३. | क्लोरीन गॅस सिलेंडर.<br>(प्रत्येकी १०० किलोचे) | ४० सिलेंडर. | रु.५०००/- प्रती सिलेंडर<br>४ % वॅटसह. | २,००,०००.०० |
| | | | **अंदाजे एकुण** | **१३,३९,०००.००** |

पाण्याचा वापर वाढल्यामुळे तसेच गाळ मिश्रीत पाणी सेटलींग टँकमध्ये जादा वेळ सेटल न होता फिल्टरमध्ये जमा होत असल्याने पाण्याची क्वॉलीटी खराब येत आहे. त्यामुळे पाण्याचा वास येत असल्याने वाढीव ॲलम, ब्लीचिंग व क्लोरीन गॅसचा वापर करावा लागत आहे. त्यामुळे मागील वर्षाचे तुलनेत वाढीव ॲलम, ब्लीचिंग व क्लोरीन गॅस सिलेंडरची मागणी करण्यात आलेली आहे.

तरी वरील प्रमाणे पाणी शुध्दीकरणांकरीता लागणारे मटेरियल विहित पध्दतीने खरेदी विभागामार्फत कोटेशन मागवून खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणा-या अंदाजे रु. १३,३९,०००/- मात्रचे खर्चास मंजुरी मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.६४२ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख/अधिक्षक,खरेदी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १३. व्दारकामाई धुनीकरीता गोवरी खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्रींचे द्वारकामाई मध्ये धुनी ज्वलनासाठी सरपण व रान शेणी गोवऱ्यांचा वापर केला जातो. या धुनीमधून काढलेली उदी साईभक्तांना श्रींचा प्रसाद म्हणून देण्यात येते. दिवसेंदिवस उदी वाटपाचे प्रमाण वाढलेले आहे. धुनीसाठी लागणाऱ्या गोवऱ्या कोटेशन पध्दतीने खरेदी कराव्या लागतात. प्रत्येक आर्थिक वर्षी (एप्रिल ते मार्च अखेर) अंदाजे रु.७०,००० किलो गोवरी खरेदी करण्यात येतात.

दि.०५.०४.२००९ रोजीचे शिरडी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत विषय नं.०८ निर्णय क्र.३२४ अन्वये समक्ष कोटेशन्स उघडून श्रीमती कुसुम लक्ष्मण ढवळे, साकरवाडी यांचेकडून प्रति किलो ०२.७० पै. प्रमाणे माहे एप्रिल २००९ ते माहे मार्च २०१० अखेर या कालावधीसाठी एकूण ७०,००० किलो गोवरी खरेदी करणेबाबत मान्यता देण्यात आली आहे. परंतू श्रीमती कुसुम ढवळे, साकरवाडी यांचेकडून रानशेणी गोवरीची मागणी असताना त्यांचेकडून थापील माती मिश्रीत गोवरी पुरविण्यात येत आहे. सदर गोवरीला जादा माती तसेच वाळूचे कण येत असल्याने उदीचा दर्जा खालविलेला आहे. बाबांचे धुनीतून निघणारी उदी साईभक्त प्रसाद म्हणून सेवन करत असतात.

दि.२९.०४.२००९ रोजीचे पत्राने श्रीमती ढवळे यांनी रानशेणी गोवरी पुरविणेबाबत असमर्थता दर्शविलेली आहे. सदरच्या रानशेणी गोवऱ्या आपल्या भागात मिळत नाही, असे त्यांनी सांगितले असून फक्त थापील गोवरी मी पुरवठा करु शकते, असे सांगितले आहे. ते टेंडरच्या नियमात बसत नाही.

दि.०५.०४.२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे कोटेशनमधील अ.नं.०२ मधील पुरवठाधारक श्री.विजय पितांबर देवरे, मालेगाव यांनी प्रतिकिलो रु.०२.९० प्रमाणे रानशेणी गोवरी पुरवठयाचे दर दिलेले होते परंतू त्यांनी दि.२९.०६.२००९ रोजीचे पत्राने प्रति किलो रु.०२.६५ प्रमाणे रानशेणी गोवरी पुरविण्यात तयार असलेबाबत अर्जाने कळविलेले आहे. यापुर्वी सन २००७-२००८ मध्ये श्री.विजय देवरे, मालेगाव यांनी रानशेणी गोवरी पुरवठा व्यवस्थितरित्या केलेला आहे.

तरी श्रीमती ढवळे, साकरवाडी यांचा टेंडरप्रमाणे रानशेणी गोवरी पुरवठा करीत नसल्याने त्यांचा पुरवठा आदेश रद्द करुन श्री.विजय पितांबर देवरे, मालेगाव यांचे कडून प्रतिकिलो दर रु.०२.६५ प्रमाणे रानशेणी गोवरी खरेदी करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६४३ प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्रीमती ढवळे, साकरवाडी यांचा टेंडरअटी प्रमाणे गोवरी पुरवठा नसल्याने त्यांचा पुरवठा आदेश रद्द करुन श्री.विजय पितांबर देवरे, मालगाव यांचे कडून प्रतिकिलो दर रु.०२.६५ प्रमाणे रानशेणी गोवरी खरेदी करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,मंदिर विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १४. श्रींचे व्दारकामाई मंदिरातील फोटोचे फ्रेमसाठी सोनेकाम करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्रींचे द्वारकामाईतील शामराव जयकर यांनी श्री साईबाबांचा समक्ष काढलेल्या प्रतिकृती फोटोस चांदीची फ्रेम बसविणेत आलेली आहे. सदरचा फोटो हा बाबांचे पवित्र धुनीससमोर मखरात ठेवलेला आहे.

साईभक्त श्री.के.सी.सुब्रमनी राजु, बँगलोर यांनी मा.श्री.जयंतराव ससाणे, अध्यक्ष महोदय यांचेकडे समक्ष दि.०७.०७.२००९ रोजी द्वारकामाई मंदिरातील सध्या असलेल्या श्रींच्या फोटोची चांदीच्या फ्रेमऐवजी सोन्याची फ्रेम देणगी दाखल करुन देण्याची इच्छा प्रदर्शित केलेली आहे. व तसे दि.०७.०७.२००९ रोजी लेखी पत्रही दिले आहे. तसेच याकामी लागणारे सोने व मजूरी ते स्वतः देणगी दाखल देण्यास तयार आहेत.

याकामी लाकडी फ्रेम व त्यावर सोन्याचा पत्रा फ्रेम तयार न करता पुर्णतः सोन्याची जाड भरीव फ्रेम तयार करुन घेण्यास हरकत नाही. सदरची फ्रेम बनविल्यानंतर द्वारकामाईत संरक्षणाची जबाबदारी अधिक राहील. तरी सोन्याची फ्रेम तयार करुन देणगीदाखल घेण्याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६४४ साईभक्त श्री.के.सी.सुब्रमनी राजु, बँगलोर यांना द्वारकामाई मंदिरातील सध्या असलेल्या श्रींच्या फोटोची चांदीच्या फ्रेमऐवजी सोन्याची फ्रेम देणगी दाखल करुन देण्यास मान्यता देण्यात आली.**

**याचवेळी मा.अध्यक्ष महोदय यांनी साईभक्त श्री प्रजापती, उदयपूर, राजस्थान हे समाधी मंदिरात बसविण्यात आलेला नंदी सोन्याचा करुन देण्यास तयार आहे अशी माहिती सभेत दिली यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू देणगी स्विकारण्यात यावी असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक, मंदिर विभाग/मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. १५.** **मोबाईलवर श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधेबाबत**

**प्रस्ताव-** (अ) मा. व्यवस्थान समितीचे दिनांक ०८/०२/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १२१ अन्वये मोबाईलवर श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा उपलब्ध करुन देणेस व त्याबदल्यात सदर सुविधा पुरविणाऱ्या प्रस्तावधारकांकडून प्रतिवर्षासाठी रॉयल्टी रुपये १५ लाख+ टॅक्स ( Non exclusive basis) घेण्यात यावे, असे ठरलेले आहे.

त्यास अनुसरुन, माहिती तंत्रज्ञान विभागाचे दिनांक ०३/०२/२००९ रोजीचे टिपणीनुसार सदर दरपत्रक (प्रती वर्षासाठी रॉयल्टी रुपये १५ लाख + टॅक्स ( Non exclusive basis) यास जनसंपर्क कार्यालयामार्फत प्रसिध्दी देणेत आलेली होती. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र. जा.नं. एसएसएसटी/आयटी/ १८०३ /२००९ दिनांक ११/०२/२००९. व जा.नं. एसएसएसटी/आयटी/ ७५०८ /२००९ दिनांक १७/०६/२००९ अन्वये विविध प्रस्तावधारकांना सदर रॉयल्टीबाबत कळविणेत आलेले आहे. तथापि, एकही प्रस्तावधारकाने सदर रॉयल्टीप्रमाणे मोबाईलवर श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा पुरविणेस संमती दर्शवून ती सुरु केलेली नाही. तथापि, Airtel या कंपनीने सदर सेवा सुरु करणेस प्राथमिक स्वरुपाची सहमती दर्शवून संस्थानने ठरविलेली रुपये १५ लाख + टॅक्स ( Non exclusive basis) इतकी रॉयल्टी देणेस सहमती दर्शविलेली आहे. त्याबाबतचा प्रस्ताव ते सादर करणार आहे.

(ब) मोबाईलवर श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा सुरु करणेबाबत Vistaas Media Ltd., Mumbai यांनी दिनांक २०/०६/२००९ रोजी मा. अध्यक्ष सो. यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावावर मा. अध्यक्ष सो. यांनी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत अभिप्राय दिलेला आहे.

Vistaas Media Ltd., Mumbai यांनी त्यांचे सदर प्रस्तावात ऑनलाईन दर्शन सुविधा त्यांचेमार्फत सलग तीन वर्षे सुरु ठेवून, त्याबदल्यात प्रतीवर्षी रुपये २५ लाख मात्र रॉयल्टी देणेबाबत नमुद केलेले आहे. त्यासाठी त्यांना मोबाईल, वेबसाईट व आयपीटीव्ही यांचेवर ऑनलाईन दर्शन दाखविणेचा हक्क मिळावे, अशी विनंती केली आहे.

परंतु, मोबाईल ऑनलाईन दर्शन सुविधा Non Exclusive पध्दतीने दिल्यास कोणतीही कंपनी सदरील सेवा सुरु करण्यात असमर्थ ठरेल. यासाठी मोबाईलवर ऑनलाईन दर्शन Exclusive स्वरुपात ( एकच प्रस्तावधारकांस) दिल्यास तो कार्यक्षमपणे करुन शकेल असे नम्र मत आहे. नुकत्यास प्राप्त झालेल्या Vistaas Media Ltd., Mumbai यांना Exclusive (Except Airtel Network) स्वरुपात ऑनलाईन दर्शनसाठी कमीत कमी २५ लाख घेण्यात यावे, असे नम्र मत आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे, Vistaas Media Ltd., Mumbai यांना मोबाईलवर श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा Airtel मोबाईलधारक वगळता (Except Airtel Network) एक वर्षासाठी सुरु करणेकामी मान्यता देणेस व त्याबदल्यात त्यांचेकडून एक वर्षासाठी घ्यावयाची रॉयल्टी ठरविणेच्या निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.६४५** **प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे Vistaas Media Ltd., Mumbai यांना मोबाईलवर श्रींचे ऑनलाईन दर्शन सुविधा Airtel मोबाईलधारक वगळता (Except Airtel Network) एक वर्षासाठी सुरु करणेकामी मान्यता देण्यात आली, त्याबदल्यात त्यांचेकडून एक वर्षासाठी रु.२५ लाख रॉयल्टी घेण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. १६.** **भक्तनिवासस्थानमधील गाळा नं.१४,१५ ची डिपॉझिटची रक्कम जमा करुन गाळा बंद करणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचा सभा दि.१५/११/२००८ रोजीच्या निर्णयास अनुसरुन गुरुवार दि.१९/०३/२००९ रोजी नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम ) इमारतीमधील १७ गाळयांचा लिलाव मा.विश्वस्त यांचे समक्ष मा.कार्यकारी अधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी तसेच संबंधीत विभाग प्रमुख यांचे उपस्थित झालेला आहे.

प्रस्तुत लिलावामध्ये श्री रविंद्र डी. हैद्राबाद, हल्ली मुक्काम शिरडी यांनी भाग घेतला असून त्यांना डी विंग बाहेरील बाजुचा गाळा नं.१४,१५ उपहारगृह व रसवंतीगृह चालविणेकामी डिपॉझिट प्रति गाळा रुपये- १,००,०००/- ( अक्षरी रुपये- एक लाख ) मात्र असे एकुण **दोन गाळयांचे रुपये- २,००,०००/-( अक्षरी रुपये- दोन लाख )** मात्र भरलेली असून दि.१९/०३/२००९ रोजी लिलावात मंजुर बोली प्रमाणे दोन गाळयाचे प्रति दरमहा रुपये- ८०,०००/- ( अक्षरी रुपये- ऐंशी हजार ) मात्र व मीटर रिडींग प्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन **जा.नं.एसएसएस/वशी-०२/३७३४/२००९ दिनांक ३१/०३/२००९** अन्वये गाळयांचा वापर

भक्तांच्या सोईसाठी सुरु करणेकामी दि.०१/०४/२००९ ते दि.२८/०२/२०१० अखेर ११ महिने कालावधीसाठी लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर चालविणेकामी मंजुरी दिलेली आहे.

जा.नं.एसएसएस/वशी-०२/७३८५/२००९ दि.१५/०६/२००९ अन्वये उपरोक्त गाळयांची प्रतिमहा रुपये- ८०,०००/- याप्रमाणे दोन महिन्याची रक्कम रुपये- १,६०,०००/- व नविन भक्तनिवासस्थान यांचेमार्फत देण्यात आलेली एक रुम ४ कॉटची माहे मे-२००९ चे भाडे रुपये- ४,२००/- (अक्षरी रुपये- चार हजार दोनशे ) मात्र असे एकुण रुपये- १,६४,२००/- इतकी रक्कम भरणेबाबत कळविण्यात आले होते.

दि.०९/०६/२००९ रोजी त्यांनी इकडील कार्यालयास अर्ज सादर केला असून, त्यात गाळयाचे मागील महिन्याचे भाडे थकले असून दि.२७/०६/२००९ अखेर भरणार असे कळविले असून खालील मागण्या केलेल्या आहेत.

०१) सिंगल रुम ( एक रुम ) चे भाडे भरण्यास तयार आहे.

०२) रसवंती गृह असलेली रुम बंद असून तिचे भाडे देणे मला परवडत नाही.

०३) बोर्ड लावणेकरीता परवानगी देणे.

०४) रुम नं.१४ पश्चिमेकडील असून उघडयावर आहे. तरी वरती रुम असून भक्त लोक कचरा, कप वगैरे टाकतात. करीता शेड तयार करणेस विनंती.

०५) रुम नं.१४ च्या समोर कापडी बोर्ड लावला असता कोणी तरी अज्ञात व्यक्तीने तोडून नेला आहे. डी-ए विंग गार्डनमध्ये गेटजवळ बोर्ड लावला असता चाकुने बोर्ड कापून नेला. वॉचमन ऑफिसमध्ये तक्रार केली असता समाधानकारक उत्तर न देता उडवा-उडवीचे उत्तरे दिली.

०६) तसेच भक्तनिवास्थानमधील वास्तव्यास घेण्यात आलेली रुम नं. १०९ हिचे असलेले भाडे प्रति महिना रुपये- ४,२००/- हिचे भाडे कमी करुन मिळावे,अशी विनंती केलेली आहे.

गाळा न.१४ व १५ उपहारगृह व रसवंतीगृहासाठी देण्यात आलेल्या गाळयाचे भाडे भरणेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०२/७३८५/२००९ दि.१५/०६/२००९ अन्वये पत्राने कळविले असून अदयाप पावेतो भाडे भरलेले नाहीत.

उपरोक्त लिलावाच्या वेळी ज्या अटी/शर्ती वाचुन दाखविण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार त्यांचे रसवंती गृहासाठी घेतलेले गाळा अदयाप पावेतो चालु केलेला नाही. उपहारगृह व रसवंतीगृहासाठी रुपये- २,००,०००/- ( अक्षरी रुपये- दोन लाख ) मात्र इतकी डिपॉझिट रक्कम (दि.१९/०३/२००९ रोजी पावती नं.११७५४३ ने रु.३०,०००/-व दि.३०/०३/२००९ रोजी पावती नं.११७७१४ ने रुपये- १,७०,०००/- असे एकुण रुपये- २,००,०००/- ) त्यांनी संस्थानचे लेखाशाखेत जमा केलेली आहे. गाळा नं.१४ व १५ हे दोन्ही गाळे एकत्रित असून त्याकामी रुपये-८०,०००/- ( अक्षरी रुपये- ऐंशी हजार ) इतके मासिक परवाना फी आहे.

**श्री रविंद्र रेड्डी यांचे विनंती अर्जानुसार खालील प्रमाणे कार्यवाही करता येईल.**

| अ.नं. | श्री रविंद्र रेड्डी यांचे अर्जानुसार मागण्या | संस्थानकडून प्रस्तावित कार्यवाही |
|---|---|---|
| **०१** | सिंगल रुम ( एक रुम ) चे भाडे भरण्यास तयार आहे. | मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार नविन भक्तनिवासस्थान इमारतीमधील १७ गाळयांचा लिलाव मा.विश्वस्त यांचे समक्ष मा.कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांचे उपस्थित जाहीर लिलावाच्या अटी/शर्ती वाचून दाखविण्यात आल्या असून,त्यानुसार उच्चतम बोली बोलून गाळा नं.१४ व १५ या गाळयाचा जाहीर लिलाव एकत्रित झालेला असून जा.नं.एसएसएस/वशी-०२/३७३४/०९ दि. ३१/३/२००९ अन्वये दि.०१/०४/२००९ ते दि.२८/०२/२००९ अखेर ११ महिने कालावधीसाठी लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर गाळा नं.१४ व १५ असे दोन गाळयाचे डिपॉझिट रक्कम रुपये - २,००,०००/-इतकी रक्कम त्यांनी संस्थानचे लेखाशाखा विभागात जमा केली असून मासिक परवाना फी दोन्ही गाळयाचे एकत्रित रुपये- ८०,०००/-इतक्या व विद्युत बील वेगळे आकारुन भक्तांच्या सोयीसाठी चालविणेकामी मंजुरी दिलेली आहे. |
| **०२** | रसवंती गृह असलेली रुम बंद असून तिचे भाडे देणे मला परवडत नाही. | श्री रविंद्र रेड्डी यांनी फक्त उपहारगृह चालू ठेवले आहे. त्यांनी रसवंतीगृह गाळयाचा वापर रसवंतीगृहासाठी न केल्यामुळे त्यांचा रसवंती वापर व वापरासाठीचा एक गाळा (एकत्रित गाळयापैकी अर्धा भाग गाळा) बंद करता येईल व (अर्धा भाग) गाळा संस्थानचे ताब्यात घेता येईल. दि.०१/०४/२००९ ते दि.०९/०६/२००९ अखेर ७० दिवसांचे रेंट त्यांचेकडून वसुल करुन दि. १०/०६/२००९ पासून फक्त उपहारगृहाचा एक गाळा ( एकत्रित गाळयाचा अर्धा भाग) त्यांचेकडे ठेवून त्याप्रमाणे त्या गाळयाची लासन्स फी घेता येईल. उपहारगृहाचे व रसवंतीगृह यांचे एकत्रित मासिक परवाना फी रुपये- ८०,०००/- इतके असून त्यापैकी फक्त एक गाळा त्यांचे वापरात ठेवून त्या एका गाळयासाठी (एकत्रित गाळयाचा अर्धा भाग) मासिक परवाना फी रुपये- ४०,०००/- आकारता येईल. |
| **०३** | बोर्ड लावणेकरीता परवानगी देणे. | उपहारगृहाच्या गाळयासमोर भक्तांच्या सोईसाठी बोर्ड लावणेस परवानगी देता येईल. |
| **०४** | रुम नं.१४ पश्चिमेकडील असून उघडयावर आहे. तरी वरती रुम असून भक्त लोक कचरा, कप वगैरे टाकतात. करीता शेड | रुम नं.१४ पश्चिमेकडील असून उघडयावर आहे. तरी वरती रुम असून भक्त लोक कचरा, कप वगैरे टाकतात. करीता त्यांनी स्वतः खर्च करुन शेड तयार करणेस परवानगी देता येईल, असे मत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | तयार करणेस विनंती. | |
| ०५ | रुम नं.१४ च्या समोर कापडी बोर्ड लावला असता कोणी तरी अज्ञात व्यक्तीने तोडून नेला आहे. डी-ए विंग गार्डनमध्ये गेटजवळ बोर्ड लावला असता चाकुने बोर्ड कापून नेला. वॉचमन ऑफिसमध्ये तक्रार केली असता समाधानकारक उत्तर न देता उडवा-उडवीचे उत्तरे दिली. | उपहारगृहाच्या गाळयासमोर बोर्ड लावण्यासाठी परवानगी दिल्यास इतरत्र बोर्ड लावण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही. |
| ०६ | तसेच भक्तनिवास्थानमधील वास्तव्यास घेण्यात आलेली रुम नं. १०९ हिचे असलेले भाडे प्रति महिना रुपये- ४,२००/- हिचे भाडे कमी करुन मिळावे, अशी विनंती केलेली आहे. | नविन भक्तनिवासस्थान इमारतीमधील ४ कॉटची डी-विंग रुम नं.१०९ रुम तात्पुरते स्वरुपात गरम पाण्यासह वास्तव्याकरीता देण्यात आलेली आहे. तिचे भाडे संस्थानच्या नियमानुसार घेण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर रुमचे भाडे कमी करता येणार नाही. |

उपरोक्त बाबींचा विचार करता, श्री रविंद्र रेड्डी यांना उपहारगृह व रसवंतीगृहासाठी २ गाळे दिलेले आहेत. त्यापैकी रसवंतीगृहासाठी त्यांनी व्यवसाय चालु केलेला नाही. त्यांची रसवंतीगृहाची परवानगी रद्द करणेबाबत विचारार्थ सादर.

त्याच प्रमाणे रसवंतीगृहासाठीची परवानगी रद्द केल्यास त्यांना एकत्रित देणेत आलेले दोन गाळयापैकी १ गाळा ( एकत्रित गाळयाचा निम्मा भाग ) त्यांचेकडून काढून घेऊन संस्थानचे वापरांसाठी परत घेता येईल. त्याच बरोबर त्यांचे वापरांत दिलेले १ गाळयाची संख्या कमी झाल्यामुळे त्यांचेकडून त्यांची लायसन्स फी मासिक रुपये-४०,०००/- (अक्षरी रुपये- चाळीस हजार) मात्र कमी करुन फक्त उपहारगृह मासिक परवाना फी रु.४०,०००/- आकारुन चालविणेस त्यांना परवानगी देता येईल. श्री रविंद्र रेडड्री हे गाळयांचा वापर फक्त उपहारगृह चालविणेसाठी करीत आहेत. रसवंती स्टॉल ते चालवित नाहीत. दोन गाळेची परवाना फी देखील त्यांना परवडत नाही असे दिसुन येते. अशा परिस्थितीत मध्ये त्यांचे १ गाळयाची परवानगी रसवंती गृहाची परवानगी ररद् करण्यासाठी /त्यांचेकडुन एक गाळा परत घेणेसाठी व फक्त एकच गाळा उपहार गृहाचे वापरासाठी त्यांचेकडे ठेऊन त्याबाबत परवाणा फी रु. ४०,०००/- अक्षरी चाळीस हजार (लाईट बिल अलहिदा) आकारुन Leave and Licence तत्वावर उर्वरित मुदतीसाठी देता येईल दि.१/४/२००९ ते दि.९/६/०९ पावेतो दोन्ही गाळयाची रक्कम वसुल करता येईल.निर्णयासाठी सादर..

**निर्णय क्र.६४६** **श्री रविंद्र रेड्डी यांना उपहारगृह व रसवंतीगृहासाठी देण्यात आलेला परवाना रद्द करुन त्यांची अनामत रक्कम संस्थान जमा करण्यात यावी. तसेच सदरहू गाळयांची जाहीर लिलावाने फेर विक्री करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १७.** **स्पे.मु.नं.६३/१९९८ सौ.शैला आग्रे विरुध्द श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी वगैरे वादी सौ.शैला अशोक आग्रे यांना आर्थिक मदत करणे बाबत.**

**प्रस्ताव-** सौ.शैला अशोक आग्रे रा.एकरुखा,तालुका-राहाता यांचे संस्थानचे रुग्णालयामध्ये दि.०२/०२/१९८७ रोजी झालेल्या मोतिबिंदु शस्त्रक्रिया शिबिरामध्ये डाव्या डोळयाचे ऑपरेशन करण्यात आले. सदर ऑपरेशन लायसन्स क्लब मुंबई, सिव्हील हॉस्पिटल व जिल्हा परिषद अहमदनगर यांनी संयुक्तरित्या आयोजीत केलेल्या शिबिरामध्ये करण्यात आले होते.

सौ.शैला आग्रे यांचे डाव्या डोळयाचे ऑपरेशन केल्यानंतर त्या डोळयाची द्दष्टि पुन्हा प्राप्त झाली नाही. मात्र उजव्या बाजुच्या व चांगल्या दिसणा-या डोळयाची द्दष्टि मात्र ऑपरेशन व औषध उपचारामुळे कायमची गेली व सौ. शैला अशोक आग्रे हया दोन्ही डोळयाने कायमच्या आंधळया झाल्या. अशा आशयांचा दावा सौ. शैला अशोक आग्रे यांनी कोपरगांव कोर्टात केला असुन डोळयावर उपचार करुन मिळणेस व नुकसान भरपाई मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

सौ. शैला आग्रे हया दुर्बल असुन औषधोपचार व ऑपरेशनसाठी पैसा नाही. त्यांना लहान लहान मुले आहेत. शिबिरातील डॉक्टरांचे हलगर्जीपणामुळे व ऑपरेशननंतरचे काळजीसाठी सदर शिबिरात व संस्थानचे दवाखान्यात व्यवस्था माहीतीज्ञान नसल्यानें त्यांची द्दष्टि गेली, असे सौ.शैला अशोक आग्रे यांचे म्हणणे आहे. सदर दाव्यात त्यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी संस्थानचे चीफ मेडिकल ऑफीसर तसेच संस्थानचे डॉक्टर ज्योती मोमले (संस्थानचे तत्कालीन मेडिकल ऑफिसर) लायन्स क्लब मुंबई, सिव्हील हॉस्पिटल अहमदनगर, जिल्हाधिकारी अहमदनगर,जिल्हा परिषद अहमदनगर, सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचे विरुध्द सदर दावा केलेला आहे व या सर्वांकडून औषधोपचार करुन द्दष्टि प्राप्त करुन द्यावी व त्यासाठी लागणारा खर्च द्यावा. द्दष्टि प्राप्त होईपावेतो दररोज रुपये- १५०/- (अक्षरी रुपये- एकशे पन्नास ) मात्र याप्रमाणे नुकसान भरपाई द्यावी. द्दष्टि प्राप्त न झाल्यास रक्कम रुपये- २२,४४,७५०/- ( अक्षरी रुपये- बावीस लाख, चौऱ्येचाळीस हजार, सातशे पन्नास ) मात्र वसुल होऊन मिळावे,अशा आशयाची विनंती मा.कोर्टास केलेली आहे.संस्थानतर्फे दाव्यात कैफियत देतांना वादीचे म्हणणे नाकारलेले आहे. संस्थानकडून कोणताही हलगर्जीपणा झालेला नाही. संस्थानचा शिबिरातील सहभाग हा शिबिरासाठी जागा, वीज, पाणी देणे

एवढयापुरता होता. वादीचे डोळयात ( पडदयात ) मुळातः दोष असल्यामुळे दृष्टि गेली असावी, अशा अर्थाचे म्हणणे संस्थानने दाखल केलेले आहे. सदरच्या दाव्याचे काम मा.कोर्टात चालु झालेले आहे.

उपरोक्त दावा चालु असतांना सौ.शैला अशोक आग्रे यांनी वेळोवेळी मा.विश्वस्तांकडे व संस्थानकडे अर्ज केले आहेत. त्यांचे कुटूंबावर उपासमारीची वेळ आली आहे. नुकसान भरपाई म्हणुन नव्हे तर मदत म्हणुन योग्य वाटेल ती रक्कम व मा.कोर्टातील तक्रारी सोडून देणेस तयार असल्याचा अर्ज केला आहे. त्यांची परिस्थिती हलाखीची आहे व त्यांचे पती गणेश साखर कारखाना,गणेशनगर येथे सिजनल कामगार आहे,असेही अर्जात म्हटले आहे.

दाव्यामध्ये डिक्री मिळण्याचा त्यांचा हेतु नाही. परंतू त्यांना मानवी दृष्टिकोनातून दिलेली नुकसान भरपाई म्हणुन नाही तर मदत म्हणुन मानवी दृष्टिकोनातून दिलेले दान म्हणुनही स्विकारण्याची त्यांची तयारी आहे. त्यांनी अशा आशयाचा अर्ज दिला आहे.

उपरोक्त दाव्यामध्ये चौकशीचे काम चालु झाले आहे. सौ.शैला आग्रे यांचे एकंदरीत परिस्थिती पाहता कायदेशिर दृष्टिकोनातून नव्हे तर मानवी दृष्टिकोनातून त्यांना आर्थिक मदत करण्याबाबत शिरडी संस्थानने पुढाकार घ्यावा व त्यांना काहीतरी आर्थिक मदत द्यावी,असे मा.कोर्टाने सुचित केले आहे. त्याचप्रमाणे इतर प्रतिवादी लायसन्स क्लब वगैरे यांनाही आर्थिक मदत देता येईल.कारण सौ.शैला आग्रे यांचे खरोखरच हाल होत असल्याचे दिसून येते, असे कोर्टाने पुर्वी दरखास्त नं.०५/१९९० चे तारखेचे वेळी संस्थानचे प्रशासकीय अधिकारी श्री पी.टी.जोशी यांचेकडे सांगितले आहे. इतर रुग्णालयाला आर्थिक मदत संस्थानकडून दिली जाते. त्या धर्तीवर सौ.शैला आग्रे यांना आर्थिक मदत करावी,असे त्यावेळी मा.कोर्टाने सुचित केले आहे.

उपरोक्त विषयान्वये सदर प्रकरणाशी सौ.शैला आग्रे यांचे तर्फे त्यांचे पती श्री अशोक सोन्याबापु आग्रे रा.एकरुखे ,ता.राहाता यांनी मा.अध्यक्ष साहेब यांना आवक नं. ११९८ दि.३१/०३/२००९ रोजी पत्र दिले. व पत्रात न्याय दृष्टिकोनातून संस्थानच्या उद्देशानुसार अर्जदार हीस नुकसान भरपाईची रक्कम लवकरांत लवकर उपलब्ध होणेकामी सहकार्य करुन तसा ठराव मंजुर करुन घ्यावा, अशी विनंती केली आहे.

उपरोक्त पत्रास अनुसरुन दि.२४/११/२००८ रोजी संबंधीत प्रकरणी दि. ०८/०३/२००९ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे विचारार्थ विषय नं.८७, निर्णय क्रं.२५६ अन्वये विचारार्थ सादर केला असता, सदरचा विषय स्थगित करण्यात आला आहे.

त्यानंतर (आवक नं.२००१५ दि.२४/०६/२००९ रोजी ) सौ.शैला आग्रे यांनी मा.अध्यक्ष साहेब यांना अग्रेशित पत्र दिले असून सदर पत्रात आपले संस्थान हे सेवाभावी संस्थान असुन संस्थानला लाखो रुपयांचे उत्पन्न आहे. शिवाय सदर संस्थान हे गोर-गरिबांना मदत करुन त्यांचे अडी-अडचणी सोडविते. अर्जदाराचे न्याय दृष्टिकोनातून संस्थानच्या उद्देशानुसार अर्जदारास नुकसान भरपाईची रक्कम लवकरांत लवकर उपलब्ध होणेकामी सहकार्य करावे व तसा ठराव मंजूर करुन घ्यावा, अशी विनंती केली आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता सौ.शैला अशोक आग्रे यांना संस्थानमार्फत वैद्यकीय मदत म्हणुन उचित रक्कम रुपये- दोन ते अडीच लाख पावेतो किंवा उचित रक्कम रक्कम देणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे पुर्वीच सादर आहे, स्थगित आहे.

सौ.शैला अशोक आग्रे यांनी आता आवक नंबर २००१५ दिनांक २४/०६/२००९ रोजीचा पुनश्चः सादर केलेला अर्ज माहितीसाठी / निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.६४७** **आजचे सभेत श्री.अशोक सोन्याबापु आग्रे रा.एकरुखे,ता.राहाता हे उपस्थित होते. त्यांनी संस्थान विरुध्द दाखल केलेली केस मागे घेतल्यास त्यांचा एक मुलगा संस्थानमध्ये कंत्राटदारामार्फत आवश्यकतेनुसार कंत्राटी कर्मचारी म्हणून घेण्यात येईल मात्र त्यास संस्थान सेवेत कायम करणेबाबत हक्क सांगता येणार नाही अशी सभेने त्यांना स्पष्ट कल्पना दिली, ती त्यांनी मान्य केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री अशोक सोन्याबापु आग्रे रा.एकरुखे ,ता.राहाता यांनी संस्थान विरुध्द दाखल केलेली केस मागे घेतल्यास त्यांचे एका मुलास कंत्राटदारामार्फत आवश्यकतेनुसार कंत्राटी कर्मचारी म्हणून संस्थानमध्ये घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १८.** **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव -२००९**

**प्रस्ताव-** यावर्षीचा श्रींचा ९० वा पुण्यतिथी उत्सव - २००९ रविवार दिनांक २७/०९/२००९ ते मंगळवार दिनांक २९/०९/२००९ ( आश्विन शु. ९ शके १९३१ ते आश्विन शु. ११ शके १९३१) असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचा मुख्य दिवस सोमवार दिनांक २८/०९/२००९ हा आहे.

या उत्सवासाठी पुढीलप्रमाणे तयारी करावी लागणार आहे.

**०१) उत्सव निमंत्रण पत्रिका :-** संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार चालविणेसाठी तयार करण्यात आलेल्या योजनेच्या तरतुदीनुसार व प्रथेप्रमाणे भक्त मंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतील. श्री गुरुपौर्णिमा उत्सव सन २००९ मध्ये १,४५,००० निमंत्रण पत्रिका तसेच १,००० सन्माननीय पाहुण्यांसाठी निमंत्रणपत्रिका पाकीटासह छपाई करण्यात आल्या होत्या. यंदाचे श्री पुण्यतिथी उत्सवात सभासदांची संख्या लक्षात घेता १,४७,००० निमंत्रण पत्रिका व १,००० सन्माननीय पाहुण्यांसाठी

निमंत्रणपत्रिका पाकीटासह छपाई करुन घ्याव्या लागतील. तसेच नेहमी प्रमाणे प्रेस नोट ( न्यूज अॅटम) म्हणून वर्तमान पत्रातून प्रसिध्दी देण्यात यावी

**०२) निमंत्रीत कलाकार कार्यक्रम :-**

रविवार दिनांक २७/०९/२००९ ( प्रारंभ दिवस) — रात्रौ. ०७.०० ते ०९.०० व रात्रौ.०९.३० ते १०.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम.

सोमवार दिनांक २८/०९/२००९ ( मुख्य दिवस) — १) या दिवशी सायंकाळी ०७.०० ते ०९.०० पर्यंत व रात्रौ ९.३० ते १०.०० निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम.
२) रात्रौ १०.०० ते सकाळी ०६.०० पर्यंत(२८.०९.२००९) कलाकारांची सेवा हजेरी कार्यक्रम. मुख्य दिवशी समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल.

मंगळवार दिनांक २९/०९/२००९ — रात्रौ.०७.०० ते १०.०० पर्यंत कलाकारांचा कार्यक्रम. (सांगता दिन)

पावसाचे दिवस असल्याने निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम समाधी मंदिराशेजारील स्टेजवर ठेवावेत असे नम्र मत आहे.

उत्सवात दिनांक २७/०९/२००९ ते दिनांक २९/०९/२००९ असे तीन दिवसाचे निमंत्रीत कलाकारांचे कार्यक्रम निश्चित करणे आहेत. श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव -२००८ मध्ये ह.भ.प. मंदार गंगाधरबुवा व्यास, डोंबीवली, मुंबई यांना तीन दिवस कीर्तन कार्यक्रम देण्यात आला होता. दिनांक २७/०९/२००९ ते दिनांक २९/०९/२००९ या तीन दिवसाकरीता कीर्तनकार ठरविणे आहे.

**०३) मंडप व कमानी:-** उत्सवात गरजेप्रमाणे मंडप व स्टेज बांधकाम विभागामार्फत टाकुन घेणेत याव्यात.

**०४) सर्व साधारण व्यवस्था:-** नेहमीप्रमाणे भक्तांची स्वागत व्यवस्था, मदत केंद्र, प्रथमोपचार केंद्र, निवास व्यवस्था, आरोग्य व्यवस्था, इ.व्यवस्था ठेवण्यात येतील. स्वयंसेवी म्हणून काम करु इच्छिणा-या कर्मचारी व इतर व्यक्तींना नेहमीप्रमाणे संधी देण्यात येईल. देणगी स्वीकारणेकामी जादा काऊंटर्स उघडण्याची व्यवस्था करण्यात येईल. निमंत्रित कलाकारांची निवास,भोजन, मानधन व्यवस्था करण्यात येईल. कलाकारांसाठी वास्तव्य व्यवस्था गरजेनुसार संस्थानचे निवासात करण्यात यावी.

सालाबादप्रमाणे भिक्षा झोळी मिरवणूक, त्यात विश्वस्तांचा सहभाग, पालखी व रथ मिरवणूक, आराधना विधी, विणा, व पोथी त्यातील विश्वस्तांचा सहभाग, सिमोल्लंघन, गांवजेवण, प्रसाद जेवण व्यवस्था, पालखी व्यवस्था, कंत्राटी कामगार, विद्युत रोषणाई , मिष्टान्न निश्चिती, इ.बाबी नेहमीप्रमाणे करण्यात यावी.

श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२००८ मध्ये अंदाजपत्रकीय रु. ३९,२५,०००.०० इतक्या रकमेस मंजूरी देण्यात आली होती. प्रत्यक्ष खर्च रु. ३९,९१,५५४.०० इतका खर्च आला होता. श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव सन २००९ करीता अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४५,००,०००.०० मंजूरीसाठी सादर केलेले आहे. त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.६४८** **उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.उत्सवात दिनांक २७/०९/२००९ ते दिनांक २९/०९/२००९ असे तीन दिवसाचे निमंत्रीत कलाकार व कीर्तनकार निश्चित करण्यातचे अधिकार मा.अध्यक्ष व मा.कार्यकारी अधिकारी यांनी प्रदान करण्यात आले. तसेच श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२००९ करीता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४५,००,०००/ चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. १९.** **डॉ.नानासाहेब सारंगधर म्हस्के, वैद्यकीय उपसंचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. नानासाहेब सारंगधर म्हस्के, यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२२२३/२००७ दि.००४/०८/२००८ अन्वये संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटल,शिरडीकडे, वैद्यकिय उपसंचालक या पदावर प्रतिमहा रु.३०,०००/- एकत्रित मानधनावर एक वर्षाचे कालावधीसाठी नेमणूंक करण्यात आली होती.त्यानुसार ते दि.०६/०८/२००७ रोजी कामावर हजर झाले होते.

डॉ.म्हस्के, यांची एक वर्ष कालावधीची मुदत संपुष्ठात आल्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि. २०/०९/२००८ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार जा.नं.एसएसएस/वशी-०१/३०४२/२००८ दि.११/१०/२००८ अन्वये त्यांची मुदत दि.०६/०८/२००८ पासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी वाढविण्यात येऊन त्यांना प्रति महा रु.३००००/- ऐवजी प्रतिमहा रु.४५०००/- एकत्रित मानधन करण्यात आले आहे. त्यांची एक वर्ष वाढविण्यात आलेली मुदत **दि.०५/०८/२००९** अखेर संुपुष्ठात येत आहे.

डॉ. नानासाहेब सारंगधर म्हस्के, यांची जन्मतारीख दि.०३/०६/१९४३ असून त्यांचे वय आज मितीस ६६ वर्षे ०१ महिना इतके आहे.

तरी डॉ.नानासाहेब म्हस्के, वैद्यकिय उपसंचालक, श्री साईबाबा हॉस्पीटल यांचे पुढील मुदतवाढीबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६४९ यावर सविस्तर चर्चा होऊन डॉ.नानासाहेब म्हस्के, वैद्यकिय उपसंचालक, श्री साईबाबा हॉस्पीटल यांना पूर्वीचेच अटी शर्तीवर दिनांक ०६.०८.२००९ पासून एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. २० माहिती तंत्रज्ञान विभागासाठी तांत्रिक सल्लागार संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६/०९/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७३७ अन्वये विजय मंडोरा Sai InfoSystems (India) Pvt. Ltd, Ahmedabad यांची कोणत्याही प्रकारचे मानधन न देता तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणूक करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन, विजय मंडोरा Sai InfoSystems (India) Pvt. Ltd, Ahmedabad यांची जा. नं. एसएसएसटी/आयटी/१३३६४/०८ दिनांक १२/०९/२००८ नुसार दिनांक ०१/०७/२००८ ते दिनांक ३०/०६/२००९ या एक वर्षाचे कालावधीसाठी तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणूक आदेश देण्यात आलेला आहे. सदर मुदत दिनांक ३०.०६.२००९ रोजी संपुष्टात आली असल्याने, श्री विजय मंडोरा, Sai InfoSystems (India) Pvt. Ltd,Ahmedabad यांनी दिनांक ३०.६.२००८ चे पत्रान्वये त्यांनी नेमणूकीस पुढील पाच वर्षासाठी मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली आहे.

श्री विजय मंडोरा यांनी सल्लागार म्हणून नेमणूक झालेपासून त्यांनी संस्थानचे शिर्डी कार्यालयाकडे त्यांचा एक प्रतिनिधी दिलेला आहे. ते संस्थानचे विविध विभागांना वेळोवेळी भेटी देऊन विभागांचे कामकाजात येणाऱ्या दैनंदिन अडीअडचणी सोडविण्यास मदत करत आहेत. तसेच माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत विविध प्रकल्प राबविण्यात येत असल्याने, सदर प्रकल्पांत तांत्रिक सल्ला-तथा-मार्गदर्शन होणेसाठी तसेच संस्थानचे विविध विभागांना दैनंदिन येणाऱ्या अडचणी सोडविण्याच्या कामाकाजात मदत होण्यासाठी श्री विजय मंडोरा यांचे सल्लागार म्हणून नेमणूकीस पूढील पाच वर्षाचे कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी, असे नम्र मत आहे.

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे श्री विजय मंडोरा, Sai InfoSystems (India) Pvt. Ltd, Ahmedabad यांची पूढील पाच वर्षाचे कालावधीसाठी कोणत्याही प्रकारचे मानधन न देता तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणूकीस मुदतवाढ देण्याचे मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.६५० प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री विजय मंडोरा, Sai InfoSystems (India) Pvt. Ltd, Ahmedabad यांची पूढील पाच वर्षाचे कालावधीसाठी कोणत्याही प्रकारचे मानधन न देता तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणूकीस मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच श्री विजय मंडोरा व प्रतिनिधींना मोफत जेवण व राहण्याची व्यवस्था करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-आयटी विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. २१ संस्थान पाणीपुरवठा व्यवस्थेकरीता वाढीव जलशुध्दीकरण केंद्र प्रकल्पाचे पहिल्या टप्प्यामध्ये जलवाहिन्यांचे कामांसाठी अपेक्षित खर्चास मंजूरी मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे भविष्यातील वाढत्या पाण्याची गरज लक्षात घेता साठवण तलाव ते ओव्हर हेड टँक व ओव्हर हेड टँक ते जूने प्रसादालय परिसर, धर्मशाळा (२०० रुम), व्दारावती, नविन प्रसादालय, नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम), साईआश्रम व भविष्यातील गार्डन इत्यादी प्रकल्पांसाठी जलवाहिन्या टाकणे, नविन जलशुध्दीकरण केंद्राची निर्मिती करणे व नवीन ओव्हर हेड टँक्स उभारणे इ. कामे करणे गरजेचे आहे. याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कोपरगांव यांनी सर्व्हे केला होता. त्यानुसार त्यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६-०३-२००८ चे सभेतील निर्णय क्रं.२५२ नुसार एकुण रु. ७,४८,६५,५४०/- मात्रचे खर्चास व सदर प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आलेली होती. तथापि याबाबत संस्थान मार्फत कन्सलटंटची नियुक्ती करून सदरहू काम करणेबाबत यथावकाश पुढील निर्णय घेण्यात यावा असे ठरले. त्यानुसार इकडील विभागामार्फत कन्सल्टंटची नियुक्ती करणे करीता प्रस्ताव मागविण्यात आले. त्यानुसार प्राप्त झालेल्या प्रस्तावांबाबत दि. ०३-०१-२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये चर्चा / वाटाघाटी करणेत येऊन सदरहू सभेतील निर्णय क्रं. १४ अन्वये किर्लोस्कर कन्सलटंट प्रा.लि पुणे यांचा निम्नतम दराचा प्रस्ताव मंजुर करण्यात आला. प्रस्तुतचे निर्णयानुसार जा.क्रं./१४५७/२००९, दि.०२-०२-२००९ रोजीचे कार्यादेशान्वये किर्लोस्कर कन्सल्टंट प्रा.लि.पुणे यांची उपरोक्त प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

वरीलप्रमाणे कार्यादेशानुसार किर्लोस्कर कन्सल्टंट प्रा.लि. पुणे यांनी संपुर्ण प्रकल्पाचा व परिसराचा सर्व्हे करून Detailed Project Report तयार करुन दि. ०८/०६/२००९ रोजी संस्थानकडे सादर केला आहे. यामध्ये कन्सलटंट यांनी येत्या २०३५ सालापर्यंतचे लोकसंख्येचा विचार करून डिझाईन केलेले आहे. यासाठी त्यांनी एकूण १४.९० MLD क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्राची आवश्यकता गृहीत धरुन सध्याचे जलशुध्दीकरण केंद्राची ६.६० MLD इतकी क्षमता वगळता ८.२५ MLD क्षमतेचे नवीन जलशुध्दीकरण

केंद्र प्रस्तावित केले आहे. तसेच नविन जलवाहिन्या, नविन पंपींग मशिनरी अनुक्रमे १९.०० लक्ष व २४.०० लक्ष लिटर क्षमतेच्या दोन नविन उंचीवरील साठवण टाक्या (ESR) प्रस्तावित केलेल्या आहेत.

यासाठी सल्लागार यांनी भविष्याचा विचार करून व शिर्डीत वाढणा-या गर्दीचा विचार करून पाण्याची गरज लक्षात घेता Intermediate Stage ( up to year २०२५) करीता सदर प्रकल्पाचे डिझाईन केले आहे. सदर प्रकल्पासाठी सल्लागार यांनी Detailed Project Report नुसार एकूण रुपये १४,१९,८४,४२५.०० मात्र इतका खर्च अपेक्षित असल्याचे कळविले आहे. तसेच यासाठी ३ % कन्सल्टन्सी फी धरुन एकूण अंदाजे रुपये १४,६२,४४,००० /- मात्र इतका खर्च येईल.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कोपरगांव यांनी यापूर्वी रुपये ७,४८,६५,५४०/- मात्र इतक्या रकमेचे अंदाजपत्रक सादर केले होते व किर्लोस्कर कन्सलटंन्स् लि.पुणे यांनी रुपये १४,१९,८४,४२५.०० मात्र इतक्या रकमेचे अंदाजपत्रक सादर केलेले आहे.

किर्लोस्कर कन्सल्टंटस् लि. यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकात तुलनात्मकदृष्टया खाली नमूद केलेल्या मुद्दयांमुळे वाढ झालेली आहे.

०१. नवीन वाढीव जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता ८.२५ MLD प्रस्तावित केली आहे.

०२. एकूण ६७.९४ लक्ष लिटर्स क्षमतेच्या उंचीवरील साठवण टाक्या (ESR) प्रस्तावित केल्या आहेत.

०३. संस्थान परीसराकरीता स्वतंत्र नविन जलवाहिन्या (Rising & Distributary Mains -WTP to ESR & ESR to Sansthan premises) प्रस्तावित केल्या आहेत. त्यांची लांबी वाढली आहे. तसेच नियोजीत गार्डनसाठी नविन रॉ-वॉटर रायजिंग मेन प्रस्तावित केले आहे.

उपरोक्त बाबींमुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे अंदाजपत्रकापेक्षा किर्लोस्कर कन्सल्टंटस् यांचे अंदाजपत्रकात वाढ झालेली आहे. याबाबत किर्लोस्कर कन्सल्टंटस् यांचेकडिल श्री. एस.डी. कामथे प्रोजेक्ट मॅनेजर यांचेशी दि. ०९/०६/२००९ रोजी साईआश्रम पॅकेज-१ व २ या प्रकल्पांसाठी स्वतंत्र साठवण टाक्या (ESR व GSR) करण्यात येणार असल्याने उपरोक्त साठवण टाक्यांची (ESR) क्षमता कमी करता येईल अशी चर्चा झाली. त्यानुसार किर्लोस्कर कन्सल्टंटस् यांनी प्रस्तावात नमूद केले प्रमाणे ६७.९४ लक्ष लिटर्स क्षमतेच्या उंचीवरील साठवण टाक्यांची (ESR) क्षमता कमी करुन ३६.६० लक्ष क्षमतेच्या साठवण टाक्या (ESR) प्रस्तावित करण्यात येत आहेत असे सांगीतले आहे. तसेच त्यामुळे अपेक्षित खर्च कमी होऊन तो आता रुपये १३,१७,८६,९२५ /- मात्र इतका होईल असे सांगीतले आहे. सदरहू खर्चात ३ % सल्लागार फी मिळविल्यास एकूण अंदाजे रुपये १३,५७,४०,५३३/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

याप्रमाणे उपरोक्त प्रकल्पासाठी येणारे अंदाजे रुपये १३,५७,४०,५३३/- मात्रचे अपेक्षित खर्चास मंजुरी मिळणेबाबत तसेच सल्लागार यांचेकडून सदर कामाच्या निविदा तयार करून वर्तमान पत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेबाबतचा प्रस्ताव दि.२१/०६/२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होवून शिर्डी नगरपंचायत यांचेतर्फे सध्या उभारण्यात येत असलेल्या पाणी पुरवठा योजनेतून संस्थानसाठी किती पाणी उपलब्ध होवू शकेल याविषयी किर्लोस्कर कन्सलटंट लि. यांचा सल्ला घेवून प्रस्ताव सादर करावा असे ठरले होते.

वरीलप्रमाणे दि.२१/०६/२००९ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील चर्चेनुसार मा.कार्यकारी अधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी व वरिष्ठ मुख्य अभियंता यांनी किर्लोस्कर कन्सलटंट लि.पुणे यांचे प्रोजेक्ट मॅनेजर श्री एस.डी.कामथे यांचेशी दि.१०/०७/२००९ रोजी शिर्डी येथे चर्चा केली. सदर चर्चेच्या अनुषंगाने किर्लोस्कर कन्सलटंट लि. यांनी दिनांक १३/०७/२००९ रोजीचे फॅक्सव्दारे पाठविलेल्या पत्रातील ठळक बाबी खालीलप्रमाणे आहेत.

०१. शिर्डी नगरपंचायत क्षेत्रातील सध्याची लोकसंख्या आणि पाणी पुरवठयाचे प्रमाण माणसी ७० लिटर प्रती दिवस इतके गृहीत धरुन नगरपंचायतीचे योजनेतून जेमतेम २.३ दशलक्ष लिटर्स इतके पाणी शिल्लक राहील. नगरपंचायतचे योजनेची क्षमता ८.५ MLD इतकी आहे. Ultimate Stage Requirement चा विचार केल्यास भविष्यात अतिरिक्त पाणी शिल्लक राहणार नाही.

०२. शिर्डी शहरात होत असलेली विकास कामे व वाढ लक्षात घेता उपलब्ध होणारे २.३ दशलक्ष लि. इतके अतिरिक्त पाणी नजीकच्या काही वर्षातच वापरात येईल.

०३. दुस-या बाजूस Intermediate Stage (Year २०२५) साठी संस्थानची आवश्यकता १४ MLD इतकी असल्याने नगरपंचायतकडील २.३ द.लि. इतके अतिरिक्त पाणी वापरुनही संस्थानची गरज भागविण्यासाठी वाढीव जलशुध्दीकरण केंद्राचे काम करणे आवश्यक आहे.

०४. या कारणांमुळे शिर्डी नगरपंचायत आणि संस्थान यांच्या पाणी पुरवठा योजनांची उभारणी स्वतंत्ररित्या करून त्यांची देखभालही स्वतंत्र असावी असे मत किर्लोस्कर कन्सलटंट लि. यांनी व्यक्त केले आहे.

तसेच नगरपंचायतीचे पाणी पुरवठा योजनेची देखभाल संस्थानतर्फे करण्याच्या विषय हा पुर्णतः स्वतंत्र असून, त्याची नविन योजनेच्या उभारणीशी सांगड घालण्यात येवू नये. तसेच सदरहू देखभालीचा विषय हा धोरणात्मक विषय असल्याने, तो संस्थानने मर्जीनुसार घ्यावयाचा आहे. असे किर्लोस्कर कन्सलटंट लि. यांनी शेवटी नमुद केले आहे.

शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेतील रस्त्यांची कामे सुरु करणेबाबत म.रा.र.वि. महामंडळ यांचेमार्फत कार्यवाही करणेत येत आहे. सदरहू रस्त्यांची कामे सुरु होण्या अगोदर उपरोक्त नियोजित योजनेच्या भूमिगत पाणी पुरवठा लाईन्स टाकण्याचे काम पुर्ण होणे आवश्यक आहे. तसेच पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढल्याने सध्याचे पंपींग मशिनरीवर अतिरिक्त ताण येत आहे. त्यासाठी किर्लोस्कर कन्सलटंट यांचे सल्ल्याने सध्याचे योजनेसाठी नविन पंपींग मशिनरी बसविता येईल. त्यामुळे पाईपलाईन्सचे व पंपींग मशिनरीचे कामासाठी स्वतंत्र निविदा मागविणेसाठी को-या निविदा तयार करुन पाठवाव्यात अशी सुचना किर्लोस्कर कन्सलटंट यांना दि. १०/०७/२००९ रोजी झालेल्या चर्चेत करण्यात आली आहे. त्यानुसार ते को-या निविदांचे संच तयार करुन पाठविणार आहेत.

तरी उपरोक्त प्रकल्पासाठी येणारे एकुण रु. १३,५७,४०,५३३/- मात्र खर्चापैकी सध्या पहिल्या टप्प्यामध्ये रायझिंग मेन व डिस्ट्रिब्युशन पाईपलाईन्स आणि पंपींग मशिनरीसाठी येणारे अंदाजे रु. ७,८८,४०,१००/- मात्रचे अपेक्षित खर्चास आणि सदर कामांसाठी वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६५१** **प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे संस्थान पाणीपुरवठा व्यवस्थेकरीता वाढीव जलशुध्दीकरण केंद्र प्रकल्पासाठी येणारे अंदाजे एकुण रु. १३,५७,४०,५३३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/पाणीपुरवठा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. २२** **साईभक्तांचे इच्छेनुसार एका दिवसाचा एकत्रित आकार घेऊन प्रसादालयामध्ये भोजन घेणाऱ्या भक्तांना मोफत योजनेमध्ये सुधारणा करणे बाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्तांचे इच्छेनुसार स्वतःचे अथवा नातेवाईकांचे वाढदिवस, किंवा पुर्वजांच्या स्मृतीप्रित्यर्थ अथवा अन्य कारणास्तव एका दिवसाचा एकत्रित आकार भरुन प्रसादालयामध्ये भोजन घेणाऱ्या भक्तांना मोफत प्रसाद देणेकामी योजना सुरु केलेली आहे. त्याबाबत मा.व्यवस्थापन समिती दि. ३१.०३.२००८ चे सभेतील निर्णय क्र. २४९(४) नुसार दररोज सरासरी २०,००० भक्त प्रसादभोजनाचा लाभ घेतील असे गृहीत धरुन रक्कम रु. १,००,०००/- आगाऊ भरुन घेणेत यावी असे ठरलेले होते.

जुने प्रसादालय, साईबाबा भक्त निवासस्थान व धर्मशाळा येथे साईभक्तांची प्रसाद भोजनाची व्यवस्था केलेली होती त्यानुसार माहे एप्रिल २००७ ते जून २००८ या कालावधीत दररोज सरासरी २३,५०० साईभक्तांनी प्रसादभोजनाचा लाभ घेतलेला असल्याचे आढळून आलेले होते. जुन्या प्रसादालयामध्ये फक्त १००० व्यक्तींची बैठक व्यवस्था व सा.भ.नि. व धर्मशाळेमधील व्यवस्थेनुसार दररोज सरासरी २३,५०० पर्यंत भक्त प्रसादभोजन घेत असत. नविन श्री साई प्रसादालयामध्ये सुमारे ५००० व्यक्तींची बैठक व्यवस्था केलेली आहे. त्यामुळे भविष्यात दररोज सुमारे ४०,००० पेक्षा जास्त भक्त प्रसादभोजनाचा लाभ घेतील असे गृहीत धरुन मोफत भोजन योजनेकामी स्विकारणेची रक्कम ठरविलेली आहे.

| अ.नं. | महिना | सध्याची भोजन घेणारांची संख्या | भविष्यातील सरासरी अंदाजीत संख्या | देणगीदार यांचेकडून घ्यावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | जानेवारी- २००८ | २५८३८ | ५०,००० | २,५०,०००/- |
| २ | फेब्रुवारी- २००८ | २११०३ | ४०,००० | २,००,०००/- |
| ३ | मार्च- २००८ | २१५३९ | ४०,००० | २,००,०००/- |
| ४ | एप्रिल- २००८ | २२८६५ | ५०,००० | २,५०,०००/- |
| ५ | मे- २००८ | २८६२३ | ६०,००० | ३,००,०००/- |
| ६ | जुन- २००८ | २९४८८ | ६०,००० | ३,००,०००/- |
| ७ | जुलै- २००८ | २३०८४ | ५०,००० | २,५०,०००/- |
| ८ | ऑगष्ट- २००८ | २३०९७ | ४०,००० | २,००,०००/- |
| ९ | सप्टेंबर- २००८ | १८५४४ | ४०,००० | २,००,०००/- |
| १० | ऑक्टोबर- २००८ | २११४४ | ५०,००० | २,५०,०००/- |
| ११ | नोव्हेंबर- २००८ | २४१२३ | ५०,००० | २,५०,०००/- |
| १२ | डिसेंबर- २००८ | २९३०८ | ६०,००० | ३,५०,०००/- |

उपरोक्तप्रमाणे संभाव्य गर्दीचे कालावधीनुसार दररोजच्या प्रसाद भोजनासाठी देणगीदार भक्तांकडून खालीलप्रमाणे रक्कम स्विकारणेबाबत मा.व्यवस्थापन समिती दि. ०६.०९.२००८ चे सभेतील निर्णय क्र. ६८८ ने ठरलेले आहे.

१) फेब्रुवारी, मार्च, ऑगस्ट, सप्टेबर — रु. २,००,०००/-
२) जानेवारी, जुलै, ऑक्टोबर, नोव्हेंबर — रु. २,५०,०००/-
३) एप्रिल, मे, जुन, डिसेंबर — रु. ३,००,०००/-

उपरोक्तप्रमाणे मोफत प्रसाद भोजन योजनेची साईभक्तांना माहीती मिळावी म्हणून संस्थानचे परिसरात विविध ठिकाणी फलक लावलेले आहेत.

नविन श्री साई प्रसादालयामध्ये प्रसादभोजन व्यवस्था सुरु झाल्यापासुन खालीलप्रमाणे भक्तांनी प्रसादभोजनाचा लाभ घेतलेला आहे.

| अ.नं. | महिना | एकूण भोजन घेणारांची संख्या | २००९ मधील दैनंदिन प्रसादभोजन घेणाऱ्या भक्तांची सरासरी संख्या | २००८ मधील दैनंदिन प्रसादभोजन घेणाऱ्या भक्तांची सरासरी संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | जानेवारी- २००९ | १०,२०,००७ | ३२,९०३ | २५८३८ |
| २ | फेब्रुवारी- २००९ | ०७,५६,५१२ | २७,०१८ | २११०३ |
| ३ | मार्च- २००९ | ०८,११,९३० | २६,१९२ | २१५३९ |
| ४ | एप्रिल- २००९ | ०८,२२,३५४ | २७,४१२ | २२८६५ |
| ५ | मे- २००९ | ०८,८१,६३९ | २८,४४० | २८६२३ |
| ६ | जुन- २००९ | ०९,४०,०१० | ३१,३३४ | २९४८८ |

याआधी दिनांक ०६.०९.२००८ रोजीचे सभेत मान्य झालेल्या मोफत प्रसादभोजन योजनेसाठी महिनावार रक्कम रु. २,००,०००/-, २,५०,०००/-, ३,००,०००/- निश्चित केलेली आहे. तथापि मा.अध्यक्ष साहेब यांनी सुचना फलकावरील मजकूर वाचल्यानंतर सदर योजनेमध्ये उत्सवाचे कालावधीकरीता प्रतिदिनी रु. ३,००,०००/- व इतर कालावधीसाठी प्रतिदिनी रु. २,००,०००/- घेणेत यावे. व त्यानुसार सूचना फलकावर मजकूर नमूद करावा असे सुचविलेले आहे.

मात्र मोफत भोजन योजनेबाबत माहीती फलक लावल्यापासून असा अनुभव आलेला आहे की, बरेच साईभक्त सदर योजनेकरीता रु. २५,०००/- ते रु. ५०,०००/- रक्कम स्विकारणेबाबत व त्याच दिवशी कुपन्स वाटप करण्याचा आग्रह धरतात. यासाठी रु. ५०,०००/- पेक्षा अधिकची रक्कम मोफत प्रसादभोजन योजनेमध्ये स्विकारणेत यावी मात्र हा मजकूर माहीती फलकावर नमूद करण्यात येऊ नये असे मत आहे. तरी सदरबाबत मान्यता असावी. तसेच खालीलप्रमाणे सुधारीत मोफत भोजन योजनेस मान्यता मिळणेस विनंती.

**साईभक्तांसाठी नम्र आवाहन**

**मोफत भोजन योजना**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत सर्व साईभक्तांचे सहर्ष स्वागत.

श्री साई प्रसादालय, शिर्डी येथे साईभक्त स्वतः अथवा नातेवाईकांचा वाढदिवस किंवा पुर्वजांच्या स्मृती प्रित्यर्थ अथवा अन्य कारणास्तव संस्थान विश्वस्तव्यवस्थेने ठरविलेली रक्कम जमा करुन श्री साईबाबांना नैवेद्य अर्पण करुन साईभक्तांना मोफत प्रसादभोजन देण्याची व्यवस्था करणेत येत आहे. मोफत प्रसादभोजन कुपन्स रांगेतून दर्शन घेणाऱ्या साईभक्तांना वाटप करणेत येईल.

मोफत प्रसादभोजन योजनेअंतर्गत खालीलप्रमाणे देणगी स्विकारण्यात येईल.

श्री रामनवमी, श्री गुरुपोर्णिमा, श्री पुण्यतिथी उत्सव कालावधीतील एक दिवस- रु. ३,००,०००/-

वर्षातील वरील उत्सवाव्यतिरिक्त कालावधीतील एक दिवस रु. २,००,०००/-

सदर देणगी एकाच भक्ताकडून अथवा त्यापेक्षा अधिक साईभक्त मिळून एकत्रितपणे स्विकारली जाईल. दानशून देणगीदार भक्तांची नांवे प्रसादभोजनाचे दिवशी प्रसादालयामध्ये व दर्शन रांगेमध्ये प्रसिध्द करण्यात येतील. ज्या दानशूर साईभक्तांना मोफत प्रसादभोजन योजनेमध्ये सहभागी होण्याची इच्छा असेल अशा साईभक्तांनी संस्थानचे श्री साई प्रसादालय कार्यालयामध्ये संपर्क साधावा ही विनंती.

**निर्णय क्र.६५२** **उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय/मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २३** **साईभक्त संमेलन -२००९ आयोजनाबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) , मार्फत दि. १७/०१/२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेतील निर्णयानुसार सन २००९ या सालात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थे-मार्फत संपूर्ण भारतातील विविध शहरांमध्ये श्री बाबांच्या शिकवणीचा प्रचार व प्रसार करण्याच्या दृष्टीने श्री बाबांच्या चांदीच्या व मुळ पादुकांदर्शन सोहळा तसेच प्रसिध्द गायक/गायिका व संस्थान कलाकार यांचा साईभजन संध्या कार्यक्रम खालीलप्रमाणे आयोजित करण्याचे ठरले आहे.

त्यानुसार पणजी गोवा, लखनौ, रायपूर, कोलकत्ता व कॅलिंगपॉंग येथे साईभक्त संमेलन २००९ चे आयोजन करण्यात आलेले होते. ते यशस्वीरित्या पार पडले आहेत. दि.२१/०६/२००९ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत दि. ६/०८/२००९ रोजी गोहत्ती, आसाम व दि.२९/०८/२००९ रोजी अमेरीकेतील होस्टन(टेक्सास) तसेच शिकागो व ॲटलांटा येथे आयोजित करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

त्याच अनुषंगाने साई इन्फोसीस्टीम (इंडिया) लिमीटेड, अहमदाबाद यांनीही दि.०१/०६/२००९ चे पत्राने चावडी शताब्दी सोहळ्यानिमित्त अहमदाबाद येथे साई पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेबाबत विनंती केलेली आहे. या पत्रात त्यांनी सदर कार्यक्रमासाठी साई इन्फोसीस्टीम (इंडिया) लिमीटेड, अहमदाबाद हे खालीलप्रमाणे- खर्च करणेस तयार आहेत.

०१) सदर कार्यक्रमासाठी संस्थानकडील कर्मचा-यांचा जाण्या-येण्याचा प्रवास, तसेच भोजन व निवास खर्च.

०२) सदर कार्यक्रमाची जाहीरात व प्रसिध्दी खर्च.
०३) सदर कार्यक्रमासाठी साईभक्ती संगीताच्या कार्यक्रमाचा खर्च.
०४) सदर कार्यक्रमाची तारीख एकमेकांच्या सोईने ठरविता येईल.

उपरोक्तप्रमाणे ते सर्व खर्च करणार असून संस्थानमार्फत तारीख निश्चित करणेस, त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेस व कार्यक्रमासाठी करावयाच्या विविध अनुषंगीक व तत्सम कामासाठी येणा-या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळावी ही विनंती.

(०१) कर्मचा-यांची नांवे निश्चित करणे, (०२) त्यांची रेल्वेची/विमानाची रिटर्न तिकीटे बुक करणे, (०३) त्याकामी अॅडव्हान्स घेणे. (०४) मा.अध्यक्षमहोदय, मा.उपाध्यक्षमहोदय व सर्व मा.विश्वस्त यांचेशी त्वरीत संपर्क साधुन विमानाची तिकीटे बुक करणे. (०५) संबंधीतांना तसे पत्र पाठविणे.

**निर्णय क्र.६५३ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. तसेच अहमदाबाद येथे दि.६.०९.२००९ रोजी साईपादुका दर्शन सोहळा करणेचे ठरले.**

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २४ व्दारावती निवासस्थान मध्ये वॉश बेसीनचे ठिकाणी मेडिमिक्स साबण ठेवणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यसस्थापन समितीचे दिनांक ०८.०२.२००९ चे सभेतील निर्णय क्र. ७४ व जा.नं. एसएसएस/ व्दारावती/ ८४६/२००९ दिनांक १९.०१.२००९ चे आदेशानुसार आयएसएस इंटिग्रेटेड फॅसिलिटी सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई यांना हाऊस किपीगचे कामे देण्यात आलेले आहे.

दि.०२.०५.२००९ चे पत्रात आयएसएस कंपनी यांनी व्दारावती निवासस्थानतील वेस्टन बाथरुम १८७ करीता टॉयलेट रोल होल्डर तसेच टिश्यु रोल व साबण इत्यादीचा पुरवठा करण्यास तयार असले बाबत पत्र दिले आहे.

सदर पत्राचा विचार करता टॉयलेट रोल होल्डर तसेच टिश्यु रोल चा वापर बाहेरील देशात पाणी कमी असल्याकारणाने तेथे केला जातो. परंतु व्दारावती निवासस्थानात पाण्याचा पुरेश्या प्रमाणात साठा उपलब्ध आहे.

साईनिवास अतिथीगृहात मेडिमिक्स (१५ ग्रॅम) साबन हात धुण्यासाठी ठेवत आहोत. यासाठी व्यापाऱ्यांकडून कोटेशन मागवून ज्यांचे कमी दर आहेत त्यांचेकडून खरेदी करत आहोत व्दारावती रुममध्ये साबण ठेवावयाची झाल्यास प्रती नग रुपये १/- प्रमाणे इमारतीतील ३२२ खोल्यास एका दिवसास रुपये ३२२/- प्रमाणे एका महिन्यास अंदाजे रुपये ९६६०/- व एका वर्षास रुपये १,१९,५२०/- खर्च येईल तरी साबण वापरावयास मान्यता दिल्यास कोटेशन मागविता येईल व त्यानुसार खरेदी करता येईल.

**निर्णय क्र.६५४ उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-प्रशासकीय अधिकारी,निवासस्थाने/अधिक्षक,व्दारावती )

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २५ श्री साईबाबा दिनदर्शिका-२०१० छपाईबाबत.**

**प्रस्ताव-** मे मेग्ना ग्राफिक्स (इं) लि ., मुंबई यांचे दि.१७.०७.२००९ चे पत्राने खालीलप्रमाणे श्री साईबाबा दिनदर्शिका २०१० छपाई करुन संस्थानला दिनदर्शिका कॉस्ट टु कॉस्ट ( ना नफा ना तोटा ) या तत्वावर विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली आहे.त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| | तपशिल | छपाई संख्या | छपाई दर रुपये | एकूण खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| **अ)** | श्री साईबाबा दिनदर्शिका २०१० (८ पेजेस ) आकार २२"X ३५" | ३०,००० | १८५/- | ५५,५०,०००/- |
| **ब)** | श्री साईबाबा थ्रीडी - डिमेनशनल ७ शिटर डिस्क कॅलेंडर २०१० आकार ९.७५" (W) X ०७" (H ) ६ | १०,००० | १४५/- | १,४५,००००/- |
| **क)** | श्री साईबाबा थ्रीडी - डिमेनशनल वॉल कॅलेंडर २०१० आकार १९" X १९" पॅड आकार - १९" X ६" | २०,००० | २८५/- | ५७,००,०००/- |
| | | | एकूण रु. | १,२७,००,०००/- |

**अ)** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६.०९.२००८ चे सभेतील आयत्या वेळेचा निर्णय क्र.७४० अन्वये संबंधीत मे साईग्रस फाऊन्डेशन, मुंबई यांचेकडून मागिल वर्षी २००९ ची श्री साईबाबा दिनदर्शिका २०१० (८ पेजेस ) आकार २२"X ३५"- ५०,००० नग प्रती छपाई दर रु.१८५/- प्रमाणे छपाई करुन भक्तांना प्रती नग विक्री दर रु.१९०/- प्रमाने उपलब्ध करुन देण्यात आली होती.

**ब)** मा. व्यवस्थापन समितीचे दि.१८.१०.२००८ चे सभेतील आयत्या वेळेचा निर्णय क्र.७८१ अन्वये संबंधीत मे परफेक्ट प्रिंट प्रॉडक्ट प्रा.लि., मुंबई यांचेकडून मागिल वर्षी २००९ ची श्री साईबाबा थ्रीडी - डिमेनशनल ७ शिटर डिस्क कॅलेंडर २०१० आकार ९.७५" ( W ) X ०७" ( H ) ६- १०,००० नग प्रती छपाई दर रु.१४५/- प्रमाणे छपाई करुन भक्तांना प्रती नग विक्री दर रु.१५५/- प्रमाने उपलब्ध करुन देण्यात आली होती.

**क)** श्री साईबाबा थ्रीडी - डिमेनशनल वॉल  कॅलेंडर २०१० आकार १९"  X १९" पॅड आकार -  १९"  X ६" या आकाराच्या दिनदर्शिकेची प्रथमच छपाई करुन साईभक्तांना २०,००० नग प्रती छपाई दर रु.२८५/- प्रमाणे छपाई करुन उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

वरील अ,ब,क, प्रमाणे मे मेग्ना ग्राफिक्स (इं) लि ., मुंबई  यांनी दिनदर्शिकेसाठी चांगल्या प्रकारचा फोटो ग्राफ, डिझाईनचा  वापर करुन दिनदर्शिका सुबक आकर्षक असे तयार करणार आहे. त्याकामी ते चांगल्या प्रकारचा फोटो ग्राफ, उत्कृष्ट डिझाईन, आकारबद्ध , चांगल्या प्रकारचा उच्च दर्जाचा कागद वापरुन छपाई करुन देणार असलेबाबत कळविले आहे.

उपरोक्तप्रमाणे **"अ"** श्री साईबाबा दिनदर्शिका २०१० (८ पेजेस ) आकार २२"X ३५"- ३०,००० नग छपाई केल्यास प्रती नग छपाई दर रुपये १८५/- प्रमाणे एकूण रुपये ५५,५०,०००/- इतका खर्च व **"ब"** श्री साईबाबा थ्रीडी - डिमेनशनल ७ शिटर  डिस्क कॅलेंडर २०१० आकार ९.७५" ( W ) X ०७" ( H ) ६- १०,००० नग छपाई केल्यास प्रती नग छपाई दर रुपये १४५/- प्रमाणे एकूण रुपये १,४५,००००/- तसेच **"क"** श्री साईबाबा थ्रीडी - डिमेनशनल वॉल  कॅलेंडर २०१० आकार १९"  X १९" पॅड आकार -  १९"  X ६" - २०,००० नग छपाई केल्यास प्रती नग छपाई दर रुपये २८५/- प्रमाणे एकूण रुपये ५७,००,०००/- याप्रमाणे असा एकूण रुपये १,२७,००,०००/- खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्तप्रमाणे **"अ", "ब" व "क"** नुसार श्री साईबाबा दिनदर्शिका २०१०  छपाई करुन घेणेस व त्याकामी येणारे एकूण रुपये १,२७,००,०००/-  मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६५५  उपरोक्त प्रस्तावास तत्वतः  मान्यता देण्यात आली.**  (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख

---------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२६  मा.विश्वस्तांचे सुचनेबाबत.**

**निर्णय क्र.६५६** श्री विश्वात्मक जंगली महाराज ट्रस्ट,कोकमठाण यांनी संस्थानचे प्रसादालयातील जुने फर्निचर देणेबाबतची समक्ष मागणी केली असता, सदर  फर्निचरची आफसेट किंमत काढून प्रस्ताव सादर करावा, असें ठरले.

(कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०३/अधिक्षक,प्रसादालय)

वरील निर्णय क्र ५९०  ते ६५६ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.
यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

(किशोर रा.मोरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

(जयंत मुरलीधर ससाणे )
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)